**नागपूर महानगरपालिकेची स्थगित विशेष सभा गुरुवार दिनांक २२/१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातुन अंदाजपत्रकावर चर्चा करण्याकरिता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि (१४) दि.०३.०७.२०२० तसेच मनपा सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि.०३.०७.२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Vedio Conferencing व्दारे भरलेल्या विशेष सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सभासद**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **३७** | **क** | **संदीप दिवाकर जोशी** | **महापौर** |
| २. | **२०** | **ड** | **मनिषा सुनिल कोठे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ५. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ६. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ७. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ८. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ९. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| १०. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ११. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १२. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १३. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| १४. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १५. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १६. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १७. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १८. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १९. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २०. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २१. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २२. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| २३. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| २४. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २५. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| २६. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| २७. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| २८. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३०. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ३१. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३२. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ३३. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ३४. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ३५. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ३६. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| ३७. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ३८. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ३९. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ४०. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ४१. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| ४२. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ४३. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ४४. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ४५. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ४६. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ४७. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ४८. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ४९. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ५०. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ५१. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ५२. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ५३. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ५४. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ५५. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ५६. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ५७. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ५८. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ५९. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ६०. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ६१. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ६२. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ६३. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ६४. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ६५. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ६६. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ६७. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६८. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ६९. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ७०. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| ७१. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| २. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ३. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ४. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ५. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ६. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ७. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| ८. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| ९. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १०. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| ११. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १२. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १३. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १४. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| १५. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १६. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १७. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| १८. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्् |
| १९. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २०. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २१. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २२. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २३. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २४. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| २५. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| २६. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| २७. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| २८. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| २९. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ३०. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ३१. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ३२. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ३३. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ३४. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ३५. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ३६. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ३७. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ३८. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ३९. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ४०. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ४१. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ४२. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ४३. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ४४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ४५. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ४६. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ४७. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ४८. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ४९. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ५०. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ५१. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ५२. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ५३. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ५४. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ५५. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ५६. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ५७. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ५८. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ५९. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ६०. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ६१. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ६२. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ६३. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ६४. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ६५. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ६६. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ६७. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ६८. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ६९. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ७०. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ७१. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ७२. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ७३. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ७४. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ७५. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ७६. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ७७. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ७८. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ७९. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ८०. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ८१. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ८२. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| ८३. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री. राधाकृष्णन बी. — निगम आयुक्त**

**श्री. महेश मोरोणे — निगम सचिव/उपायुक्त**

**मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.**

महापौर :- चर्चेला सुरुवात करु या. एकुण ६ तास चर्चा करावयाची असेल तर पक्षनिहाय काय वेटेज येते ते येथे निगम सचिवांनी सांगावे. कोणत्या पक्षाला किती वेळ देता येईल.

निगम सचिव (श्री.महेश मोरोणे) :- मा.महापौरजी , ६ तासाकरिता चर्चा होणार असेल तर वेटेज भारतीय जनता पक्ष ४ तास ३१ तास, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष १ तास १५ मिनीट, बहुजन समाज पक्ष ३८ मिनीटे, शिवसेना ८ मिनीटे, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष ४ मिनीटे, अपक्ष ४ मिनीटे

महापौर:- सायंकाळी ६ वाजपर्यंत आपण चर्चा चालवू या. भारतीय जनता पक्ष साडे चार तास, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष सव्वा तास, बहुजन समाज पक्ष ३८ मिनीटे, शिवसेना ८ मिनीटे, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष ४ मिनीटे, अपक्ष ४ मिनीटे या पध्दतीने आपण चर्चा करु. त्या त्या वेळेचे आपण सर्वांनी पालन करावे अशी नम्र विनंती करुन या ठिकाणी मी चर्चेला प्रारंभ करण्याला सांगतो आहे.

श्री.प्रदीप पोहोणे :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.सत्तापक्ष नेता,

मा.आयुक्त, यांना मी सर्वांना नमस्कार करतो आणि या कोरोनाच्या कठीण काळामध्ये आपण वेळात वेळ काढून या परिस्थितीत नागपूर शहराच्या विकास कामांना आणि उर्वरित काम कशी चालू करता येतील यासाठी अर्थसंकल्प मा.स्थायी समिती अध्यक्ष यांच्या वतीने या शहराकरिता मांडला आहे. कोणताही स्थायी समिती अध्यक्ष आपले बजेट जेव्हा मांडते तेव्हा शहराला नविन एक दिशा देण्याकरीता आपला बजेट ठेवतो पण नागपूर शहराच्या इतिहासामध्ये पहिल्यांदा मा. पिंटू झलके साहेबांनी नवीन कोणताही हेतू न ठेवता मागील वर्षामध्ये शहरामध्ये जे उर्वरीत कामे आहे त्याचा सुरुवातीला पायंडा घेऊन ते कामे हाती घेतले खरचं मी मनापासून त्यांचा आभारी आहे. मागच्या वर्षी जेव्हा अर्थसंकल्प मांडला तेव्हा माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी नागपूर महानगरपालिकेला जे अनुदान दिले त्याच्यावर बजेट तयार झाले आणि आपल्या येथील अधिका-यांनी मी त्यांचे नाव सुध्दा घेऊ इच्छित नाही त्यांनी वर्कऑर्डर झालेले कामे सुध्दा झालेले नाही त्यामुळे नगरसेवकांना खरंच वाईट वाटत होते. कुठे ना कुठे सर्व कामे नागपूर शहरातील चालु झाले पाहिजे म्हणुन सर्व नगरसेवक त्याची प्रतिक्षा करीत होते. हा बजेट २० तारखेला सन्माननिय पिंटु झलके साहेबांनी सादर केला कुठे ना कुठे सर्व नगरसेवकांना त्याचा आनंद झाला आणि आपले जुणे सर्व कामे सुरु होईल असे वाटले, कोरोनाच्या अत्यंत वाईट परिस्थितीमध्ये मा.चेअरमन साहेबांनी शहराच्या विकासासाठी त्याचबरोबर शहरातील जनतेच्या स्वास्थासाठी जास्तीतजास्त निधी त्यांनी ठेवला आहे त्यामुळे मी झलके साहेबांचे आभार मानेल, नगरसेवक विकासासाठी तळफळ करीत आहे अधिका-यांनी सुध्दा तेवढयाच प्रमाणात तळफळ केली पाहिजे. एकीकडे स्वास्थ कर्मचारी आहे त्याचे खरचं मा.महापौर साहेब व चेअरमन साहेब तसेच सर्व सन्माननिय सदस्य मी आपल्या वतीने मी त्यांचे आभार व्यक्त करु इच्छितो कारण की कोरोनाच्या कठीन परिस्थितीमध्ये त्या लोकांनी जीव आपल्या हाती घेऊन त्यांनी लोकांची सेवा केली आहे. खरच त्यांनी समाजासाठी तसेच नागपूर शहराच्या वतीने त्यांचे कितीही कौतुक केले तरी कमी आहे. एकीकडे आपले अधिकारी कुठलेही कामे असेल ते करीत नाही आणि एकीकडे हेल्थचे जे अधिकारी व कर्मचारी छान काम करीत आहे. हे बजेट मा.पिंटु झलके साहेबांनी तयार केले आहे. खरचं हा जो अर्थसंकल्प आहे तो नागपूर शहराच्या जनतेसाठी उत्तम व लाभदायक हा अर्थसंकल्प येथे सादर होणार आहे. हा अर्थसंकल्प पिंटुभाऊ यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने मांडला आहे. या अर्थसंकल्पामध्ये त्यांनी आकडे टु आकडे या बजेटमध्ये घेतले आहे अतिशय उत्तम कामगिरी त्यांची दिसुन राहिली आहे. मी पिंटु झलके साहेबांचे या ठिकाणी स्वागत करेल, आणि त्यांना या बजेटच्या शुभकामना देऊन माझे दोन शब्द समाप्त करतो, धन्यवाद.

श्री.मनोज सांगोळे :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, सर्वप्रथ्म मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभारी आहे. मा.महापौरजी, शहरातील सर्व कर्मचा-यांनी मग ते पोलीस विभागाचे राहोत, स्वास्थ्य विभागाचे राहोत, आपल्या महानगरपालिकेचे रात्रदिवस काम करणारे कर्मचारी राहोत या कोव्हीडच्या या मोठया संकटामध्ये काम केले. ते पोलीस विभागाचे कर्मचारी राहोत, पत्रकार राहोत किंवा ते छोटे छोटे कर्मचारी, समाज सेवक ज्यांनी काम केले त्यांना मी धन्यवाद देतो. हा जे बजेट पेश करण्यात आले ते अत्यंत घाईगर्दी न करता सर्व लोकांना सोबत घेवून हे बजेट पेश करण्यात आले. हा अत्यंत चांगले बजेट आहे त्याचे मी समर्थन करतो. परंतु जे कामे मागे थांबविण्यात आलेली होती ती कामे सुरु करावे. त्या मध्ये काही नगरसेवकांच्या कामाच्या फाईली सुटल्या असतील तर इतरही मा.सदस्यांच्या फाईली सुटल्या असतील त्या आर्थिक बजेटमध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती करतो. तसेच नारी घाट याच्यामध्ये आम्हांला जास्तीत जास्त निधी देवून ते सुध्दा काम करण्यात यावे. आता सुरक्षा भिंत नसल्या कारणाने आताच नामचीन एका गुंडाचा मर्डर त्याच्या बाजूला झाला. आम्हांला रात्रबेरात्री खुप त्रास होतो, त्या ठिकाणी एक चौकीदाराची नियुक्ती करण्यात यावा.

तसेच अतिरिक्त राशी २५ लक्ष रु. ठेवण्यात यावे. तेथे एक वाचनालय बनविण्यात आले आहे त्या वाचनालयाकरिता सुध्दा २५-३० लक्ष रु ठेवण्यात यावे अशी आपल्याला विनंती करतो. मा.स्थायी समिती अध्यक्षांना विनंती करतो आपल्या मार्फत काही ठिकाणी पैसे ठेवावयाचे असतील तर उत्पन्नाचे स्त्रोत कसे वाढतील त्याकरिता पुन्हा एक बैठक लावण्यात यावी. जेणेकरुन आर्थिक स्त्रोत वाढतील. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता नवीन स्त्रोत शोधणे गरजेचे आहे. जेथे रस्त्यावर बाजारपेठ लागतात त्यांच्याकडून जेथे जेथे रस्त्यावर बाजार लागतात आणि आपले कर्मचारी साफसफाई करतात त्या ठिकाणी वसुलीकरिता नवीन कर्मचारी नियुक्त करण्यात यावे. स्टार बस सेवा सुरु करण्याकरिता सांगावे कारण इन्श्युरन्सचे पैसे आणि रोड टॅक्स जात आहे. कारण शहरात प्रायव्हेट गाडया चालत आहे आणि देशातही प्रायव्हेट गाडया चालून राहिल्या, स्टेटने परवानगी दिली आहे. परंतु स्टार बस चालू नसल्यामुळे महानगरपालिकेचा घाटा होत आहे. तसेच ड्रायव्हर, कंडक्टर यांच्या परिवाराची उपासमार होत आहे तसेच ज्या महिला कर्मचारी वर्ग आहे जे बुटीबोरी, वाडी जेथे जेथे इंडस्ट्रीयल एरिया आहेत तेथे कामावर जातात तेथे स्वास्थ्य कर्मचा-यांना विचारुन आणि जे शासनाचे दिशानिर्देश आहेत ते पाहून आपण स्टार बस सेवा सुरु करण्याकरिता सांगावे. आपण मला बोलण्याची संधी दिली. ही वेळ जास्त बोलण्याची नाही. शहरात आणि जगात कोव्हीडची महामारी चालू आहे. जे कोव्हीड महामारीमध्ये काम करणारे लोक होते आणि ज्यांचा मृत्यू आला त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. जयभीम, जय महाराष्ट्र

श्रीमती आयशा ऊईके :- मा.महापौरजी, आनेवाली दिवाली मुबारक हो l यह साल मे जो फाईल नही हुई वह होनी चाहिए और अ, ब, क, ड प्रभाग की जो फाईल नही हुई वह होनी चाहिए l मै सब लिखीत मे देती हूँ सर, सब त्योहारो की आपको शुभकामनाये, आप खुश रहने की दुआये मांगते है आप खुश रहो ।

श्री. जितेंद्र (बंटी) कुकडे :- मा.महापौरजी, हा जो बजेट महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती अध्यक्ष श्री. पिंटू झलके यांनी मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परत नागपूर शहराचे प्रथम नागरिक मा.महापौरजी आणि परत त्यांची टीमने या कोव्हीड महामारीत जे काम केलेले आहे. नागपूर शहरात कोव्हीडची महामारी चालत असतांना या महामारीला सामोरे जात असतांना परिस्थिती हाताळण्याचे काम करुन मा. महापौरजी यांनी हे सिध्द केले आणि शहरातील सामान्य नागरिकांना जो दिलासा दिलेला आहे त्याकरिता मा.महापौरजी आणि त्यांच्या सर्व टीमचा मी आभार मानत आहे. हा अत्यंत चांगला आणि संतुलीत बजेट मा. विजय झलके स्थायी समिती अध्यक्ष यांनी मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभार व्यक्त करतो आणि दोन-तीन मागण्या नुसार म्हणतो आहे. मागच्या ज्या फाईली ज्यांचे वर्कआर्डर झालेले आहे ते काम पुर्ववत सुरु करण्यात यावे त्यासाठी स्थायी समिती अध्यक्षांनी पुढाकार घ्यावा. वंदेमातरम ची योजना आहे अमर जवान शहीद स्मारक नागपूर महानगरपालिका आपल्या नागपूर शहरात उभारणार आहे तो अत्यंत चांगला उपक्रम मा.स्थायी समिती अध्यक्ष यांनी बजेटमध्ये मांडलेला आहे. ज्या पध्दतीने स्वामी विवेकानंदाचे स्मारक अंबाझरी येथे तयार झाले आहे आणि आपल्या नागपूर शहराची शान आणि स्वाभीमान वाढविणारी आहे. या स्मारकामुळे नागपूर महानगरपालिकेची ओळख वाढलेली आहे. त्या पध्दतीने मा.स्थायी समिती अध्यक्षांनी जे वंदेमातरम अमर जवान शहीद स्मारक् बनविण्याचे जो प्रकल्प उभा केला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. यामुळे नागपूर शहराची नवीन ओळख तयार होईल आणि नागपूर शहरात नागपूर महानगरपालिका ही शहीदांचा सन्मान करीत असते. तसेच एक विषय होता, या विषयाकडे थोडे लक्ष दयावे. मागच्या वर्षी ज्या कामाचे टेंडर झालेले आहे. त्या टेंडरकरिता रिप्रोव्हीकरुन टेंडर दयावे. एक हायकोर्टाने

विषय दिलेला आहे. ज्या हायटेंशन लाईन गेलेल्या आहेत तेथील घरे असलेल्या नागरिकांना नोटीसेस दिलेल्या आहेत. ते घरे पाडण्यास सुरु झालेले आहे. लोक घाबरलेले आहेत त्या मध्ये लक्ष देवून लोकांना दिलासा देण्यात यावा. कारण हायकोर्ट म्हणते घरे पाडण्यात यावे परंतु यामध्ये एमईसीबी त्याकडे लक्ष देत नाही, ते म्हणतात की हायटेंशन लाईन सुध्दा हटविणार नाही. ज्यामुळे ज्या लोकांची ३०० स्केअर फुटाची घरे आहेत त्यांच्या घरावरुन हायटेंशन लाईन गेलेली आहे ते गोरगरीब लोक कुठे जाणार आहेत. एमईसीबीला सांगून ते काम थांबविण्यात यावे. लोकांना मदत करण्यात यावी अशी विनंती मी या चर्चेच्या माध्यमातून करीत आहे. वाटोळा ते सिंबायसीस कॉलेज पर्यंत जे सीसीसी सिमेंट रोड झालेले असून तेथे सर्विस ट्रक प्लॉट करणेअत्यंत आवश्यक आहे. तेथे डिस्पोजलसाठी काही नाही तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे ते सुध्दा करणे आवश्यक आहे. आपली बस सहा महिन्यापासून बंद आहे. ३ हजार कर्मचारी आहेत, त्यामध्ये महिला कंडक्टर ड्रायव्हर आहेत. र आणि इतर कर्मचारी आहेत अजून बस सेवा सुरु झालेली नाही. त्यामध्ये महाराष्ट्रामध्ये एक नियम आहे आणि आपल्या शहरासाठी एक नियम आहे आणि दुस-या शहरासाठी एक नियम सुरु आहे. त्यांनी पुणेची बस सेवा सुरु केली. मुंबईची बेस्ट बस सेवा सुरु केली. मी कॉग्रेस पक्ष आघाडी सरकारवर आरोप करतो आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य परिवहन बस सेवेच्या बसेस सुरु आहेत परंतू नागपूर शहरातील आपली बस सेवा सुरु केलेली नाही. या आपली बस सेवेच्या माध्यमातून नागरिक आपल्या कामावर जाणे येणे करीत असत. त्यांना कुठेही जायला मिळत नाही. महिला आणि कामकाजी लोकांचे जाणे येणे होत होते आज २०० रुपये मोजून ऑटोचालकाला दयावे लागत आहे आणि सर्रासपणे ही वाहतुक जास्तीत जास्त पैसा घेवून सुरु आहे. जनतेला बस सेवा देण्यासाठी हा पुढाकार घेण्यात यावा. आपल्या बस सेवेच्या माध्यमातून ३ हजार लोकांचे घर चालत होते ते थांबलेले आहे. त्यांनाही काही रोजगार मिळेल. मा.सदस्य सांगोळे यांचे भाषण मी ऐकत होतो त्यांनी सुध्दा सांगितले की बस सेवा सुरु नसल्यामुळे लोकांचे जाणेयेणे थांबलेले आहे. बस सेवा सुरु करण्याविषयी लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा. मा.आयुक्त यांना तसे निर्देश देण्यात यावे. बाकी शहरात बस सेवा चालत आहे. आपल्या शहरात देखील बस सेवा चालू झाली पाहिजे. एक सुडबुध्दीचे राजकारण महाराष्ट्र सरकार नागपूर महानगरपालिकेसाठी करीत आहे. मेट्रो सुरु आहे. मात्र आपली बस बंद आहे. माझी विनंती आहे, ही बस सेवा लवकरात लवकर चालू करण्यात यावी. मा.महापौरजी, माझ्या प्रभागात वाटोळा घाट आहे. या कोव्हीडच्या काळात या वाटोळा घाटाला खुप महत्व प्राप्त झाले होते. भरपूर डेड बॉडी त्या वाटोळा घाटावर आल्या ती जागा कमी पडते आहे. आपल्या महानगरपालिकेची जागा आहे ती अॅक्वॉयर करुन ती जागा घाट वाढविण्यासाठी देण्यात यावी तसेच या घाटाचे सौदर्यीकरण सुध्दा करण्यात यावे मा. महापौरजी अशी मी आपणांस विनंती करतो एक विशेष निधी देण्यात यावा. एक चांगला बजेट मा. विजय झलके यांनी या ठिकाणी मांडला. एक ऐतिहासिक सुवर्ण अक्षरात लिहिले जाणारे बजेट या कोव्हीडच्या महामारीच्या काळात जनतेला दिले. कोव्हीडच्या महामारीच्या काळात जनतेची सेवा करुन जनतेला या महामारीपासून वाचविण्याचे काम केल्यावरही विकासाच्या कामाकडे दुर्लक्ष केलेले नाही. विकासाच्या दिशेने नागपूर महानगरपालिकेची वाटचाल मा.महापौरजी श्री. संदीप जोशी, सत्तापक्ष नेते श्री. संदीप जाधव आणि स्थायी समिती अध्यक्ष श्री. विजयजी झलके यांच्या नेतृत्वामध्ये विकासाची वाटचाल ही महानगरपालिका करीत आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि आपले दोन शब्द थांबवितो. जय श्रीराम.

श्री.इब्राहीम टेलर :- मा. महापौरजी, मुझे बोलने का मौका दिया इसलिये मै आपका बहोत शुक्रीया अदा करता हू और साथ ही साथ आज जो बजेट २७३१ करोड का मा. स्थायी समिती अध्यक्ष श्री. विजयजी झलके

साहब ने पेश किया। परंतु इस बजेट मे मा.महापौरजी बहोतसी कमियां है, हमारा उत्तर नागपूर मे विकास कार्य पुरे नही हुए, मै आपको बताना चाहता हूँ , इस बजेट मे इसके लिए प्रावधान रखना चाहिये था। हमारे यहां पर सडके बहोत खराब है, नालियॉ, सिवरलाईन, ड्रेनेज लाईन और एज्युकेशन के माध्यम से बहोत कमियां है, एज्युकेशन मे बहोत ही कम प्रावधान रखा गया है । मा.महापौरजी वैसे भी हमारा देश एज्युकेशन के क्षेत्र मे बहोत पीछे है, इस बजेट मे एज्युकेशन के लिए बहोतही कम प्रावधान रखा गया है मे बजेट ज्यादा प्रावधान करेगें तो अच्छा होगा। मा.महापौरजी, इस साल कोव्हीड की वजह से हमारे देश मे, हमारे शहर मे सब स्कुले बंद होने की वजह से हमारे बच्चो का बहोत नुकसान हुआ है । अभी तक स्कुले चालू नही हुई है, कॉलेज, स्कुले बंद होने की वजह से बच्चे इधर उधर भटक रहे है। मा.महापौरजी, शिक्षा के लिए जल्द से जल्द नागपूर महानगरपालिका की स्कुले हो कॉलेज हो शुरु हो यह मेरी आपसे विनंती है । और दुसरी एक बात हमारे बहुजन समाज पार्टी का एक बहोत बडा मुद्दा था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक के लिए बहोत कोशीश की परंतु बजेट मे प्रावधान किया था पर जगह नही मिली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक के लिए १८-२० साल से बहुजन समाज पार्टी लढाई लढ रही है, हमारे मा.मुख्यमंत्री साहेब ने भी वादा किया था। यशवंत स्टेडिअम मे जो जगह है वो देने वाले थे पर इस बजेट मे प्रोव्हीजन नही रखा गया है। मै विनंती करता हूँ इस स्मारक को जो इस देश के उस शख्त के नाम बनाया जा रहा है जिसने इस देश को संविधान दिया उनका हक बनता है। उस स्मारक के लिए आप जगह की तजवीज करके उस स्मारक को बनाने की कोशीश करे। आपने उस के लिए मौका दिया और इस कोव्हीड काल मे १०० लोगो की मृत्यू हुई है मै उन के लिए दुआ करता हूँ। इस कोव्हीड काल मे जिन लोगो ने डॉक्टर, नर्सेस, पोलीस जिन्होंने मेहनत की उन लोगो का मै शुक्रीया अदा करता हूँ। उन्होने हमारा सपोर्ट किया, हमारे महानगरपालिका को सपोर्ट किया, अपने देश को सपोर्ट किया मै उनका शुक्रीया अदा करता हूँ। धन्यवाद.

श्रीमती स्नेहा निकोसे :- मा.महापौरजी, मुझे कल का एक विषय बताना है, कल हम कुछ नगरसेवक, नगरसेविकाए कमिश्नर साहेब से मिलने गये थे। हमने एक लेटर पॅड पर पत्र दिया की हमारे प्रभाग मे रोड पर जो गड्डे हुए है उसके लिए पॅचेस गाडी दे और सिव्हर लाईन का काम नही हुआ है वह किया जाये तो उन्होने साफ इंकार कर दिया की हम नही कर सकते। हमारे पास पैसा ही नही है तो हम कहां से करे, हम रस्ता बनाने की बात नही कर रहे है। हम पॅचेस बनाने की बात कर रहे है एटलिस्ट गड्डे तो भरे जाये, उस गड्डो मे बच्चे गिर जाते है, ॲक्सीडेंट हो जाता है, हम कैसे करे। कमिश्नर साहब ने तो साफ मना कर दिया की पैसे ही नही है। तो हम लोग गड्डे का क्या करे। मा.महापौरजी, एक रिकवेस्ट है वहा पर काम करने के लिए मुझे पॅचेस गाडी दी जाये ताकी मै वहां पर काम कर सकू। पिछली बार फंड मिला था, इस बार तो डायरेक्ट बोल रहे है की काम नही होगा तो मा.महापौरजी मेरी रिकवेस्ट है जो मेरे पुराने काम है और आनेवाले नये काम है वह जल्द से जल्द करवा दे। मुझे बोलने का मौका दिया इसलिए धन्यवाद.

श्री.दिनेश यादव :- मा. महापौरजी, मुझे बोलने का मौका दिया इसलिए धन्यवाद. मै कहना चाहता हूँ, पिछले वर्ष जिन फाईलो पर हमारे को प्रोव्हीजन मिला था उनका वर्कआर्डर हो चुके है परंतु इस बजेट मे वह आयी नही है। इस के बारे मे मैने मा. अध्यक्ष महोदय को कल लेटर दिया है। कुछ बाते ऐसी है जिसमे नारी का जो ब्रीज है उसके लिए पिछले साल बजेट मे ५० लाख का प्रोव्हीजन कर दिया था, वह फाईल टेंडर को आके, हमारे आदरणीय आयुक्त साहेब उन पास जनवरी महिने मे फाईल गई परंतु आज तक उसका वर्कआर्डर नही हुआ है। ऐसी चार फाईल टेंडर होके अप्रुव्हल होके दिसेंबर महिने के १९ तारीख को मा.आयुक्त के पास गई है

। स्थायी समिती की मंजूरी मिल चुकी है परंतु उस काम के वर्कआर्डर नही हुआ है। मै स्थायी समिती अध्यक्षजी को विनंती करता हूँ की वह हमारी चार फाईल बजेट मे इन्क्लुड की जाये। अभी हमारे सांगोळे भाऊ ने बताया उनके नारा घाट के कम्पाऊंड वॉल के लिए ५० लाख का टेंडर हो गया, वर्कआर्डर रोक दिया गया है। टेंडर होके डिसेंबर १८ तारीख को टेंडर अप्रुव्हल सॅग्शग के लिए आयुक्त साहब के पास गई थी। ऐसी तीन-चार फाईल है जो मेरे प्रभाग मे जरुरत की है वह फाईल भी इन मे इन्क्युड की जाये। जो भी दिव्यांगो का विषय है, घरकुल योजना जिसके बारे मे मिटींग हुई थी तो उसमे कहां गया था की २५ परसेंट देगें। वो भी अभीतक उन बच्चो को मिला नही है, अप्रुव्हल हो गया है परंतु मिला नही, कमसे कम इस बजेट मे दिया जाये। और इस बजेट मे भी जो बिजनेस के लिए और बचत गट के माध्यम से जो ट्रेनिंग के लिये दिया जाता है उसको भी दिया जाये। मुझे बोलने का मौका दिया, धन्यवाद.

श्रीमती दर्शनी धवड :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा. मनपा आयुक्त, मा.स्थायी समिती अध्यक्ष तसेच या ऑनलाईन बजेटच्या बैठकीत उपस्थित सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि सर्व महानगरपालिकेचे अधिकारी आणि माझे पत्रकार बंधू. सगळयांना नमस्कार आणि नवरात्रीच्या खुप खुप शुभेच्छा. दिनांक २० ऑक्टोंबर रोजी सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती अध्यक्ष श्री. पिंटू झलके यांनी मांडला त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करते. मा.महापौरजी, स्थायी समिती अध्यक्ष म्हणाले हे अंदाजपत्रक देण्यास उशिर झाला आहे त्यासाठी मी क्षमा मागतो. परंतु मा.महापौरजी, दोन तीन महिने नाही तर सात-आठ महिने उशिर झालेला आहे. मला असे वाटते खुपच जास्त उशिर झालेला आहे. मा. स्थायी समिती अध्यक्ष कुठे तरी चुकून राहिले. उशिरा का होईना सन २०२०-२१ चे अर्थसंकल्प मांडण्यात आले. या अर्थसंकल्पीय भाषणात मा.स्थायी समिती अध्यक्ष भाषणात म्हणाले, खेडे विभाग आणि अन्य सुविधा याकरिता ११.५९ लक्ष रुपयाची तरतूद केलेली आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत ही राशी कमी आहे. मागच्या वर्षी २० कोटीची तरतूद केलेली होती. मला असे वाटते ही राशी वाढवून देण्यात यावी मी तुमच्या मार्फत मा.स्थायी समिती अध्यक्षांना या गोष्टीकरिता विनंती करते. ५७२ व १९०० लेआऊटअंतर्गत विकास कामांकरिता २३.७५ कोटीची तरतूद केलेली आहे. मागच्या वर्षीच्या बजेटमध्ये ही २५ कोटीची तरतूद करण्यात आली होती. त्या वेळेस सुध्दा मी म्हटले होते की ही राशी वाढवून देण्यात यावी. माझ्या सारखे बरेच नगरसेवकांचे प्रभाग ५७२ आणि १९०० लेआऊट या भागात राहतात. आम्ही नगरसेवकांनी अशा भागात राहतांना ही कामे कशी करायची. मा.महापौरजी, माझ्या प्रभागात ८० टक्के भाग ५७२ आणि १९०० लेआऊटमध्ये येतो. तुमच्या मार्फत मा. महापौरजी मी स्थायी समिती अध्यक्षांना विनंती करतो की ही राशी वाढवून देण्यात यावी. मा.महापौरजी, १ लक्ष ३८ हजार एलएडी लाईट बदलण्याचे काम सन २०१७ मध्ये सुरु झाले. आणि २०१९ च्या बजेटमध्ये मा. प्रदिपजी पोहोणे जेव्हा स्थायी समितीचे अध्यक्ष होते तेव्हा त्यांनी म्हटले होते २०१९ मध्ये हे काम पुर्ण होईल असा त्यांचा मानस होता. आता मा.स्थायी समिती अध्यक्ष म्हणतात की संपुर्ण शहरामध्ये पथदिवे बदलण्याचे काम पुर्ण झाले आहे आणि उर्जा बचत सुध्दा झाली आहे त्यांनी आपल्या मागच्या भाषणात म्हटलेले आहे तर मा.अध्यक्ष स्थायी समिती साहेब तुम्ही खोटे बोलत आहे.जुलै २०१९ पासून धरमपेठ झोनमध्ये एलएडी लाईटचा सप्लॉय पुर्ण पणे बंद आहे. आमच्या झोनमध्ये एक वर्ष तीन महिन्यापासून एकही एलएलडी लाईट भेटत नाही. तुम्ही असे कसे म्हणू शकता की काम पुर्ण झाले आहे. तुम्ही खोटे बोलत आहे. मा.महापौरजी, कचरा संकलन करण्याकरिता या वर्षी बीव्हीजी आणि एजी कंपनीला काम देण्यात आले आहे. हे काम एक महिना फक्त महिना चांगले सुरळित राहिले अजूनही काम बरोबर झालेले नाही. मा.महापौरजी, मी आपल्या माध्यमातून स्थायी समिती अध्यक्षांना विनंती करते हे काम लवकरात लवकर व्यवस्थित करण्यात यावे. मा.महापौरजी,

ओसीडब्लू कंपनीला आपण आतापर्यंत करोडो रुपये दिलेले आहे. १ एप्रिल २०१४ मध्ये आपण ओसीडब्लू कंपनीशी करारनामा केला होता या सदनात हा विषय मंजूर झाला होता. २४ बाय ७ ही योजना संपुर्ण नागपूर शहरात लागू होईल. मा.स्थायी समिती अध्यक्ष महोदयांनी आपल्या भाषणात सांगितले संपुर्ण शहरात नागपूर महानगरपालिका समसमान पाणी देण्याचे काम महानगरपालिकेचे आहे आणि त्याची वाटचाल सुरु झाली आहे. मा. अध्यक्ष महोदय आपण परत खोटे बोलत आहे. माझ्या प्रभागात ४० टक्के जलवाहिनी टाकण्याचे काम अजूनही झालेले नाही. कामाला अजूनही सुरुवात झाली नाही. मी बाराही महिने टॅन्करद्वारे पाणीपुरवठा करीत राहिलेली आहे. मा.महापौरजी, आपण म्हटले होते की नागपूर शहर टॅन्कर मुक्त करु तर हे कसे शक्य आहे. कारण जेथे जलवाहिनी टाकण्याचे काम झालेले नाही तर तेथे कसे २४ बाय ७ पाणी पुरवठा करणार आहे. मा.अध्यक्ष महोदय आपण परत खोटे बोलत आहात. मा.महापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष यांनी सन २०२०-२०२१ च्या आर्थिक बजेटमध्ये २५०० कोटी अपेक्षित आहे आणि सुरवातीची शिल्लक २३१ कोटीची आणि एकुण उत्पन्न २७३१ कोटी असे आपल्या भाषणात बोलले आहेत. परंतु मा.स्थायी समिती अध्यक्ष महोदय आपण परत खोटे बोलत आहात. मा.महापौरजी, मागच्या वर्षीची जर २३१ कोटीची शिल्लक आहे तर मागच्या वर्षी ज्या विकास कामाच्या फाईली ज्यांचे वर्कआर्डर झालेले आहेत ते बजेट नसल्यामुळे थांबविण्यात आले. २३१ कोटीची जर शिल्लक होती तर ते काम कां सुरु करु देत नाही मला याचे उत्तर हवे आहे. मा.स्थायी समिती अध्यक्ष महोदय जी आपण परत खोटे बोलत आहात. या वर्षीचे अर्थसंकल्प २७३१ कोटीचे आहे मला सांगा मा.महापौरजी, या तीन महिन्यात विकास कामे कशी काय पुर्ण होणार आहेत. तुम्ही सत्तापक्षात आहात, सत्तापक्षाच्या बळावर हे बजेट तुम्ही मंजुर करणार हे मला माहीत आहे. परंतु हे बजेट मंजूर झाल्यानंतरही मा.आयुक्त याची अंमलबजावणी करण्याकरिता परवानगी देणार आहेत काय ? कारण कालच आमची बैठक झाली, त्यावरुन मला मुळीच वाटत नाही की हे बजेट लोकांच्या कामासाठी लागू होणार आहे. माझी मा.महापौरजी आपल्याला विनंती आहे की हे बजेट जर खरा आहे तर याची अंमलबजावणी करण्याकरिता आपण आयुक्तांना एक निवेदन दयावे. त्यांना मान्य करण्याकरिता सांगावे. मा.महापौरजी, एक शेवटचे म्हणणे होते की स्थायी समिती अध्यक्षांनी आपल्या भाषणात म्हटल्याप्रमाणे जर २३१ कोटीची शिल्लक आहे तर मागचा वर्षीच्या कामाचे पैसे ठेकेदारांना मिळाले आहे काय? मनपा कर्मचा-यांचे पगार रेग्युलर होत आहेत काय? कां रेग्युलर होत नाही. कर्मचा-यांचा जीपीएफ निधी जमा केला जात आहे का? केला जात नाही आहे मा.महापौरजी, कां जमा केलेला नाही. आतापर्यंत त्यांना सातवे वेतन आयोग कां लागू केले नाही. मा.महापौरजी, हे अंदाजपत्रक पुर्णपणे खोटे मांडण्यात आलेले आहे. या अंदाजपत्रकाला माझा तीव्र विरोध आहे. धन्यवाद.

श्रीमती प्रगती पाटील :- मा.महापौरजी, कोव्हीडने संपुर्ण जगाला विळखा घातला. त्यातल्या त्यात नागपूर शहरात सुध्दा कोव्हीडचा प्रार्दुभाव सुरु झाला. मा.महापौरजी, या कठीण परिस्थितीत मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी २७३१ कोटीचा अर्थसंकल्प आपल्या समोर सादर केलेला आहे मी मा.स्थायी समिती अध्यक्षांचे खुप खुप अभिनंदन करते. मा.स्थायी समिती अध्यक्षांनी ज्या काही योजना आणून त्या सर्व घटकातील, सर्व समावेशक असे बजेट बनविले त्याची प्रशासनाने अंमलबजावणी करावी असे सक्त निर्देश आपण प्रशासनाला दयावे अशी तळमळीची विनंती मी आपणांला करते. मा.महापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्षांनी एक प्रश्न समोर ठेवला की या कोव्हीडच्या परिस्थिती मध्ये लोकांचा रोजगार गेला, अर्थाजन थांबले. ज्या नागरिकांना मालमत्ता करात आणि पाणी करात शास्ती लावून आल्या आहेत त्या माफ करण्यात याव्यात अशी आयुक्त महोदयांना विनंती केली आहे तेही आपण सभागृहाच्या तर्फे मा.आयुक्तांना आदेश दयावे या शास्ती माफ करण्यात यावी.

सर्व योजनांचा विचारविनिमय करीत असतांना आरोग्यावर प्रकाश टाकतांना दिसत आहे. या कोव्हीडच्या परिस्थिती आरोग्य व्यवस्था अत्यंत चांगली असणे अत्यंत गरजेचे आहे. महानगरपालिकेच्या वतीने मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी ठेवला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. त्यांनी चालता फिरता दवाखाना जनतेसाठी आणला आहे. त्या दवाखान्यानुसार जे डॉक्टर, नर्सेस आणि यंत्रसामुग्री लागणार आहे तो पुर्ण करुन हा दवाखाना जनतेसाठी सामोर आणण्याची गरज आहे यासाठी प्रशासनाला तात्काळ आदेश दयावे अशी मी परत आपल्याला विनंती करते. मा.महापौरजी, जे प्रायव्हेट दवाखाने आहेत ते नागरिकांकडून अवाजवी वसुली करीत आहे. त्यांच्यावर कडक कार्यवाही करणे अतिशय गरजेचे आहे मा.महापौरजी आपण प्रशासनाला , आयुक्तांना तसे आदेश दयावे. मा.महापौरजी, मृतदेहासाठी १० शीतपेटी खरेदी करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती अध्यक्षांनी ठेवला आहे त्यासाठी मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे मी अभिनंदन करते. खासकरुन स्त्रीयांसाठी स्तन आणि गर्भाशयाचा कॅन्सरसाठी शिबीर आयोजित करण्याचे समोर ठेवले आहे, जेष्ठ नागरिकांसाठी शिबीर आयोजित करण्याचे समोर ठेवलेआहे. या सर्व आरोग्य विषयक सेवेकरिता मी त्यांची आभारी आहे त्यांना मी धन्यवाद देते. नवीन पीढीसाठी वंदेमातरम अमर जवान शहीद उद्यानाची निर्मीती, नवीन पीढीला सैन्यामध्ये जाण्यासाठी प्रेरणा कशी मिळेल या साठी मा.स्थायी समिती अध्यक्षांनी वंदेमातरम अमर जवानी शहीद उद्यानाची निर्मीती करण्याचे ठरविले आहे. यासाठी त्यांना मी शुभेच्छा देते आणि यासाठी परत मा.महापौरजी मी आपल्याला सांगू इच्छिते, आपण प्रशासनाच्या मागे लागून याची पुर्तता करावी. मा.महापौरजी,लहान मुलांमध्ये, नवीन पीढीमध्ये गणीताची गोडी कमी होत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी लहान मुलांमध्ये गणीताची गोडी निर्माण व्हावी यासाठी त्यांनी उद्यानामार्फत गणीताचा अभ्यास करावा याची निर्मीतीचा अतिशय चांगला उपक्रम मा. स्थायी समिती अध्यक्षांनी ठेवला आहे. यासाठी मा.स्थायी समिती अध्यक्ष यांचे अभिनंदन करते. महिला व बाल कल्याणच्या योजनेमार्फत चालणा-या सर्व योजना तत्कालीन मा.आयुक्तांनी सर्व योजना बंद केल्या होत्या त्या सर्व योजना चालू करण्यात याव्यात असे प्रशासनाला आदेश दयावे अशी विनंती करते. तसेच सगळयात महत्वाचा विषय आपण ठेवला असेल तर महानगरपालिकेकरिता स्वतंत्र विशेष पोलीस स्टेशन हा एक चांगला नवीन विषय आपण ठेवलेला आहे. मा.महापौरजी, मी आपल्याला विनंती करु इच्छिते की पोलीस स्टेशन निर्मीती करीत असतांना आपल्या शहरात ५० टक्के महिला वास्तव्य आहे. त्या पोलीस स्टेशनमध्ये आपल्या समस्या घेवून जाण्यासाठी घाबरत असतात. त्याकरिता महिलांकरिता एक महिला स्वतंत्र पोलीस स्टेशन करु शकले आणि ते महिला पोलीस स्टेशन महापालिकेत असले पाहिजे तसे आपण प्रशासनाला निर्देश दयावे. परत एकदा मी मा.स्थायी समिती अध्यक्ष यांचे खुप खुप अभिनंदन करते. त्यांचे हे अंदाजपत्रक सर्वसमावेशक आहे परंतु दर्शनी धवड ताई यांनी खोटे आरोप केले. दर्शनी धवड ताई मी तुम्हांला सांगू इच्छिते की मा.स्थायी समिती अध्यक्ष यांनी इतक्या कठीण परिस्थितीत अर्थसंकल्प सादर केला. इतके चांगल्या चांगल्या योजना आपल्या समोर ठेवल्या. या तीन-चार महिन्यात जर आपण पुर्ण करु शकलो तर दर्शनी ताई तुम्ही पाहिले आहे की अध्यक्ष महोदयांनी किती चांगल्या योजना आपल्या समोर ठेवलेल्या आहेत याकरिता अध्यक्ष महोदयांचे परत एकदा अभिनंदन करते. धन्यवाद.

श्रीमती हर्षला साबळे :- मा.महापौरजी, मा.उप महापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा. विरोधी पक्ष नेते, मा.आयुक्त साहेब, मा.सत्तापक्ष नेते, सभागृहातील सर्व नगरसेवक, नगरसेविका, कर्मचारी वर्ग, पत्रकारबंधु अंदाजपत्रक हे शहराच्या हिताचे असते परंतु या २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकात मागच्या वर्षी कामे घेण्यात आली परंतु माझ्या प्रभागातील कामे सोडण्यात आली तर ती कामे त्यामध्ये समाविष्ट करण्यात यावी. तसेच कोव्हीड महामारीमध्ये जी विकास कामे झाली नाही त्या कामांना मुदतवाढ देण्यात यावी. जेणे करुन

प्रभागातील महत्वाची कामे करण्यास आम्हांला सोयीस्कर होईल. कारण ती कामे फार महत्वाची आहेत. तसेच अति आवश्यक कामासाठी निधी आपण उपलब्ध करुन दयावा. मा.महापौरजी, जी ओसीडब्लू कामे करीत आहे त्याचा आपल्याला ही अनुभव आलेला असेल. माझ्या प्रभागामध्ये इतक्या दिवसापासून पाण्याची टंचाई नव्हती परंतु या वर्षी फार मोठी टंचाई झालेली आहे. ओसीडब्लूने जी जी कामे माझ्या प्रभागात केली आहे ती बरोबर केलेली नाहीत. कारण जेथे जेथे गड्डे केले आहे परंतु त्या त्या कामाची माहिती नगरसेवकांना नसते परंतु लोक ती कामे प्रत्यक्ष बघत असतात त्यामुळे सर्वप्रथम नगरसेवकांना माहिती देण्यात यावी. पाणी मिळत नाही म्हणून लोक वारंवारं आमच्या घरावर येतात. हा कुणाचा दोष आहे. मा.महापौरजी, त्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. मा.महापौरजी, ओसीडब्लूने कामे केली आहेत परंतु ती बरोबर केली आहेत किंवा नाही याकडे कुणाचे लक्ष नाही. ओसीडब्लू फक्त बीलच घेत असते काय ? पाण्याच्या प्रश्नाबाबत मी मी वारंवारं सभागृहात सांगत असते. पाण्याचा एवढा मोठा प्रश्न आहे. बाकी प्रभागात पाणी मिळते परंतु माझ्या प्रभागात पाणी मिळत नाही. लोकांना एवढया मोठया प्रमाणात बील पाठविणे बरोबर आहे काय? लोकांना पाणी मिळत नाही तरी लोक एवढया मोठया प्रमाणात बील भरणार आहेत काय? याकडे सभागृहाने लक्ष करावे. मा.महापौरजी, शहराच्या हदयस्थानी गांधीसागर तलावाची सुरक्षा भिंत पडलेली आहे त्याकडे सुध्दा दुर्लक्ष होत आहे. मी वारंवारं सभागृहात सांगत आहे त्याची भिंत खचलेली आहे त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. गांधीसागर तलावाची सुरक्षा भिंत खचलेली आहे त्या कामाचा निधी शासनाकडून उपलब्ध झालेला आहे ते काम लवकरात लवकर करण्यात यावे अशी सभागृहाला विनंती करते आणि मला दोन शब्द बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देते.

श्री.रमेश पुणेकर :- मा.महापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, हे जे बजेट सादर केलेले आहे ते मागच्या वर्षी जे बजेट सादर केलेले होते त्या मागच्या वर्षीच्या बजेटपेक्षा ३००-४०० कोटीने कमी बजेट सादर केलेले आहे त्याबद्दल मा.महापौरजी आणि स्थायी समिती अध्यक्ष यांचे अभिनंदन करतो. बजेटवर मला काही जास्त बोलायचे नाही.कारण मी काही दिवसापूर्वी आयुक्त साहेबांकडे, मा. आभाताई पांडे आणि मी एक डेप्युटेशन घेवून गेलो होतो. मस्कासाथ राऊत चौक या परिसरात इंग्रजांच्या काळातील एक ट्रंकलाईन आहे. त्या ट्रकलाईनवर लहान लहान गड्डे पडत आहे. ते लहान लहान गड्डे आता मोठे झाले आहे. एखादा माणुस त्या ठिकाणी पडला तर तो मरु शकतो. याला जबाबदार महानगरपालिकेचे प्रशासन राहणार आहे की सत्तापक्ष राहणार आहे. ज्या वेळी आयुक्तांकडे डेप्युटेशन घेवून गेलो आणि आयुक्तांना माहिती दिली तरी इमजंनसी कामावर आयुक्तांची बोलण्यास तयार नाही. आयुक्त ऐकण्याच्या तयारीत नाही. त्यामुळे जी घटना न होणारी ती घटना त्या ठिकाणी होण्याची शक्यता आहे. कुणाचा त्या ठिकाणी जीव गेला तर त्याला आयुक्त जबाबदार राहतील. मा.महापौरजी, मी आपल्याला अंदाजपत्रकाच्या माध्यमातून विनंती करतो, मस्कासाथ राऊत चौक या एरियामध्ये ट्रंकलाईनवर जे गड्डे पडले आहे ते बुजविण्याची परवानगी दयावी हीच विनंती आहे. तसेच डांबरीकरणाचे काम बजेटमध्ये समाविष्ट करण्यासाठी सांगितले होते. गांजापेठ ते शहीद चौक डांबरीकरण, गोळीबार चौक ते मस्कासाथ डांबरीकरण करण्यासाठी सांगितले होते ते काम बजेटमध्ये आलेले नाही. मागच्यावर्षी ते काम सांगितले होते ते सुध्दा आलेले नाही. सभागृहाच्या माध्यमातून विनंती करतो की त्या कामाला प्राधान्य देण्यात यावे. मा.स्थायी समिती अध्यक्षांनी त्या कामाला प्राधान्य दयावे असे सांगून आपले दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेते, मा.विरोधी पक्ष नेते, मा.पक्षाचे गटनेते, सभागृहातील

माझे सहकारी मा. नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार बंधू, मा.आयुक्त. निश्चितच मा.महापौरजी, सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्प दिनांक २०ऑक्टोंबरला मा.स्थायी समिती अध्यक्ष यांनी प्रस्तुत केला. त्या अनुषंगाने आज अर्थसंकल्पावर बोलण्याकरिता पाचारण केले त्याबद्दल आपले पुनश्च अभिनंदन करतो. मा.महापौरजी, आर्थीक अर्थसंकल्पावर चर्चा करीत असतांना आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली. मा. पिंटू झलके साहेब स्थायी समिती अध्यक्षांनी महानगरपालिकेचे बजेट पेश केले. या अर्थसंकल्पाला बीजेपीच्या नगरसेवकांनी वास्तविक बजेट असे नाव दिले. कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावाने संपुर्ण देशात नव्हे तर संपुर्ण विश्वात थैमान घातले असतांना संपुर्ण विश्व थांबले असतांना आणि आपला देशही कोव्हीड-१९ लो सामोरे जात असतांना अनेक घडामोडी नागपूर शहरात घडल्या. २० ते २२ लक्ष लोकसंख्या असलेल्या हे शहर, महाराष्ट्रातील दुस-या क्रमांकाचे शहर कोव्हीड महामारीच्या काळात लॉकडाऊनला सामोरे जात असतांना अनेक सामान्य गोरगरीब जनतेला आर्थिक फटका सोसावा लागला. तसेच त्या काळात मनपाची अपुरी वैद्यकीय सेवेचा नागरिकांना त्रास सहन करावा लागला नव्हे आजही करावा लागत आहे. त्या अनुषंगाने शहरातील अंतर्गत भाग मोठया प्रमाणात स्लम असून झोपडपट्टीमध्ये अनेक नागरिक राहतात. या वर्गाच्या हिताच्या दृष्टीने कोणतीही ठोस कार्य या बजेटमध्ये समाविष्ट करण्यात आले नाही. आज हे अंदाजपत्रक सादर करीत असतांना सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न २५०० करोड रु अपेक्षित धरुन मागच्या वर्षीची शिल्लक २३१ करोड आहे म्हणजेच २७३१ करोडचा हा अर्थसंकल्प आहे. हा काही लहान अर्थसंकल्प नाही. हा जर वास्तविक बजेट आहे तर या पूर्वी सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० हे काही वास्तविक अर्थसंकल्प नव्हते असे म्हणावयास हरकत नाही. हे अवास्तविक अर्थसंकल्प होते आणि नागपूरच्या लोकांना दुपारे दाखविणारे होते. आज हे २७३१ कोटीचे बजेट वास्तविक बजेट आहे तर यापूर्वीचे अर्थसंकल्प खोटे होते असे आपले प्रामाणिक मत आहे. जुने विकास कामांचा तीन वर्षाचे आर्थिक नियोजन बघता अनेक नगरसेवकांत भेदाभेद आणि तफावत करण्यात आली आहे. या नागपूर महानगरपालिकेच्या १५६ नगरसेवकांमध्ये समसमान विकास कामे वाटप करण्यात आलेली नाही. काही नगरसेवक करोडपती आहेत तर काही नगरसेवक लखोपती आहेत. तर  काही नगरसेवकांना विकास कामांकरिता काहीही निधी देण्यात आलेला नव्हता. त्यामध्ये ज्या करोडपती नगरसेवकांना फंड देण्यात आहे त्याचे कामांचे कार्यादेश थांबविण्यात आले होते. त्यांचे काम या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन त्या कामांना गती देण्यात येईल असे मा. स्थायी समिती अध्यक्षांनी आपल्या भाषणात म्हटले होते. ज्या नगरसेवकांना मागच्या अर्थसंकल्पात प्रावधान राशी मिळाली नाही त्याचे काय ? नागपूर शहरात अनुसुचित जाती असलेल्या लोकांची संख्या ५ लक्ष पेक्षा जास्त असून ते मोठया प्रमाणात महापालिकेच्या स्लम भागात राहतात. महाराष्ट्र शासनाच्या रमाई घरकुल योजनेत राज्यातील ५९ अनुसुचित जाती नवबौध्दांकरिता रमाई घरकुल योजना राबविण्यात येत असून नागपूर शहराच्या घरकुल योजनेच्या वाटपामध्ये पहिला हप्ता महानगरपालिकेचा सहभाग २ कोटीचा आहे. म्हणजे पहिला हप्ता एक लक्ष गृहीत धरला तर आपण २०० लोकांना घरकुल योजनेच्या पहिल्या हप्त्याचा लाभ देवू शकतो. म्हणजे हे कार्य किती  विसंगत अपमानित व अपमानास्पद आहे. नागपूर महानगरपालिकेचा फार महत्वाचा कणा जर कुठला असेल तर ते या महानगरपालिकेतील सफाई कमर्चारी आहेत. मा.महापौरजी, कोव्हीड-१९ या प्रादुर्भावामध्ये सर्वात जास्त प्रामाणिकपणे जर कुणी काम केले असेल तर या सफाई कर्मचा-यांनी काम केले. ते कचरा संकलनाचे सफाई कर्मचारी आणि ऐवजदार यांच्यावर यावर प्रादुर्भावाचा भार कोसळला होता आणि त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडली. अनेक वर्षापासून नागपूर शहराला स्वच्छ आणि सुंदर आणि गटारातून होणा-या अनेक संसर्गजन्य बिमा-या पासून रोखण्याचे कार्य या सफाई कर्मचा-यांच्या माध्यमातून होत असते. मा.महापौरजी शासन निर्णय दिनांक २० सप्टेंबर २०१९ नुसार

२७ फेब्रुवारी २०२० च्या आदेशान्वये सफाई कर्मचारी या पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या ऐवजदारांना दिनांक २८.०२.२०२० च्या नियुक्त्या आदेश अद्यापही पुर्ण झालेला नाही त्यातही शासन निर्णय १० फेब्रुवारी २०२० नुसार करण्याकरिता घनकचरा व्यवस्थापन यांना पत्र देवून सुध्दा लागू करण्यात आला नाही. तसेच शासन निर्णय १० फेब्रुवारी २०२० नुसार सुधारित करण्याची संबंधित विभागाने दखल घेतलेली नाही. तथा या अर्थसंकल्पात आणण्यासाठी साधी चर्चा सुध्दा करण्यात आली नाही. या अर्थसंकल्पामध्ये या शहरातील विकसनशील भागाकरिता विविध योजना गार्डन, स्मारक निर्माण करण्याकरिता पैसे राखून ठेवण्यात आले परंतु मागील कित्येक वर्षापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाकरिता राशी ठेवण्यात येते या अनुषंगाने मा.सदस्य श्री. इब्राहीम टेलर यांनी आपल्या भाषणात हा विषय ठेवलेला आहे. २९ वर्षापासून या प्रबंलित विषयाकरिता नागपूर महानगरपालिकेच्या प्रत्येक अर्थसंकल्पात २ करोड निधी राखीव ठेवण्यात येते परंतु कार्य मात्र शुन्य आहे. मग कॉंग्रेसच्या काळात जे घडले तेच आपले राज्य शासन असो वा मनपा या स्मारका संदर्भात दोन्ही पक्ष कॉंग्रेस व बीजेपी अप्रामाणिक आहेत हे सिध्द होते. म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान जगात होतो आणि मात्र या नागपूर शहरात होत नाही असेच म्हणावे लागेल. मा.महापौरजी, छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा नागपूर शहरात नाही. तो होण्यासाठी अनेक वर्षापासून या सभागृहात बीएसपीतर्फे सुचना केल्या जातात. परंतु याही महापुरुषाच्या पुतळयाबाबत आपण उदासिन आहात की काय? आर्थिकदृष्टया व सामाजिकदृष्टया मागासलेल्या समाजाला मानसन्मानाचे जीवन त्याचा आत्मसन्मान जागृत करुन आरक्षणाच्या माध्यमातून त्यांना अधिकार दिले अशाही महापुरुषाचा अपमान आपण करीत आहात. मा. महापौरजी, आरक्षणाच्या माध्यमातून सर्वात जास्त नगरसेवक आपल्या बीजेपीचे असून आरक्षणाचा लाभ तर घेतात परंतु ज्या महापुरुषाने या आरक्षणाची नींव मांडली त्या महापुरुषाचा सन्मान आपण व पक्ष करीत नाही हे सिध्द होते. मा.महापौरजी, आज जे अर्थसंकल्प सादर करण्यात आले ते सादर करण्यापूर्वी आमच्या बहुजन समाज पक्षाच्या नगरसेवकांनी पिंटू झलके मा.स्थायी समिती अध्यक्षांना काही पत्र दिले होते आणि त्यांना सुचना दिली होती की उत्तर नागपूर शहराच्या दृष्टीने मागासलेला भाग असून काही विशिष्ट विकास कामे करण्यासाठी विशेष हेडमध्ये निधी राखून ठेवण्यात यावा परंतु तसे काहीही घडलेले नाही. मी सुध्दा उत्तर नागपूर येथील कॅनल नाला जुने नाव म्हणजे चांभार नाला बनविण्यासंदर्भात एक पत्र दिले होते. कॅनल ची परिस्थिती आपण स्व:त प्रभाग ६ मध्ये येवून बघाल तर जागोजागी संपुर्ण कॅनल रस्त्याच्या कडेने तुटलेला आहे आणि कुत्र्याचा प्रादुर्भाव आहे. रस्त्याला लागूनच लहान लहान मुले खेळत असतात त्यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे संपुर्ण भिंतीकरिता या बजेटमध्ये या नाल्यासाठी विशेष पदाअंतर्गत राशी ठेवण्याची सुचना आपल्या माध्यमातून मा.स्थायी समिती अध्यक्ष यांना करतो. उत्तर नागपूर आशीनगर झोन अंतर्गत येणा-या प्रभागासाठी कोणत्याही प्रकारचे ठोस विकास कार्य समाविष्ट केलेले नाही. मा.महापौरजी, २७३१ करोडचे अर्थसंकल्प आहे हा पोकळ असा अर्थसंकल्प आहे. हया अंदाजपत्रकाला मी व माझे बीएसपीचे नगरसेवक विरोध प्रदर्शित करतो. या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने मी काही सुचना करीत आहे. त्या लेखी मी आपणास सुपुर्त करणार आहे. मा.महापौरजी, आशीनगर झोन अंतर्गत चार प्रभाग येतात. त्या प्रभागामध्ये प्रभाग क्र. ३, प्रभाग क्र. २, प्रभाग क्र. ६ आणि प्रभाग क्र. ७ या अर्थसंकल्पीय बजेटमध्ये १६ नगरसेवक आशीनगर झोन अंतर्गत येत असून या शहरातील इतर भागामधील गार्डन असो किंवा त्याचे सौदर्यीकरण असो. शहीद सैनिंकासाठी उद्यान उभे करण्याकरिता एक जी योजना राबविण्यात येणार आहे त्याबद्दल अभिनंदन करतो. माझ्या प्रभाग क्र. ६ मध्ये शितला माता मंदीरातील अनेकदा महिला आमच्या येतात त्यांची या ठिकाणी गार्डन निर्मितीची मागणी अनेक वर्षापासून येत आहे. स्थायी समिती चेअरमन असतांना अनेक वर्षापासून मागणी येत आहे. त्या क्षेत्रामध्ये उद्यान निर्मितीची गरज आहे. तो विषय

महानगरपालिकेच्या अखत्यारित असल्यामुळे ती फाईल एनआयटीची कडून तत्कालीन आयुक्तांकडून मागविण्यात आली परंतु त्यावर कोणत्याही प्रकारची युझर चेंज करण्याची कार्यवाही वा उद्यान विकसित करण्याची कार्यवाही झाली नाही. आपल्या महानगरपालिकेचे कर्मचारी किती उदासिन आहेत किती कर्तव्यदक्ष आहेत याची आपल्याला कल्पना असेल. मा.महापौरजी, महेन्द्रनगर मैदान येथील शितला माता मंदीर येथे उद्यान विकसित करण्यात यावे तसेच  रिंग रोड ते चिमुरकर लेआऊट या रस्त्याची कंडीशन जर तुम्ही बघाल तर हा रस्ता राज्य शासनाचा आहे. मी निवडून आल्यानंतर माझ्या प्रभागातील रस्ता असल्यामुळे ती जबाबदारी माझ्यावर आहे. तो माझ्या वार्ड फंडातून करता येणे शक्य नाही.त्या रस्त्याची दीड करोडची फाईल मा. कुकरेजा साहेब स्थायी समिती अध्यक्ष असतांना बनविली, ती दीड करोडची फाईल तयार झाली तत्कालीन मा.आमदार साहेब त्या वेळेस म्हणायचे की मी हा रस्ता बनवून देतो. परंतु तो रस्ता तयार न झाल्यामुळे नागरिकांच्या शिव्याशाप आम्हांला खाव्या लागतात. इतकेच नव्हे तर मागच्या वर्षी ६५ लक्षाची फाईल पाण्याचे आऊटलेट नसल्यामुळे कॅन्सर हॉस्पीटलच्या पाठीमागे नवीन यशोधरा स्कुल तयार झाले आहे त्या एकता कॉलनी येथे पावसाळयात संडासाचे पाणी लोकांच्या घरातून वाहत आहे. या स्थितीची पाहणी करण्याकरिता त्या एरियाचे स्थानिक अधिका-यांना घेवून गेलो आणि ६५ लक्षाची फाईल तयार झाली. त्यासाठी २० लक्षाचे प्रावधान देण्यात आले. ६७ लक्षाचे टेंडरींग झाले परंतु आऊटलेट करण्याकरिता ते काम झालेले नाही. इतकेच नव्हे तर चांभार नाला आहे त्या चांभार नाल्याची जी परिस्थिती आहे ती अत्यंत वाईट परिस्थिती आहे. तो नाला पुर्णपणे खचलेला आहे. त्या चांभार नाल्याला कुठे ना कुठे दोन-चार लक्षाचा पॅच मारला जातो परंतु तो प्रापर रुपाने नाला तयार होत नाही. नाल्याची ठिकाणी एस.सी., एस.टी., ओ.बी.सी., मुस्लीम समाजाचे लोक मोठया प्रमाणात राहतात. गोरगरीब जनता त्या ठिकाणी वसलेली आहे. या विषयाच्या संदर्भात या सभागृहामध्ये वास्तविक परिस्थिती आम्ही मांडलेली आहे. आता या कोव्हीड-१९ च्या काळामध्ये शाळा बंद आहेत. जे लोक लहान लहान झोपडपट्टीमध्ये राहतात, त्या लोकांच्या मुलांना शिक्षणाच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे असे म्हटले तर महात्मा ज्योतिबा फुले यांनी म्हटले, विद्या विना मती गेली, मती विना गती गेली, गती विना वित्त गेले, एवढे काम एका अविद्येने केले  त्यामुळे शिक्षण घेणे गरजेचे असून शिक्षणामुळे शुद्राचा विकास झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शाहु महाराज यांचे तैलचित्र आपण बजेट पुस्तिकेमध्ये लावले परंतु त्यांच्या दिशानिर्देशानुसार या शहरातील ३३ टक्के लोक जे दुर्बल घटकातील वसलेले आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी ठोस कार्य या अंदाजपत्रकात दिले गेले नाही. लायब्ररीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे कार्य केले नाही. कारण मुलांना घरी अभ्यासाला बसायला जागा नाही आहे. पंचशील लायब्ररी असो, रुईया लायब्ररी असो. किंवा टेका नाक्यावरील सिध्दार्थ नगर लायब्ररी असो. तक्षशिला लायब्ररी असो. विहारात आणि समाजमंदीरामध्ये संपुर्ण विद्यार्थी बसुन अभ्यास करीत असतात अशा परिस्थितीमध्ये आयुक्तांना सुध्दा या संदर्भातील निवेदन दिले. या बाबी बजेटमध्ये उत्तर नागपूरमध्ये चार प्रभागाच्या दृष्टीकोनातून कुठेही विकासाचा ठोस कार्यक्रम घेण्यात आलेला नाही.  सुधारित बजेटमध्ये प्रावधान देत असतांना करोडपती नगरसेवकांना प्रावधान दिले जाईल परंतु येणा-या आर्थिक वर्षाची कामे करण्याकरिता उत्तर नागपूरमध्ये फक्त २०-२२ लक्ष रुपयेच दिले आहेत तर या २२ लाखामध्ये उत्तर नागपूरच्या नगरसेवकांना खुश करणार आहे काय?  परत पुनश्च प्रावधान करुन कार्यान्वित करुन या नवीन बजेटमध्ये या नगरसेवकांना जो इन बॅलेन्स झालेला आहे तो इन बॅलेन्स पुर्ण करण्याचा आपल्या माध्यमातून प्रयत्न करावा. निश्चितच मधल्या काळामध्ये मनिषा वाल्मिकी या मुलीवर अमानुष पध्दतीने बलात्कार झाला. ॲडमिनीस्ट्रेशनने त्यांच्यासोबत न्याय न करता ते सगळे साक्ष लपविण्याकरिता जाळपोळ केली. त्यांचा निषेध करतो आणि श्रध्दांजली अर्पण करतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचा पटवर्धन मैदानाचा जो प्रश्न आहे तो आपल्या कार्यकाळामध्ये लवकरात लवकर पुर्ण करावा. कारण मागील महापौरजी यांनी सगळया गोष्टी झाल्या, भेटी झाल्या. जागेच्या संदर्भाने ४९ हिअरिंग बांगर साहेबांनी क्लिअर केल्या. हा प्रस्ताव राज्य शासनाकडे गेलेला आहे. त्याचा पाठपुरावा आपण तात्काळ करावा आणि या आपल्या कार्यकाळात या अर्थसंकल्पामध्ये त्या कामाचे भुमिपुजन करुन कार्यरत करावे या सदनाच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो. या बजेटमध्ये ज्या सुचविलेल्या सुचना आहेत. नाल्याच्या बांधकामाच्या संदर्भातील, विकासाच्या संदर्भातील त्या पुनश्च टाकून सदनात मंजुरी देण्यात यावी. निश्चित आपली संख्या जास्त आहे. आम्ही विरोध केला तरीही आपण बहुमताने बजेट पास करुन घ्याल यात दूमत नाही. तरीही या बजेटच्या अनुषं्गाने, या शहरातील विकास कामाच्या संदर्भाने ओ.सी.डब्लू.ने माझ्या क्षेत्रामध्ये अनेक कनेक्शन लावले परंतु डिस्ट्रीब्युशन मिळत नाही. ओसीडब्लूला इतका पैसा देतो परंतु ते रिस्टोरेशन करीत नाही. तसेच शास्ती माफ करण्याचा निर्णय या कोव्हीडच्या काळामध्ये पाण्याचा बीलाचा अतिभार नागरिकांवर आलेला आहे. तो कमी करण्याचा आणि दरवर्षी आपण पाणी संकलनावर ५ टक्के दरवाढ करीत होतो ती करवाढ यावेळेस १५ टक्के वाढविण्यात आली होती ते अंतर्भुत करावे. शास्ती माफ करण्याचा निर्णय या आधी आयुक्तांनी केलेला आहे परंतु तत्कालीन आयुक्तांनी केलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेकडे जास्तीचा पैसा येईल त्यामुळे शास्ती माफ करण्यास्तव कार्यवाही करण्यात यावी अशी आपल्याला सभागृहाच्या माध्यमातून विनंती करतो, जयभीम , जयभारत.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, स्टॅन्डिंग कमेटीचे चेअरमन आदरणीय श्री. पिंटूजी झलके यांनी २० तारखेला आपला बजेट मांडला. त्या बजेटमध्ये ब-याच गोष्टी हया कोव्हीडचा माध्यमातून कोव्हीडचा प्रभाव आहे त्या अनुषंगाने ५० टक्के गोष्टी अंतर्भुत करण्याचा प्रयत्न केला. त्यात काही गोष्टीचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. मा.महापौरजी, या कोव्हीडच्या काळामध्ये अनेक प्रायव्हेटमध्ये काम लोकांच्या नोक-या गेल्या, सरकारी कर्मचारी यांना तर पगार मिळत होता. मात्र जे प्रायव्हेटमध्ये काम करीत होते त्यांच्या पगारामध्ये कपात केली गेली. मी स्वागत यासाठी करीत आहे की आपल्या कोणत्याही झोनमध्ये जे करदाते आहेत ज्यांच्यावर बकाया आहे त्यांच्यावर शास्ती लावण्यात येते. त्यांच्यावर या काळात जी शास्ती लागली ती माफ करण्याचा प्रयत्न आपल्या माध्यमातून आणि मा. स्थायी समिती चेअरमन पिंटूजी झलके यांच्या माध्यमातून आपण प्रयत्न करीत आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि आपण सर्वांचे अभिनंदन करतो. मा.महापौरजी, पाण्याच्या बाबतीत सुध्दा या सात-आठ महिन्याच्या काळात अनेक लोक ज्यांच्यावर अनेक वर्षापासून सरकारचे पैसे असो, इलेक्ट्रिकच्या माध्यमातून आपण अनेक वर्षापासून प्रयत्न करीत होतो परंतु त्याला यश आले नाही. परंतु या महानगरपालिकेत आपली बीजेपीची सत्ता असल्यापासुन अशा शास्ती माफ करण्यात येत आहे त्याबद्दल खुप खुप अभिनंदन करतो. मा.महापौरजी, दरवर्षी आपल्या ओसीडब्लूच्या माध्यमातून ४ टक्के वाढ ठरलेली आहे. ही वाढ ठरली असतांना या कोव्हीडच्या काळात अनेक लोकांची आर्थिक स्थिती फार वाईट झाली आहे. आपण हे ५ टक्के वाढीव दर माफ करावे, आपण ते माफ करीतच आहे त्याबद्दल आपले अभिनंदन करणे उचित असे आहे. मा.महापौरजी, एक विषय असा आहे तो बजेटशी संबंधित नाही परंतु मी सांगत आहे. ओसीडब्लूचे लीकेज मीटर अनेक लोकांच्या घरी लावले आहेत. आधी लोकांना तीन-तीन महिन्याचे बील दोन-तीन हजार येत होते ते आता त्या लिकेज मिटरमुळे २०-२० हजार, ३०-३० हजार रुपये बील आले आहे. अशी २५-५० प्रकरणे आपल्या लक्ष्मीनगर झोनमध्ये आहेत. वारंवारं ओसीडब्लूकडे गेल्या नंतर ते मिटर चेक केल्यानंतरही ते लिकेजचे बील कमी करण्यास तयार नाही.

मा.महापौरजी, या कोव्हीड च्या काळात साधारण व्यक्ती ज्याला हजार-दोन हजार रुपयाचे बील येत होते आणि आता त्यांना लिकेज कुठे आहे हे माहीत नसल्यामुळे त्यांना २५ हजार रुपयाचे बील येत आहे. अशा प्रकारे त्यांना खायला पैसे नाही त्यांना २५ हजाराचे बील पाठविणे हा त्यांच्यावर एक प्रकारचा अन्याय आहे. मा.महापौरजी,मा.स्थायी समिती अध्यक्षांना आणि आपल्याला विनंती आहे आपण त्या बीलाच्या संदर्भात आणि लिकेज मीटरच्या संदर्भात, जे पहिलेचे बील होते ते त्यांना दोन हजार रुपये येत होते आणि आता त्यांना २५ हजार, ३० हजार रुपयाचे बील येत आहे. या सर्व बीलावर निर्णय घ्यावा. दक्षिण पश्चिम मतदार संघातच नाही तर लिकेजच्या संदर्भात दहा झोनमध्ये अनेक तक्रारी आहेत याचा विचार करण्याची गरज आहे. मा.महापौरजी, मा.स्थायी समिती चेअरमन यांचे विशेष अभिनंदन यासाठी करतो की दक्षिण पश्चिममध्ये जे ५ खेडे येतात. या वेळेस या खेडयांसाठी ११.५९ लक्ष रु. ठेवण्यात आले. जेव्हा महानगरपालिका निर्माण होत नव्हती तेव्हा आजूबाजूच्या क्षेत्रातील ३२ खेडे महानगरपालिकेत समाविष्ट करुन नागपूर महानगरपालिका निर्माण करण्यात आली होती. परंतु आजही पाहाल तर हे खेडे शहरात असूनही त्याची स्वरुप ही खेडयांसारखी आहे. मा.महापौरजी, या खेडयांसाठी ११.५९ लक्ष रु. या कोव्हीच्या काळात मा. स्टॅन्डिंग चेअरमनने ठेवले त्याबद्दल अभिनंदन करतो. माझी विनंती आहे मा.महापौरजी, हा निधी या खेडयांसाठीच नक्कीच खर्च करण्यात यावा. मा. महापौरजी, एक अभिनंदनाची बाब आहे. आपण दक्षिण पश्चिममध्ये अनेक प्रकारचे एलएडी लाईट लावले. पूर्वी जे पोल लागले होते त्या तीन पोलवर अंतराने एक-दोन पोल सोडून लाईट लागलेले असायचे आणि त्यामुळे मध्ये मध्ये अंधार असायचा. त्यामुळे अनेक लोकांच्या तक्रारी असायच्या. मा.महापौरजी, त्या काळात मा.देवेंद्रजी फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, दक्षिण पश्चिमच नाही तर या नागपूर शहरात अनेक प्रकारचे पोल उभे केले होते. जेथे तीन पोल होते त्यावर पाच-सात वर्षापासून लाईट लागलेले नाहीत. मा.महापौरजी, दोन वर्षापासून, तीन वर्षापासून आम्हांला जनता विचारत आहे. मागच्या वेळेस या संबंधित टेंडर सुरु आहे. हे टेंडर मग जो कुणी ठेकेदार असेल, आपण ताबडतोब वर्कआर्डर देवून त्याला लवकरात करण्यात यावे. या नागपूर शहरातील जनतेकरिता ते करणे आवश्यक आहे. कारण हा काही दोन-तीन सभापतीचा प्रश्न नाही तर संपुर्ण नगरसेवकांचा हा प्रश्न आहे त्यांना लोकांकडून विचारले जात आहे. याचा सुध्दा लवकरात लवकर वर्कआर्डर करण्यात यावा. मा.महापौरजी, अजून एक अभिनंदनीय बाब आहे. या नागपूर शहरात अनेक लोक, अनेक जवान ज्यांचा देशाच्या जडणघडणात हातभार लागला. अनेक प्रकारचे खेळाडू या नागपूर शहरातून निर्माण झालेत. या शहराचे नाव त्यांनी उंचावले आहे. मा.महापौरजी, आपण खेळासाठी प्रावधान दिले आहे. मा. स्थायी समिती अध्यक्षांनी १८ कोटीचे प्रावधान केलेले आहे. असे अनेक नेते आहेत ज्यांच्या नावाने हे शहर ओळखले जाते. ते आपल्या कार्याने शहराला नावरुपास आणतात. तसेच खेळाच्या बाबतीत सुध्दा, अनेक खेळाडू या शहराचे नाव उंचावू शकतात. मा.महापौरजी, खेळ हा मग कोणताही असो. तो साधारण खेळ नसतो. मा.महापौरजी, संस्कृतमध्ये म्हण आहे की 'शरीर आदयगुरु, धर्म साधनम्'. कोणताही खेळ खेळत असतांना पहिले प्रत्येकाचे शरीर सृढ होत असते. ज्याचे शरीर सृढ असते तो व्यक्ति समाजाचे योग्य आणि धर्माचे योग्य करीत असतो. ज्याचे शरीरच चांगले नसेल आणि मनात मात्र देशासाठी, समाजासाठी इतके कार्य करायचे आहे. परंतु शरीरच साथ देत नसेल तर तो काही करु शकत नाही. प्रत्येक खेळाडूचा वाटा हा खेळातूनच निर्माण होत असतो त्यामुळे मा.महापौरजी मी अभिनंदन करतो. आपल्या महानगरपालिकेने १८.२७ करोड रुपयाचे प्रावधान केले. याविषयी मी विशेष मी अभिनंदन करु इच्छितो, आपण इंग्रजी शाळेच्या बाबतीत सुध्दा योग्य निर्णय घेतलेला आहे. मागच्या वेळेत इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न केला होता. आपले स्टॅन्डिंगचे चेअरमन यांचा विचार आहे की आपल्या माध्यमातून मुलांपर्यंत लवकरात लवकर यावे. मा.महापौरजी,आपल्या महानगरपालिकेने शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये या शहराला इंग्रजी

माध्यमाच्या शाळा निर्माण करुन दिल्या. आपल्या महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या चांगली आहे आणि आपले शिक्षण समितीचे सभापती यांनी सुध्दा नागपूर शहरातील विधानसभा क्षेत्रांना इंग्रजी शाळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या शाळेच्या माध्यमातून मी आपल्याला काही गोष्टी निदर्शनास आणू इच्छितो, शिवणगावचे पुर्नवर्सन झाले या शिवणगावमध्ये नागपूर महानगरपालिकेची एक मोठी हायस्कुलची शाळा होती. ती शाळा जिर्ण झालेली आहे आणि आता मिहानमध्ये पुर्नवर्सन झालेले आहे मा.महापौरजी. मिहानमध्ये शाळा बांधण्यासाठी जागा दयायला तयार आहे. अशा पध्दतीने इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढाव्या मा.महापौरजी. जे जागा देण्यात तयार आहेत तर आपल्या माध्यमातून पाठपुरावा लावला तर एक चांगली शाळा आणि नवीन इमारत तयार होवू शकते. मा.महापौरजी, ती जागा हस्तांतरीत करण्यासाठी आपल्याकडून पाठपुरावा करण्यासाठी एका विशेष व्यक्तिची नियुक्ती करण्यात यावी. त्या जागेवर मिहानने दिलेला पैसा आणि काही पैसा नागपूर महानगरपालिकेने देवून त्या ठिकाणी एक इंग्रजी माध्यमाची चांगली शाळा निर्माण करावी अशी सुचना देतो मा.महापौरजी. यावर्षी १५.७८ कोटी रुपये महसुली आणि भांडवली खर्च शिक्षणावर खर्च होत आहे. मा.महापौरजी, कितीही कोव्हीडचे संकट असले तरी आता घोडेस्वार साहेबांनी सांगितले शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे आणि शिक्षणानेच माणसाची प्रगती झालेली आहेआणि आपला देशही हा विकसनशिल देश आहे आणि विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आपल्या देशातील विद्यार्थी हे मोठया प्रमाणात शिक्षण घेत आहेत आणि त्यामुळेच देशाचा प्रगती होत आहे. नागपूर महानगरपालिकेने शिक्षणाकरिता आपण १५ कोटी रुपये ठेवले त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. कारण या कोव्हीडच्या परिस्थितीमध्ये महानगरपालिकेला खुप मोठी आवक नाही आहे, महानगरपालिकेकडे पैसा नाही तरीही या परिस्थितीमध्ये शिक्षणाकरिता पैसा ठेवला त्याकरिता विशेष धन्यवाद देतो. मा.महापौरजी, अनेक गोष्टी लिहिल्या जातात. नागपूर महानगरपालिकेकरिता पोलीस स्टेशनची निर्मिती करावी, महानगरपालिकेचे टॅक्स कलेक्शन, अवैध अतिक्रमणामध्ये काम करीत असतांना महानगरपालिकेच्या कर्मचा-यांवर नागरिक धावून जातात. माजी मा.मुख्यमंत्र्यांची सुध्दा इच्छा होती, मनपाचे पोलीस स्टेशन निर्माण करावे. मा.महापौरजी, फारच अभिनंदनीय अशी बाब आहे. तर याचे लवकरात लवकर वर्कआर्डर कडून महाराष्ट्र सरकारकडून याच्या परवानगी आणल्या तर फार बरे होईल. मा.महापौरजी, सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने अनेक आश्वासन या सभागृहाने दिले. राज्य सरकारकडून सुध्दा याला पाठपुरावा केला. नागपूर महानगरपालिकेमध्ये काही शिक्षकांचा पगार हा सातव्या वेतन आयोगाच्या माध्यमातून आपण देतो. परंतु नागपूर महानगरपालिकेच्या अनेक कर्मचा-यांना डायरेक्ट पगार देते त्यांना आजही सातव्या वेतन आयोगानूसार पगार देत नाही. एकच संस्था आहे परंतु काही शिक्षकांना करीत असतांना सातवे वेतन आयोगानुसार पगार मिळतो तर बाकी कर्मचा-यांना सातवे वेतन आयोग लागलेला नाही हे सगळे एकाच संस्थेत काम करणारे लोक आहेत आणि त्यामुळे एकाच संस्थेत काम करणा-या कर्मचा-यांना वेगवेगळया आयोगानुसार पगार देणे हे योग्य नाही, अन्याय करणारे आहे मा.महापौरजी. अनेक बाबतीत निर्णय लागू होतात तर या बाबतीतही निर्णय करुन हा अन्याय दूर करण्यात यावा. मा.महापौरजी, कोव्हीड हॉस्पीटलच्या बाबतीत, नागपूर शहरामध्ये अनेक हॉस्पीटल कोव्हीडच्या हॉस्पीटल मध्ये स्थानांतरीत करण्यात आले. मा.महापौरजी तसे नियमही शासनाच्या माध्यमातून ठरविण्यात आले मात्र काही हॉस्पीटलवाल्यांनी जास्तीत जास्त पैश्याची लूट या माध्यमातून केली. काही लोकांचे पाच –पाच लाख, काही लोकांचे आठ-आठ लाख असे बील काढले. माझ्याकडे असे पाच-सहा लोक आहेत. यामध्ये काही हॉस्पीटलवाल्यांनी हुशारी केली. ८० टक्के शासनाच्या निर्णयाप्रमाणे आणि २० टक्के त्या हॉस्पीटलच्या निर्णयाप्रमाणे पैसा घ्यायचे. काही हॉस्पीटलमध्ये असे झाले त्या पेशंटच्या नातेवाईकाकडून लिहून घेतले की २० टक्के मध्ये तुम्ही आहात.

त्याच्याकडे ८० टक्के खाटा खाली असतांनाही ८० टक्के खाटावरती शासननिर्णयाप्रमाणे पैसे घ्यावयाचेअसल्यावरही त्या पेशंटकडून सहा-सात लाख रुपये, बारा-बारा लाख रुपये बील काढले. ८० टक्के शासन निर्णयाप्रमाणे एखादा रुग्ण हॉस्पीटलमध्ये गेला तर त्याच्याकडून जेवढे पैसे घ्यायचे होते ते त्यांनी हॉस्पीटलच्या २० टक्केप्रमाणे त्यांच्याकडून लिहून घेतले मा.महापौरजी. अशा ज्या केसेस आहेत मा.महापौरजी, माझे काही चुकत असेल परंतु अशा केसेसमध्ये माझ्याकडे पाच केसेस आहेत त्या पेशंटकडून हॉस्पीटलवाल्यांनी आधीच लिहून घेतले की तुम्ही २० टक्केमध्ये आहे.ऑडीटरला ऑडीट करतांना काही विचार करण्याची गरज नाही मा.महापौरजी. त्यांची त्या वेळेस ८० टक्के खाटा भरल्या होत्या काय ? जर त्यांच्या ८० टक्के खाटा भरलेल्या असेल आणि २० टक्के खाटाच शिल्लक असेल आणि त्यांनी लिहून घेतले असेल तर फार मोठी पध्दतीची फसवणुक या कोव्हीडच्या काळात झाली आहे. मा.महापौरजी, वंदेमातरम शहीद स्मारक सारख्या उद्यानाची निर्मीती या काळात आपल्या माध्यमातून होत आहे. अशा पध्दतीचे दिल्लीमध्ये झाले आहे. त्याचप्रमाणे अंदमान निकोबारमध्ये लाईट शो ची निर्मिती झाली आहे. शहरात लोक जातात आणि एखादया विशेष बाबीकडे जेव्हा लक्ष देतात. मा.महापौरजी, १ लक्ष स्केअर फुटाची असलेल्या जागेत वंदे मातरम शहीद उद्यानाची निर्मिती होत आहे. शहरातील ज्या ज्या लोकांचा देशाच्या जडणघडणामध्ये वाटा आहे. इंटरनॅशनल लेव्हलवरच्या उद्यानाची निर्मीती आपल्या माध्यमातून करतो आहे. ही अभिनंदनीय गोष्ट आहे. जी विशेष अभिनंदन आदरणीय पिंटू झलके यांचे करतो, अभिनंदन यासाठी करतो, येत्या कठीण परिस्थितीत आठ महिन्यापासून या कोव्हीडच्या काळात या शहरात आणि संपुर्ण देशात आणि संपुर्ण जगात लादल्या गेला आहे. या काळात हे बजेट होते किंवा नाही अशी शंका सर्व नगरसेवकांच्या मनात होती. तरीही हे बजेट मांडले. ज्या हिशेबाने या शहराच्या विकासासाठी प्रयत्न करीत. कारण मागच्या वर्षी आमचे पैसे थांबलेले होते. माझ्या सारख्या सामान्य नगरसेवकाचे पैसे थांबलेले होते. जितके जितके पैसे थांबले आहे त्याकरिता ४५ कोटी ठेवलेले आहे. इतक्या कठीण परिस्थितीत इतके चांगले बजेट मांडणारे आदरणीय महापौरजी आपण आणि त्याचप्रमाणे स्थायी समिती अध्यक्ष श्री. पिंटूजी झलके यांचे अभिनंदन करतो आणि आपल्या शब्दांना विराम देतो. धन्यवाद.

श्री.विरेंद्र (विक्की) कुकरेजा :- मा.महापौरजी, मा.सभापती, स्थायी समिती श्री विजय झलके इन्होने जो २० तारीख को जो बजट दिया है, उन्होने कोरोना के काल के अंदर मे एक संतुलित बजट दिया है। किसी भी स्थायी समिती अध्यक्ष को जब मौका मिलता है, तो उसका प्रयास यह होता है कि, इस बजट के अंदर मे कही न कही मेरे हस्ताक्षर होने चाहिये, शहर मे कुछ ऐसे काम करना चाहिये कि जिससे उन्हे आगे आनेवाले समय मे याद रखा जाये। मा.महापौरजी, श्री विजय झलके जी ने एक अच्छा प्रयास किया है जो काम चले आरहे है जो प्रलंबित है उन कामो को पुरा करने का विशेष रुपसे प्रयास किया है। इसके लिये बहोत बडा मन लगता है, स्थायी समिती अध्यक्ष रहते हुऐ हमारे सारे काम निपटने चाहिये, ऐसी स्थायी समिती अध्यक्ष की भावना होती है, मैं मा.स्थायी समिती अध्यक्ष का अभिनंदन करना चाहुंगा कि, कोरोना के कार्यकाल मे विशेष रुपसे उन्होने हेल्थ सेंटर को बढाने का काम किया है अपॅडेमिक के लिये मा.आयुक्त ने ८ लाख रुपये बजट मे रखे थे और मा.अध्यक्ष, स्थायी समिती ने वह राशी बढाकर १० करोड की है, ताकि महानगरपालिका सक्षम हो, साथ ही साथ दवाईयों के लिये उन्होने राशी बढाकर ७५ लाख से देड करोड रुपये की है, नये दवाखाने बनाने के लिये राशी देने का प्रयास मा.अध्यक्ष स्थायी समितीने किया है। हेल्थ सेंटर के माध्यम से महानगरपालिका ठिक ढंग से कोरोना से लडाई लडरही है, इस बात के लिये मैं मा.अध्यक्ष, स्थायी समिती का अभिनंदन करता हुॅं। पांचपावली सुतिकागृह के लिये उन्होने २५ लाख रुपये रखे है इस बात के लिये मैं उनका विशेष रुपसे

अभिनंदन करता हुँ। मा.महापौरजी, मैं एक निवेदन करना चाहता हुँ कि, अभी जो ५७२-१९०० लेआउट एन.आय.टी.से महानगरपालिका को हस्तांतरण हुऐ है, आउटर वार्डो के अंदर मे बहोत ज्यादा विकास के काम करने जरुरी है और उसके लिये जो राशी रखी हुई है वह बहोत कम है, उस राशी को बढाने की आवश्यकता है, यह बजट संतुलित बजट है, सिव्हेरेज हो, रोड हो, सभी जगहो पर काम करने का प्रयास इस बजट के माध्यम से किया गया है। मा.महापौरजी, हर साल बजट बढता है, लैकिन मा.अध्यक्ष, स्थायी समिती ने इस बजट मे संतुलित आंकडे रखने का काम किया है, हम सभी नगरसेवको का काम है कि, अधिकारीयो को मदद करके महानगरपालिका की इनकम बढाने के प्रयास करे। हम मा.सदस्यो ने अधिकारीयो के साथ मिलकर इस कोरोना के कार्यकाल मे जो फिगर मा.अध्यक्ष, स्थायी समिती ने बताये है, उसे प्राप्त करने के प्रयास करना चाहिये, बजट थोडा लेट जरुर हुआ है, ऐसा लगरहा था कि, बजट कैसे होंगा, कब होंगा लेकिन प्रॅक्टीकली इन सब अडचनो को ध्यान मे रखते हुऐ सही समय पर यह बजट देने का प्रयास किया है, मैं मा.निगम आयुक्त महोदय से यह निवेदन करना चाहता हुँ कि, बजट इम्पलीमेंट होने के बाद पिछले ८-१० महिने से हमारे प्रभागो मे १-१ लाख रुपये बचे रहते है, मगर आज देखने मे यह आरहा है कि, प्रभागो मे सुविधा उपलब्ध करवाने के लिये जो विकास काम किये जाते है वह सारे काम रुके हुऐ है वह काम जल्द से जल्द शुरु होना चाहिये, यही मैं आयुक्त महोदय से निवेदन करना चाहता हुँ, श्री विजय झलकेजी ने एक संतुलित अच्छा बजट दिया है, इस बात के लिये मैं उनका अभिनंदन करना चाहता हुँ, और इस बजट को एकमत से पास किया जाये, ऐसा मैं निवेदन करता हुँ। धन्यवाद

श्रीमती दिव्या धुरडे :- सर्वांना नमस्कार, मा.महापौरजी,मा.उपमहापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, सत्तापक्ष नेते, विरोधी पक्ष नेते, मा.आयुक्तजी, सर्व सन्माननिय नगरसेवक आणि नगरसेविका, अधिकारीवर्ग आणि माझे पत्रकार बंधुनो, सर्वप्रथम मा.स्थायी समिती अध्यक्ष पिंटुजी झलके यांचे मी अभिनंदन करते, गेल्या ७ ते ८ महिन्यापासून आपण कारोना महामारीला समोर जात आहे. त्याच्याशी लढा देत आहे आणि या कार्यकाळामध्ये मार्च मध्ये होणारं बजेट इतक्या उशीरा झालं, परंतु झालं कारण प्रत्येक नगरसेवकाला वाटत होत की या वर्षी बजेट होणार की नाही. या वर्षी कारोना तर आलाच परंतु तत्कालीन आयुक्तांनी सर्व कामे थांबवून दिली, वर्कऑर्डर दिलेल्या फाईल थांबवुन दिले, आणि नगरसेवकांनी काम कसे करायचे, नागरिकांना फेस कसे करायचं हा मोठा प्रश्न प्रत्येक नगरसेवकांसमोर उभा राहिला. परंतु इतक्या खडतर आणि कठीन परिस्थितीमध्ये सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती श्री.पिंटुभाऊ झलके यांनी बजेट सादर केले आणि आज बजेटवर चर्चा सुरु आहे. त्यांचे मी खुप खुप अभिनंदन करते. तत्कालीन आयुक्तांनी नागपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणा-या ज्या ब-याच योजना आहे तसेच समाजकल्याण विभागातर्फे राबविण्यात येणा-या योजना बंद केल्या. आम्ही महिला बाल कल्याण समितीच्या माध्यमातून त्यांना पत्र सुध्दा दिले की या ज्या योजना बंद झाल्या आहे त्या सुरु करण्यात याव्यात. त्याच्यामध्ये लाडली लक्ष्मी योजना असेल, अनुसयाबाई काळे समुपदेशन केंद्र १० झोन अंतर्गत सुरु होते ते देखील बंद त्यांनी बंद केले. या सर्व योजना स्थायी समिती अध्यक्षांनी सुरु कराव्यात असे निर्देश दिले त्या बद्यल मी त्यांचे देखील अभिनंदन करते. आपली जी वर्कऑर्डर झालेली कामे जी थांबली आहे ती बरीच कामे या बजेटमध्ये घेतलेली आहे परंतु झोन अंतर्गत जी कामे आहे ती झोन तर्फे देण्यात आली परंतु काही कामे येथे दिसत नाही ही कामे पुर्ण करावी मी अशी आपणांस विनंती करते. कारण बरीच कामे राहिलेली आहे. आणि बजेटमध्ये एक नविन निर्णय स्थायी समिति अध्यक्षांनी येथे घेतलेला आहे. की आपल्या नविन पिढीला आपल्या देशाबद्यल सन्मान असावा, त्यांच्यामध्ये देशभक्ती जागृत व्हावी. त्याच्याकरीता वंदे मातरम उद्यानाचा संकल्प घेतला अतिशय सुंदर असा

संकल्प आहे. त्यांची भावना चांगली आहे. आपल्या नागपूर शहरात वंदे मातरम उद्यानाची निर्मिती होणार आहे हा ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतला त्या बद्यल सुध्दा मी स्थायी समिती अध्यक्षांचे मी खुप खुप अभिनंदन करते. आणि नविन प्रस्तावित कामे घेतलेली नाही. जुणी जी कामे राहिलेली आहे तीच कामे आपण करीत आहेत. तर माझी अशी विनंती आहे की माझ्या प्रभागामध्ये ऐतिहासिक गोंड राजे बख्त बुलंदशहा यांचे समाधीस्थळ आहे. आणि ते पुरातन आहे अनेक समाध्या तुटल्या आहे याचे काम करण्यासाठी मी प्रस्ताव दिला आहे. त्यांचे सौदर्यीकरण आहे. तेथील बरेच झाडे झुडपे वाढलेले होते तेथील स्वच्छता केली आणि सौदर्यीकरण करण्यासाठी नविन बजेटमध्ये प्रस्ताव दिला होता परंतु नविन प्रस्ताव या वर्षी नाही आहे परंतु येणा-या नविन सत्रामध्ये या कामाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे, अशी मा.महापौरजी यांना विनंती करते. या कठीन परिस्थितीमध्ये सर्व बाबींचा विचार करुन मा.अध्यक्षांनी हे बजेट सादर केलेले आहे. मी याचे समर्थन करते आणि येणा-या दिवसांमध्ये जी घेतलेली कामे आहे ती पुर्णत्वास येईल अशी इच्छा प्रकट करते आणि या कठीन परिस्थितीमध्ये देखील स्थायी समिती अध्यक्षांनी सर्व बाबीयुक्त असे खोटं नाही खर भाषण प्रस्तुत केलं, दर्शनीताईंनी प्रत्येक वेळेस हे खोटं बजेट आहे असे प्रत्येक वेळेस बोलल्या परंतु हे बजेट खोटं नाही. खर बजेट स्थायी समिती अध्यक्षांनी सादर केलेलं आहे. या कठीन परिस्थतीमध्ये त्यांनी हे सादर केलेलं बजेट आहे त्यामुळे मी स्थायी समिती अध्यक्षांबद्यल दोन ओळी म्हणते. “लहरोसे डरकर नौका पार नही होती, कोशीष करने वालो की कभी हार नही होती ” मला बोलण्याची संधी दिली त्या बद्यल धन्यवाद मानते, जय हिंद जय भारत.

श्री.मो.जमाल :- मा.महापौरजी, सन २०२०-२१ का जो बजट मा.अध्यक्ष, स्थायी समिती श्री पिंटु झलकेजी ने दिया है मैं उस बजट की सराहना करता हुॅं, क्योंकि कोविड-१९ के बिच मे बजट देना और तत्कालीन आयुक्त के कार्यो के बाद ऐसा बजट प्रस्तुत करना यह एक सराहनीय काम है, मा.महापौरजी, बहोत सारी चिजो का झलकेजी ने यहां ध्यान रखा है, मैं एक बात की ओर आपका ध्यान आकर्षित करना चाहता हुॅं कि, एज्युकेशन का जो सिस्टीम है वह कोविड -१९ के वजह से पुरी तरह से बंद है, मा.महापौरजी, हम मॉल खोल रहे है, सिनेमा हॉल खोल रहे है, लगभग लगभग सभी चिजे खुल रही है लैकिन जो सबसे ज्यादा जरुरत की चिज है, वह आज बंद है, आज शिक्षण विभाग की ओर से ऑनलाईन शिक्षण देने का जी.आर. आया है, लैकिन महानगरपालिका मे ऐसे बच्चे पढते है जिनके पास मोबाईल तो दुर की बात मोबाईल रिचार्ज कराने के लिये पैसे भी उपलब्ध नही है, उन बच्चो के लिये हमको नेट का अरेजमेंट करना पढेगा, मा.महापौरजी, स्कुलो को जल्द से जल्द चालु करवाना पढेगा I मा.महापौरजी, उसी तरह से मैं एक विषय की ओर आपका ध्यान आकर्षित करना चाहता हुॅं कि, तत्कालीन मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस ने आपके समक्ष हमसे वादा किया था कि, जल्द से जल्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक के निर्माण कार्य की शुरुवात की जायेगी, अभी तो राज्य मे शिवसेना व कॉग्रेस की सरकार है वह स्मारक का काम करेगी या नही करेगी यह बाद का विषय है, लैकिन मा.महापौरजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक का काम २५-३० साल से प्रलंबित है, वह जल्द से जल्द पुरा किया जाये I मा.महापौरजी, कोविड-१९ मे जो भी परिणाम नागपूर महानगरपालिका को भुगतने पढे उसको देखते हुऐ काफी लोगो ने कहां कि, तत्कालीन आयुक्त ने सारे विकासो के काम रोक दिये, तत्कालीन आयुक्त ने जैसे ही यहां पदग्रहण किया वैसेही सारे विकास कामो को रोक दिया पता नही उनको क्या दिखा, क्या नही दिखा या फिर उनको कुछ अलग से ज्ञान था कि, जिसके कारण उन्होने सारे कार्य रोक दिये I पता नही क्या उनकी मंशा थी की नगरसेवको के काम को रोक दिया जाये, उनको क्या डर हो गया था, मा.महापौरजी, ऐसे हालात मे बजट पेश किया गया है, लैकिन मुझे ऐसा लगता है कि, इस बजट मे एक चिज के ऊपर से ध्यान

हटाया गया है, जो फाईले टेंडर मे थी, उन फाईलो को इस बजट मे शामिल नही किया गया है, जिन फाईलो के टेंडर मंजूर होकर के मा.आयुक्त के पास हस्ताक्षर के लिये गये थी, उन फाईलो का समावेश भी मा.सभापती, स्थायी समिती इन्होने अपने बजट मे करना चाहिये। इन चिजो पर आपने ध्यान देना चाहिये, यह सारे काम जनता को सुविधा पहोंचाने के लिये है, इस ओर आपने ध्यान देना चाहिये।नगरसेवक इतने प्रयास करने के बाद अपने प्रभाग मे विकास के काम के लिये प्रयत्न करता है, वह उप अभियंता के साथ मे मिलकर साईट का निरीक्षण करता है, लोगो को बताता है कि, यह यह काम प्रभाग मे होने वाले है, और जब उन कामो के टेंडर हो गये और वर्क आर्डर स्टेज तक वह काम आगये तो उन कामो को रोक दिया जाता है, ऐसा नही होना चाहिये, उन कामो का समावेश आपने बजट मे करना चाहिये, ऐसा मैं आपसे निवेदन करता हुँ। मा.महापौरजी, कोविड-१९ हमारे नागपूर शहर मे अलग अलग प्रकार से आरहा है, अभी वह विषय थोडा ठंडा है, वह विषय फिर से गरम न हो इसपर हमने ध्यान देना चाहिये, क्योंकि आगे ठंडी का मौसम शुरु होने वाला है। इसके लिये हमको महानगरपालिका की ओर से उपाययोजना अंमल मे लाना बहोत जरुरी है, इस ओर ध्यान दिया जाये। ऐसा मैं आपसे निवेदन करता हुँ। मा.महापौरजी, मैं एक सुझाव मा.अध्यक्ष, स्थायी समिती को देना चाहता हुँ, उन्होने वार्ड फंड का नियोजन अपने बजट मे किया है, २० लाख रुपये प्रति मा.सदस्य के प्रभाग मे विकास काम करने के लिये रखे गये है, वार्ड फंड २० लाख से बढाकर ५० लाख करना चाहिये, ताकि नगरसेवक अपने प्रभागो मे काम कर सके क्योंकि पिछले ८ महिनो से प्रभाग मे विकास के काम नही हो रहे है, अगर ५० लाख रुपये वार्ड फंड किया जाता है तो हर प्रभाग मे छोटे मोठे विकास के काम हो सकते है, ऐसा मैं आपसे निवेदन करता हुँ। बस यही कहते हुऐ चंद शेरो के साथ मैं अपनी बात खत्म करना चाहुंगा।

कभी दिमाग कभी दिल कभी नजर मे रहो, यह सब तुम्हारे ही तो घर है किसी भी घर मे रहो।
जला न लो कभी हमदर्दो से अपना वजुद को, गली मे आग लगी है तो अपने घर मे रहो।

श्री जल्फेखार अहमद भुटटो :- मा.महापौरजी, मा.स्थायी समिती के अध्यक्ष, श्री झलके साहब ने जो २७०० करोड रुपयो का बजट पेश किया है, इस बजट मे पिछले साल जिन कामो के कार्यादेश हो गये है, उन कामो का उल्लेख नही है, उन कामो का उल्लेख इस बजट मे करना चाहिये, इस बजट के बाद वह काम प्रायरीटी पर शुरु करने चाहिये, वह काम वार्ड फंड के है, उसी तरह से ठेकेदार लोगा को पेमेंट नही मिला इस कारण भी वह समय पर काम नही कर सके, उसी तरह से कुछ जगह ओ.सी.डब्लु का काम चल रहा था, इस वजह से वह काम रुके इसलिये वह काम पुरे नही हो सके, इसलिये वह काम जल्द से जल्द तत्काल मे शुरु करना चाहिये। उसी तरह से सन २०१८-१९ के बजट मे मुस्लिम कब्रस्तान मे विद्युत फिटींग के लिये जो सामुग्री लगती है, उस काम के लिये कहां गया था, लैकिन आज तक उस काम के टेंडर नही हुऐ है, इसलिये मेरी आपसे विनंती है कि उस हेड मे ज्यादा निधी रखकर तत्काल मुस्लिम कब्रस्तान के लिये निधी उपलब्ध करवाई जाये। तत्काल उस काम के टेंडर निकाले जाये, उसी तरह से नागपूर शहर मे आधुनिक तौर पर इंग्लिश मिडियम के स्कुल शुरु किये जारहे है, मेरे प्रभाग ८ मे संत गुलाबबाबा स्कुल को आधुनिक रुप से इंग्लिश मिडियम की स्कुल बनाना चाहिये,पिछली बार वह स्कुल शुरु की जारही थी, के.जी.१, के.जी.२ लैकिन कोविड-१९ की वजह से वह स्कुल नही शुरु की गयी , वहां आधुनिक रुपसे स्कुल के लिये एक अच्छी इमारत का निर्माण होना चाहिये, इसके लिये निधी उपलब्ध करना चाहिये। मोमीनपुरा प्रभाग मे ८०-९० साल पुरानी अंग्रेजो के जमाने की ट्रंक लाईन है, जिसके चेंबर्स २५ फिट गहरे है, मैंने उस संदर्भ मे श्री बावणकुळे साहेब, माजी पालकमंत्री उनसे आग्रह किया था, उसका डी.पी.आर. तयार करने के लिये उन्होने निगम आयुक्त से कहां था, लैकिन आज तक उस

काम का डी.पी.आर. तयार नही किया गया है, इस काम के लिये ज्यादा निधी देना चाहिये, उस क्षेत्र मे अनेक लोगो के कुंवे डायमेज हो गये है, वहां पर सिव्हर लाईन बुजने के कारण कुंवे डायमेज हो रहे है, उस काम के लिये ज्यादा निधी उपलब्ध करवाना चाहिये, और उसी तरह से वार्ड विकास के काम के लिये ज्यादा वार्ड फंड रखना चाहिये, इस बारे मे विचार करना चाहिये, गोलीबार चौक से बोरीयापूरा तक डांबरीकरण करने का काम आय.आर.डी.पी. के निधी से हुआ था, लास्ट टाईम निधी कम मिलने के कारण आधा ही रोड पुरा हो सका, उसमे बाकी काम पुरा कर सके इसलिये ज्यादा निधी रखना चाहिये, आपने मुझे बोलने का अवसर दिया, इस बात के लिये मैं आपको धन्यवाद देते हुऐ, अपने शब्दो को विराम देता हुॅं।

श्रीमती विरंका भिवगडे :- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय उपमहापौरजी, पक्ष नेते, गटनेते, सर्व नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी वर्ग, पत्रकारबंधू सर्वांना माझा सप्रेम जयभीम. मा.स्थायी समिती अध्यक्ष पिंटूजी झलके यांनी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे २७३१ कोटीचा अर्थसंकल्प असून मी त्यांना माझ्या प्रभागातील काही कामांसाठी पत्र दिले होते. त्यांनी या कामासाठी लागणारा निधी या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करावा परंतु मा.महापौरजी त्यांनी तो निधी ठेवलेला नाही मी मी या अर्थसंकल्पाला विरोध करते. मा.महापौरजी, स्थायी समिती अध्यक्ष महोदयांनी आपल्या बजेट पुस्तिकेमध्ये सर्व समाजभवनाकरिता,उद्यानाकरिता, वाचनालयाकरिता स्मारकाकरिता राखीव निधी ठेवलेला आहे. परंतु उत्तर नागपूर क्षेत्रामध्ये कोणत्याही समाजभवनाकरिता, उद्यानाकरिता, वाचनालयाकरिता निधी ठेवलेला नाही म्हणून मी या अर्थसंकल्पाचा विरोध करते. मा.महापौरजी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने दुर्बल घटकाकरिता राखीव निधी ठेवलेला आहे तो अत्यंत कमी निधी ठेवलेला आहे. मी मा.महापौरजी, मा.आयुक्त यांच्या वतीने स्थायी समिती अध्यक्षांना विनंती करते त्यांनी दुर्बल घटकासाठी जास्तीचा निधी ठेवावा अशी विनंती करते. मा.महापौरजी, ओसीडब्लू ला आपण काम दिलेले आहे २४ तास पाणी पुरवठा करण्याचे परंतु ही योजना अजूनही महाराष्ट्रामध्ये लागू झालेली नाही. माझ्या प्रभागात असे काही भाग आहेत, तेथे अजूनही टॅन्करने पाणी पुरविले जाते. आजही माझ्या घरावर पाण्यासाठी नागरिक मोर्चे घेवून येतात. मी अध्यक्ष महोदयांनी विनंती करते त्यांनी शहर टॅन्कर मुक्त करुन माझ्या प्रभागात नवीन जलवाहिनी टाकण्यात यावी. मा.स्थायी समिती अध्यक्षांनी जो वार्ड फंड २० लक्ष ठेवलेला आहे मी मा.सर्व नगरसेवकाच्या वतीने आपल्याला विनंती करते, ५० लक्ष असा हा वार्ड फंडाचा निधी ठेवण्यात यावा. मा.महापौरजी, मी जाता जाता एक ओळ सांगून जाते, काय ती भुमिका आपल्या महिला भगिनीसाठी आहे या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये, एक महिला मस्जिदची मौलाना बनू शकत नाही, एक महिला चर्चची फादर बनू शकत नाही, , एक महिला मंदीरची पुजारी बनू शकत नाही. मात्र एक महिला या देशाची राष्ट्रपती, प्रधानमंत्री, आमदार, खासदार, सरपंच बनू शकते ते या संविधानामुळे. या संविधानाचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे, त्यांना मी सर्व महिलांच्या वतीने अभिवादन करते. जर बाबासाहेबांनी संविधान लिहिले नसते तर कदाचित महिलाच्या वतीने मला आज या सभागृहात बोलण्याची संधी मिळाली नसती. मा.महापौरजी, मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देते. जयभीम, नमोबुध्दाय.

श्रीमती भावणा लोणारे :- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय आयुक्त महोदय, सन्माननीय अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदन. मा.महापौरजी, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. मा.स्थायी समिती अध्यक्षांनी सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्प दिले ते अत्यंत सराहनीय आहे. कारण की कोव्हीडमध्ये महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असतांना त्यांनी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. मा.स्थायी समिती

अध्यक्ष श्री पिंटूजी झलके यांनी उत्तर नागपूरकरिता अत्यंत कमी निधी दिलेला आहे. सर्व नगरसेवकांना समसमान फंड उपलब्ध करुन दयावा अशी विनंती करते. सन्माननीय पिंटू भाऊने जो अर्थसंकल्प मांडला तो अत्यंत छान आहे परंतु आमची कामे पुर्ण होतील तर आम्ही त्यांच्या बजेटला समर्थन देवू. मा.महापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्षांना आम्ही नगरसेवकांनी उत्तर नागपूरकरिता कामे सुचविली होती ती त्यांनी या अर्थसंकल्पात घेतलेली नाहीत. उत्तर नागपूरमध्ये खुपच कामाची खुप पंचायत आहे म्हणून आपण सगळया नगरसेवकांना समसमान फंड दयावी अशी मा.महापौरजी आपल्या मार्फत विनंती करते. उत्तर नागपूर मधील जी काही कामे आहेत ती आपल्या माध्यमातून पुर्ण होती अशी मी आपल्या मार्फत विनंती करते. मा.महापौरजी, उत्तर नागपूर कडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते आपल्या मार्फत उत्तर नागपूरकडे जास्तीत जास्त लक्ष दयावे अशी मा.महापौरजी आपणांस विनंती आहे. जे स्थायी समिती अध्यक्ष महोदयांना कामे सुचविली होती ती त्यांनी पुर्णकरावी व सर्व नगरसेवकांना समसमान फंड दयावा जेणेकरुन सर्व नगरसेवकांची कामे पुर्ण होतील अशी मी आपणांस विंनती करते. मला आपण येथे बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले मनपुर्वक आभार मानते. धन्यवाद, जयभीम

श्रीमती मंगला लांजेवार :- मा.महापौरजी, कोव्हीड के महामारी मे गरीब जनता से पाणी और टॅक्स की वसुली की जा रही है। गरीब जनता से ओसीडब्लू पैसे मांग रही है। मा.महापौरजी, टॅक्स व पानी की शास्ती माफ की जाये, रमाई घरकुल योजना मे २ करोड से १२ करोड राशी दी जाये। मा.महापौरजी, मेरे प्रभाग मे इंदोरा मैदान है वह ऐतिहासिक मैदान है। इस मैदान के बारे मे जो भी न्यायालयीन या अन्य अडचणे है उसको अपने न्याय समिती व वकीलो के माध्यम से निपटारा किया जाये और मैदान का विकास किया जाये। जयभीम, जयभारत.

श्री.परसराम मानवटकर :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, सर्व गटनेते, नगरसेवक, नगरसेविका. मा.महापौरजी, आमच्या कडे ओसीडब्लू ची पाईपलाईन टाकलेली आहे. परंतु तेथे नळ जोडणी केलेली नाही कृपया आपण त्याकडे लक्ष दयावे. शहर हे टॅन्करमुक्त व्हायला हवे. आणि जी आमची कामे पेंडिंग पडलेली आहेत त्याचे वर्कआर्डर झालेले आहेत ती कामे व्हायला पाहिजे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद करतो. जयभीम, जयभारत.

श्री.मनोज गावंडे :- मा.महापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष यांनी जे बजेट सादर केले त्या बजेटबद्दल मला एवढीच विनंती करावयाची आहे की बजेट हे सर्व नगरसेवकांना कसे कामासाठी समाविष्ट करता येईल की जेणेकरुन त्यांना आपल्या आपल्या प्रभागात नगरसेवक या नात्याने लोकांच्या ज्या समस्या आहेत त्या त्यांना कशा सोडविता येतील कारण एक माझ्या प्रभागापुरते जरी बोलायचे झाले तरी गडरलाईनची समस्या ही खुप मोठया प्रमाणात आहे आणि ज्यामुळे गडरलाईन कोलॅप्स असल्यामुळे सर्व पानी हे विहिरीमध्ये जात आहे त्यामुळे त्यांच्या विहिरी खराब झालेल्या आहेत आणि ओसीडब्लू कडून सुध्दा मुबलक पानी मिळत नाही त्यामुळे त्यांना खुप त्रास आहे. या जनतेच्या त्रासाकडे आपण आणि मा.स्थायी समिती अध्यक्ष पिंटूभाऊ झलके यांनी लक्ष दयावे एवढीच आपणांस नम्र विनंती करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले धन्यवाद मानतो.

श्री.किशोर जिचकार :- मा.महापौरजी, मा.स्थायी समिती चेअरमन, मा.उपमहापौरजी, सर्व अधिकारी, कर्मचारी. मा.महापौरजी, गेल्या २० तारखेला बजेट सादर करण्यात आले. माझे जे अर्धवट राहिलेली कामे

आहेत ते या बजेटमध्ये आलेली नाहीत म्हणून मी मा.विरोधी पक्ष नेत्याच्या मार्फत मा.स्थायी समिती चेअरमन आणि आपल्याकडे सुध्दा सुपुर्त केलेले आहे. माझ्या सर्व कामांचा समावेश करण्यात यावा अशी विनंती करतो. कोव्हीडची महामारी सुरु असतांना ज्या आपल्या महानगरपालिकेचे कर्मचारी आपले सफाई कामगार यांनी मोलाचे योगदान दिले त्यांचे मी या सभेत अभिनंदन करतो. मा.महापौरजी, एक विषय या ठिकाणी निघाला होता कोव्हीड महामारी सुरु असतांना, पाण्याच्या बिलाचा असो किंवा मालमत्ता कराचा असो. आपण सरसकट शास्ती माफ करावे आणि जे ओरिजनल बील आले असे ते घेण्याची विनंती करतो. तसेच मा.महापौरजी, या नागपूर शहराच्या मध्यभागी शक्ती नाला आहे त्या नाल्याच्या बांधकामाकरिता या बजेटमध्ये प्रावधान उपलब्ध करुन देता आले तर नागपूर शहरात मध्यभागी बांधलेला मुख्य कॅनल होता एम्प्रेस मील होती त्याला पाणीपुरवठा करण्याकरिता होता आता पुर्णपणे नाल्यामध्ये रुपांतरीत झालेला आहे. या नाल्याची सर्व गिट्टी निघाल्यामुळे याच्या आजूबाजूच्या सर्व विहिरी पोल्युटेड झालेल्या आहेत. मा.महापौरजी यासाठी विनंती आहे आपण याकडे विशेष लक्ष दयावे. तसेच नागपूर शहराची वाढती लोकसंख्या पाहून ज्या काही भुमिगत सिवरलाईन आहेत त्या सिवरलाईनची अवस्था सगळयात जास्त खराब आहे. त्याच्यावर प्रचंड प्रमाणात लोड आलेला आहे. त्यांच्यावर बहुतेक भागात अतिक्रमण झालेले आहे. मा.महापौरजी, नागपूर शहरात पूर्व, पश्चिम, उत्तर , दक्षिण असे चार ट्रिटमेंट प्लॉन्ट तयार झाले तर येणा-या काळामध्ये आपण त्याच्यामध्ये सुधारणा करु शकतो. तसेच बरेच नगरसेवकांनी वार्ड निधी वाढवून देण्याच्या सुचना केल्या. वार्ड निधी वाढविण्यासाठी कायद्याची अडचण असली तरीही आपण दुस-या वेगवेगळया हेडमध्ये नगरसेवकाच्या नावाने प्रत्यक्ष तेवढा जेवढा मागितला निधी तेवढा करु शकतो. इतक्या सुचना या बजेटच्या निमित्ताने करावयाच्या आहेत. धन्यवाद

श्री सतीश होले :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.स्थायी समितीचे अध्यक्ष, मा.आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक बंधु बघिणी, मा.महापौरजी, येवढया कठिण परिस्थितीत आपले स्थायी समितीचे अध्यक्ष श्री पिंटु छलके यांनी अभ्यास करुन त्यांनी म्हटले सुध्दा त्यांच्या भाषणात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम १, २ आणि पुन्हा नॅशनल म्युनिसीपल कार्पोरेशन या सगळया गोष्टीचा अभ्यास करुन कमी वेळेत चांगला बजेट ठेवल्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो. आणि एक गोष्ट महत्वाची येवढीच सांगता येईल कि, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन महानगरपालिकेच्या वतीने न होणारी कामे सुध्दा सांगीतली पाहिजे सगळयात महत्वाचा काम आहे कि टॅक्सच्या संदर्भात मालमत्ता कराच्या संदर्भात हुडकेश्वर भाग हा महानगरपालिकेत पहिल्यांदा आला आहे, पण तिथल्या खाली प्लॉटच्या डिमांड अजूनपर्यंत लोकांना मिळाल्या नाही. आपल्या विभागामध्ये त्याचा कम्प्युटरमध्ये सर्व्हे होवुन रेकॉर्ड आहे, पण लोकांना फक्त येरझारा करावा लागतो आहे, या गोष्टीकडे प्रामुख्यांने लक्ष दिले तर महानगरपालिकेचे निश्चितरुपाने उत्पन्न वाढेल. त्याचबरोबर दुसरा भाग असा कि, बाजार विभागात प्रचंड भ्रष्टाचार आहे, या संदर्भात कालच मी आयुक्तांना एक पत्र सुध्दा दिले आहे आणि एक उदाहरण सुध्दा देतो फार इक्झॉम्पल राष्ट्रीय गांधी मार्केट सक्करदरा आमच्या येथे बोगस लोकांच्या नांवानी काही दुकाने राखीव ठेवण्यांत आलेली आहे. त्यांची आयडी सुध्दा नाही आहे आणि काही लोकांनी त्यांच्या जागेवर भलत्याचा फोटो लावुन त्याची सर्रास विक्री केली आहे मा.महापौरजी या गोष्टीकडे सातत्याने लक्ष द्या, आणि उर्वरीत दुकानांचे अलॉटमेंट कॅन्सल करा, महानगरपालिकेची प्रापर्टी आहे, महानगरपालिकेच्या जागेवर आहे, ही सगळी प्रॉपर्टी जर आपण लिलाव केली तर निश्चितरुपाने महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. आणि त्याचबरोबर बुधवार बाजार ही आपली महानगरपालिकेची जागा आहे, तेथे व्यापारी संकुलासाठी मार्केटसाठी आपण सातत्याने मागे लागलो आहे.

दरवर्षी आपण सांगतो कि, तेथे आपण काही तरी बीओटीवर करु, पण अजून त्याचे नकाशे सुध्दा काढले नाही, अजुनपर्यंत बाजाराचा कुठलाही नकाशा आपण मंजूर केला नाही. तरी याकडे लक्ष देण्याची गरज आहे, त्याचप्रमाणे स्थावर विभागाच्या संदर्भात सागांयचे झाले तर मी दरवर्षी सभागृहात बोलतो, प्रत्येक झोनमध्ये महानगरपालिकेची प्रापर्टी किती आहे, महानगरपालिकेच्या प्रॉपर्टीचा ऑडिट झाला नाही, आपल्याकडे कुठलाही रेकॉर्ड नाही, कारण कि माझ्याच परिसरात महानगरपालिकेच्या जागेवर अनधिकृतपणे पुष्कळशे लोक बसलेले आहे, त्यांच्याकडे म्हाडांनी त्यांना १० बाय १५ चा ओटा दिला होता ती लिज केव्हाच संपली आणि त्या लोकांनी ५ हजार स्केअर फिट जागा घेवुन ठेवली आहे, आणि महानगरपालिकेचे अधिकारी त्यांना प्रोटेक्शन देत आहे. ही बाब बरोबर नाही यामुळे निश्चितरुपाने महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. तरी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावयाचे असेल तर या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर काही कामे करतांना मागच्या वर्षी गार्डनच्या कामाचे टेंडर झाले, कामगार एरीआत एकच गार्डन होता, इंडयुज्वल बोलायची गरज नव्हती पण पश्चिम नागपूर व इतरत्र चांगले गार्डन होतात पण आमच्याकडे मागच्यावर्षी टेंडर झाले पण यावर्षीच्या अंदाजपत्रकात त्या गार्डनचे काम घेण्यांत आलेले नाही. तरी ती कामे घेण्यांत यावी आणि मागच्यावर्षी आमची फिक्स प्रायरीटीची नस्ती होती, दिनदयाल उपाध्याय रस्ते विकास योजने अंतर्गत त्या कामाचे टेंडर झालेले नाही, कारण कि, आपण आमची कामे कलब केली, डांबरी रोडच्या अंतर्गत आमच्याकडे मोठे सिमेंट रोड नाही, ती मागच्यावर्षीची कामे त्याचे टेंडर झालेले नाही, ते काम फिक्स प्रायरीटीचे आहे त्याला पुन्हा प्रावधान देण्यांत यावे, त्याचबरोबर आमच्याकडे सिमेंट रोडच्या ज्या कामाकरिता टेंडर करण्याकरिता स्थायी समितीने आदेश दिले असतांना सुध्दा त्याचे टेंडर काढले नाही, ७० प्रतिशत पेक्षा कमी खर्च झाला होता तरी मुद्यामहुन ते काम अडविण्यांत आले आहे, आपण आता जे म्हणत आहे, मागचे देणे जे होते, ज्या लोकांचे वर्क आर्डर झाले आहे आपण त्यांना पैसे देणार आहे व ज्या लोकांची वर्क आर्डर झाली नाही, किंवा ज्या कामाचे टेंडर झाले नाही, एखाद्याच्या वार्डात करोडोची कामे आहे, तर त्याची करोडोची कामे अजून करोडोची वाढवायची व आमच्या सारख्या गरीब नगरसेवकांच्या वार्डात तुम्ही फंड कधी देणार अहो नाही सिमेंट रोड देवु शकत असेल तर कमीत कमी डांबर रोड तरी द्या,आपण हे दिले पाहिजे, आपण या कामाकरिता निधी दिला नाही, जे सिमेंट रोड आहे, त्या गोष्टी बरोबर आहे कि मेन सिमेंट रोड आहे त्याचे काम पुर्ण झाले पाहिजे. पण तुमचे इंटरनल जे सिमेंट रोड दिलेले आहे बाकी ठिकाणी त्याची गरज नाही, त्याठिकाणी ट्रॉफिक डेंसीटी नाही, जेथे गरज नसतांना आपण सिमेंट रोड दिलेले आहे त्या कामाला आपण पुन्हा निधी देणार आहे काय ? इकडे कुठे तरी लक्ष देण्याची गरज आहे, त्याचबरोबर ओसीडब्लु एकाच एरीआत फक्त सकाळ संध्याकाळ ६० मिनिट पाणी देतो हा ओसीडब्लु किती वेळ पाणी देवु शकेल त्याचा एव्हरेज बील दोन युनिटचा असतो, १० ड्रम पाणी पाहिजे मग एकाला दोन हजाराचा बील व एकाला अडीच हजाराचा बील कोणाला साडे तीन हजाराचे बील आपण त्यांना काय वेगवेगळे कनेक्शन दिले आहे काय टांकीमधुन कि, एकाला जास्त पाणी व दुस-याला पाणी कमी येईल हा ओसीडब्लुचा घोळ आपण कुठे तरी थांबावयास पाहिजे. व्यवस्थित पैसे घ्या जेवढे पाणी देता तेवढे पैसे घ्या, लोकांवरचा भुर्दंड आपण थांबविला तर निश्चितरुपाने म.न.पा.ला फायदा होईल, ओसीडब्लुची कामे ही बरोबर नाही, कारण कि, आपले महानगरपालिकेचे अधिकारी त्यांच्यावर्ती आपण ठेवलेले आहे, ते निश्चितरुपाने झोपी गेलेले आहे, त्यांना कुठे तरी जागविण्याची गरज आहे, मी मा.महापौरजी व मा.स्थायी समिती अध्यख या दोघांचा अभिनंदन करतो, पण जी कामे अडकली आहे ती निश्चितरुपाने झाली पाहिजे. वार्ड फंड वाढवु शकत नाही, ही बाब बरोबर आहे, काही नवीन लोकांना माहित नाही, म.न.पा.च्या उत्पन्नाच्या दोन प्रतिशत वार्ड फंड मिळु शकतो, पण इतर बाबीतुन

मा.सदस्यांना मदत करण्याची गरज आहे, धन्यवाद बोलण्याची संधी दिल्याबद्यल मी आपला आभारी आहे.

श्री.संजय बंगाले :- मा.महापौरजी,अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये मा.स्थायी समिती अध्यक्ष श्री.विजय झलके यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे. देशाच्या,महाराष्ट्राच्या आणि नागपूर शहराच्या दृष्टीकोणातुन महानगरपालिकेच्या इतिहासात नोंद होईल अशाप्रकारचे हे वर्ष आहे. हे बजेट सादर करीत असतांना या वर्षी महानगरपालिकेत काम करीत असलेल्या प्रशासनाला  लक्षात राहील असे हे महत्वपुर्ण वर्ष आहे. मागील वर्षामध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता महाराष्ट्रात होती. या नागपूर शहरातील मा.देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. नेतृत्व करीत असतांना या शहराचा ६५ वर्षाचा अन्याय दूर केला. एकाच पक्षाचे सरकार महाराष्ट्रामध्ये होते. जेव्हा आघाडीचे सरकार सत्तेवर आले आणि सत्तेवर आल्या आल्या या शहराचे संपुर्ण विकासाचे नियोजन मा.नितीनजी गडकरी व मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी आपल्या नेतृत्वात केले. पाच वर्षात या शहराचा संपुर्ण विकास पुर्ण झाला असता. केंद्र शासनाचे अनुदान, राज्य शासनाचे अनुदान आणि महानगरपालिकेचे बजेट या अंतर्गत नागपूर शहर अत्यंत वेगाने विकासाकडे चालले होते. या नागपूर शहरातील मुलभूत गरजा पुर्ण होत होत्या. या नागपूर शहरातील सर्व प्रकारच्या समाजाच्या वैयक्तिक हिताच्या योजनेपासून नागपूर शहरामधल्या स्लम, दुर्बल घटक योजनेपर्यंतच्या सर्व प्रकारच्या मुलभूत गरजा सोडविण्याचे काम सातत्याने मागच्या ५ वर्षापासून चालले होते. परंतु हाराष्ट्रात अवैधपणे सत्तापरिवर्तन झाले आणि या शहरामध्ये आयुक्तांना पाठविण्यात आले. हे आयुक्त नागपूर शहरात आल्यानंतर त्यांनी नागपूर शहराचा विकास थांबविला. मा.आयुक्तांनी या महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये सातत्याने लोकहिताच्या निर्णयाच्या विरुध्द जाण्याचा प्रयत्न केला. आपला पर्सनल अजेंडा काढला. पॅनडॅमिक स्थितीमध्ये कोव्हीड सारख्या महामारीमध्ये या नागपूर शहरामध्ये प्रशासन आणि पदाधिकारी यांचा समन्वय या आयुक्तांनी कुठेतरी केला असता तर या नागपूर शहरामध्ये कोव्हीडवर नियंत्रण ठेवता आले असते. या नागपूर शहरामध्ये १ लक्षाच्या वर कोव्हीड पेशंट झाले आणि ३ हजाराच्यावर मृत्यू झाले. मी मृत्यू पावलेल्या सर्व नागरिकांना मी श्रध्दांजली वाहतो. कोव्हीडची परिस्थिती आम्हांला सांभाळता आली असती. मा.स्थायी समिती अध्यक्षांचे बजेट या ठिकाणी लवकरच तयार झाले असते परंतु त्याला अडथळा घालण्याचा प्रयत्न आयुक्तामार्फत करण्यात आला. त्या ठिकाणी बजेट मांडत असतांना स्थायी समिती अध्यक्षांचे अभिनंदन करतो. ज्यावेळी सर्व सदस्यांना असे वाटले होते की महानगरपालिकेचे बजेट कसे होईल, किंवा बजेटमध्ये कुठल्याही प्रकारचे विकास कामे होऊ शकणार नाही किंवा हे पुर्ण वर्ष कोव्हीड मध्ये जाईल परंतु या ठिकाणी स्थायी समिती अध्यक्षांनी आपली चाणाक्श बुध्दी वापरुन त्या ठिकाणी त्यांनी २५०० करोड रुपयांचे उत्पन्न दाखवत असतांना मा.आयुक्तांच्या बजेटपेक्षा आपला बजेट कमी केला. महानगरपालिकेमधील कुठलाही पक्ष असो किंवा अपक्ष असो सर्वांना समान न्याय देण्याचा प्रयत्न केला. परंतु विरोधी पक्षातील सन्माननिय नगरसेवक हे बजेटवर आक्षेप घेत आहे. परंतु मागच्या वर्षीच्या ज्या फाईल प्रलंबित होत्या त्यानंतर नविन आयुक्त फेब्रुवारीमध्ये आल्यानंतर त्यांनी आदेश काढुन सर्व प्रकारच्या वर्कऑर्डर झालेल्या फाईल व सर्व प्रकारचे काम थांबविण्याचे काम मा.आयुक्तांनी केले. पॅनडॅमिक परिस्थितीमध्ये मा.अध्यक्षांनी बजेट दिले त्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो. बजेटवर या ठिकाणी चर्चा करीत असतांना बाकीच्या सदस्यांनी कुठल्या परिस्थितीमध्ये हे बजेट येत आहे आणि या बजेटमध्ये कामे करण्याचा प्रयत्न मा.अध्यक्षांनी केला आहे. हे सर्वपक्षीय बजेट आहे. सर्व प्रभागाला न्याय देणारे बजेट आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी १५ वर्षात भारतीय जनता पक्षांनी जे केले त्याची मी तुम्हाला आठवण करुन देतो त्या ठिकाणी शहीद स्मारक झाले, संविधान चौकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा बसविण्यात आले व तेथील सौदर्यीकरण करण्यात

आले. त्यामुळे सर्व अर्थाने नागरिकांना न्याय देणारे बजेट मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी सादर केले. महानगरपालिकेचा बाजार विभाग हा अतिशय महत्वाचा विभाग आहे. १२.५ कोटी रुपयांचे उत्पन्न हे स्थावर विभागाचे दाखविले आहे ते उत्पन्न आपण अधिक वाढवु शकतो त्यामध्ये थोडसे दुर्लक्ष होत आहे. नागपूर शहरामध्ये नागपूर महानगरपालिकेचे लिजचे ३ ते ४ हजार प्लॉट आहे. दर ३० वर्षामध्ये लिज हे संपत असते. मागे २००५ साली लिज संपली आहे. त्या लिजच्या नुतणीकरणासाठी विशेष योजना करण्याची आवश्यकता आहे. स्थायी समिती अध्यक्षाव्दारा त्या त्या झोनमधील लिज धारकांच्या संदर्भात शिबीरे आपल्याला घ्यावे लागतील. आणि हे शिबीरे घेत असतांना एक विषय लोकांना समजाऊन सांगावे लागतील, ज्या ज्या प्लॉट धारकांना एफ.एस.आय. घ्यायचा आहे त्यांनी घ्यावा, तसेच कंझर्व्हन्सी लेन रेडीरेकनर व्दारे घेत असतांना मागे निर्णय घेण्यात आला होता तेव्हा रेडीरेकनरचा दर कमी होता परंतु तो आता वाढला आहे. या शहरामध्ये सरकारी अनुदान महाराष्ट्र शासनाकडुन आम्हाला प्राप्त झाले आहे त्याचा उल्लेख मा.स्थायी समिती अध्यक्षांनी आपल्या अर्थसंकल्पामध्ये केलेला आहे. महानगरपालिकेमध्ये विरोधी पक्षाचे जे नगरसेवक आहे. जे महानगरपालिकेच्या उत्पन्नाची चर्चा करतात त्यांना मी विनंती करु इच्छितो की एक संयुक्त शिष्टमंडळ मा.महापौरांच्या नेतृत्वात, मा.पालकमंत्र्यांच्या नेतृत्वात मा.मुख्यमंत्र्यांकडे नेण्याची आवश्यकता आहे. कोव्हीडच्या काळात नागपूर महानगरपालिकेचे उत्पन्न कमी झाले आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी मा.स्थायी समिती अध्यक्षांनी तयारी दर्शविली आहे. आम्हाला जो महसुल उत्पन्न प्रॉपर्टी मधुन व वॉटर वर्क्स मधुन प्राप्त होते त्या महसुली खर्चामध्ये १८ टक्के अतिरिक्त या ठिकाणी कर लागतो. त्यासाठी वन टाईम सेटलमेंट करुन तो देखील कमी करण्याची तयारी आम्ही दाखविली आहे. आम्ही आमचा महसुल कमी करण्यासाठी नागरिकांसाठी तयारी दाखविली आहे. नागपूर शहराला शासनाकडुन किती अनुदान तुम्ही आणु इच्छिता, मा.देवेंद्र फडणवीस व नितीनजी गडकरी यांनी महानगरपालिकेच्या विकासासाठी जर का ६० ते ७० हजार कोटीची जीएसटीच्या वाढी करीता मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी सुरुवात केली. नागपूर महानगरपालिकेला ९४ कोटी रुपयांची जी.एस.टी. देण्याचे काम मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी केले. आम्हाला जी.एस.टी. जो प्राप्त होतो तो राज्य शासन या ठिकाणी देते आहे. परंतु त्या जी.एस.टी. मध्ये नागपूर महानगरपालिकेचा महसुली खर्च हा या ठिकाणी कमी होत आहे. परंतु या ठिकाणी माझी विनंती आहे आपणामार्फत की महानगरपालिकेचे एक शिष्टमंडळ मा.महापौरजी यांच्या नेतृत्वात विरोधी पक्षाच्या सर्व सदस्यांनी महाराष्ट्र शासनाकडे देऊन आमचा जो महसुल राज्य शासनाकडे आहे तो आणण्याचा या ठिकाणी प्रयत्न केला पाहिजे. मी मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे अभिनंदन करेल, यावेळी वाटले होते की नगरसेवकांच्या हिताचे जे दोन हेड आहे त्यामधील एक हेड राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रस्ते उभारणी आणि दुसरा हेड जो आहे तो वार्ड फंड परंतु तो सुध्दा तुम्ही कमी होऊ दिला नाही या ठिकाणी भरीव वाढ केली २० लक्ष प्रति सदस्य त्या वार्डाला या ठिकाणी आपण तरतुद केली. त्यामुळे ख-या अर्थाने हे बजेटच्या अंमलबजावणीसाठी जरी आम्हाला कमी पिरेड मिळाला तरी पुढच्या तीन महिन्यामध्ये अंदाजपत्रकाच्या भाग १ मध्ये महसुली व भांडवली खर्चाच्या परिशिष्ट १ आणि २ मध्ये प्रत्येक प्रभागातील सदस्याच्या अति विशीष्ट आणि तातडीच्या कामाच्या ज्या फाईल आहे त्याला सभागृहामध्ये आपण मान्यता देत आहे. त्यामुळे सभागृहात मान्यता दिल्यावर त्या ठिकाणी कामे पुर्ण होतील, असा मला विश्वास आहे. पुनश्च: मी स्थायी समिती अध्यक्षाचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो. आणि महानगरपालिकेच्या इतिहासाची नोंद या सभागृहात होणारच आहे. परंतु या सगळया ॲक्टमध्ये सर्व सदस्यांचे मी विशेषत: अभिनंदन करेल, की ज्यावेळी कोरोना सुरु झाला त्यावेळी अशी परिस्थिती निर्माण झाली होती की या नागपूर शहरामध्ये सुरुवातीचे दोन महिने तर प्रशासन व राज्य सरकार यांना हे कळलेच नाही की ॲपेडमीक ॲक्ट कसा सांभाळावा, या ठिकाणी आमचे

कर्तुत्ववान आयुक्त आले या आयुक्तांनी घोषणा केली की ५००० लोकांची व्यवस्था उभी करेल व एकाही रुग्णाची मी मृत्यु होणार नाही. सुरुवातीचे दोन महिने मा.आयुक्त हे २४ बाय ७ सोशल मिडीयावर राहिले, २ ते ३ ठिकाणी जाऊन मिडीयामध्ये मी कोव्हीड हॉस्पीटल सुरु करतो अशी घोषणा केली. सर्व नागरिकांना असे वाटले की हा आयुक्त हा देशातील सर्वात चांगली व्यवस्था सांभाळेल परंतु सुरुवातीचे २ महिने मा.आयुक्तांनी या ठिकाणी प्लॅनिंगमध्ये घालविले, आणि त्यानंतर संपुर्ण सच्चाई आमच्या समोर आली. आमच्या शहरात हजारो मृत्यु झाले. आणि संपुर्ण राज्य सरकार हे पेनडॅमिक परिस्थितीमध्ये फेर झाले आणि या संपुर्ण परिस्थितीमध्ये सर्व नगरसेवकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता, आपल्या आरोग्याची काळजी न करता, नगरसेवक घराच्या बाहेर निघाले, महापौर घराच्या बाहेर निघाले, आणि या सर्व लोकांनी आपआपल्या प्रभागातल्या आणि शहरातील जनतेला उपाशी पोटी राहु दिले नाही. प्रत्येकांनी किटची व्यवस्था केली, औषधांची व्यवस्था केली. नागपूरातील सर्व एनजीयो या सर्व रस्त्यावर आल्या. पोलीसांनी सहकार्य केले. आणि या परिस्थितीमध्ये ख-या अर्थाने नमुद करेल की या ठिकाणी कौतुक पोलीसांचे होते, तसेच महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे कौतुक होते त्यांनी जिवाची बाजी लावली, परंतु सर्व सदस्य जीवाची बाजी लाऊन अनेक लोक पॉझिटीव्ह झाले, या शहरात अनेक नगरसेवक सिमटेमॅटीक झाले, ॲडमिट झाले, अनेक लोकांना आपल्या आयुष्याशी खेळावे लागले, परंतु या ही परिस्थितीत नागपूर महानगरपालिकेच्या सदस्यांनी आपल्या प्रभागातील जनतेला अन्न देण्याचे काम केले, औषधे देण्याचे काम केले, हॉस्पीटलाईज करण्याचे काम केले, मी त्या सर्वांचे अभिनंदन करतो. आणि या ठिकाणी पुनश्च: एकदा या बजेटला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो, धन्यवाद.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, आणि आयुक्त तसेच सर्व अधिकारी आणि कर्मचारी तसेच सर्व नगरसेवकगण आणि पत्रकार बंधुनो, मा.महापौरजी, मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांनी खूप कठिण परिस्थितीमध्ये खूप मेहनत घेवून हा बजेट बनविलेला आहे. बजेट वाचल्यानंतर निश्चितच मी म्हणु शकते कि एक सदृढ बजेट बनविण्याचे प्रयत्न आमचे लहान बंधु श्री झलकेजीनी केलेले आहे. परंतु मा.महापौरजी, काही कमतरता सुध्दा या बजेटमध्ये राहिलेली आहे, ते मी येथे आपल्या सगळयांच्या निदर्शनास आणुन देते. तसेच आपणांस निवेदन करते कि, मी जे आपणांस सांगत आहे ते आपण आपल्या शेवटच्या रुलिंगमध्ये समाविष्ट करुन या बजेटला मंजूरी द्यावी. मा.महापौरजी, मा.अध्यक्ष, स्थायी समिती मैं यह कहना चाहती हुॅं कि, जन जन की सुनो सरकार। म.न.पा. पुरी हो गयी कंगाल कि पैसा बोलता है, कि पैसा बोलता है। जन जन की सुनो सरकार कि, म.न.पा. हो गयी गोलमाल कि पैसा बोलता है कि, पैसा बोलता है। मा.महापौरजी, निश्चितरुपसे पैसा बोलता है और पैसा डोलता भी है। इसका तात्पर्य यह है कि मैं महाराष्ट्र सरकार का विशेष रुपसे यहां अभिनंदन करना चाहती हुॅं महाराष्ट्र सरकार ने १४११ रुपयो का अनुदान देकर महानगरपालिका को सक्त बनाने की कोशिश की है जो कि बहोत ही प्रशंसीय बात है इसलिये मैं राज्य सरकार का अभिनंदन करती हुॅं। मा.महापौरजी, अगर सरकार हमे निधी नही देती तो हम बजेट नही बना पाते और विकास काम हमारे हो नही पाते, मा.अध्यक्ष महोदय यह अच्छा काम आपने किया है कि, जिन पुराने कामो को तत्कालीन आयुक्त महोदय ने रोक दिया था, उन कामो को आपने इस प्रस्तावित बजेट मे सम्मीलीत किया है, एक आशा की किरण नगरसेवक के मन मे जागी है, लेकिन आशा की किरण जगाने से नही होता उसको सार्थक रुप तब ही मिल पायेगा जब विकास काम होंगे और जनता को मुलभुत सुविधाऐ मिल पायेगी। मा.अध्यक्ष महोदय, पुराने काम जिनके वर्क आर्डर हो गये है, जिनकी निविदाऐ निकल गयी है, उनकी यादी आपने हर झोन से मंगवाई ऐसी मुझे जानकारी मिली है। दुरध्वनी पर आपसे संपर्क होने के बाद

मा.अध्यक्ष महोदय आपने मुझे भी यह बताया कि, ताई मैंने हर झोन से यादी मंगवाई है। यादी मंगवाने के बाद जिन कामो का समावेश उस यादी मे था, यह जो अंदाजपत्रक भाग एक है जिसमे महसुली व भांडवली ज्याच्यामध्ये एक व दोन तुम्ही नमुद केले आहे. ती सगळी यादी त्याच्यामध्ये समाविष्ट केलेली आहे. असे तुम्हीच सांगीतले, परंतु मा.अध्यक्ष, महोदय माझ्या प्रभाग २० (क) च्या कामाची यादी त्याच्यामध्ये समाविष्ठ झालेली नाही. तसेच अनेक नगरसेवक है ज्यांच्या प्रभागाच्या कामाच्या यादीचा समावेश त्याच्यामध्ये झालेला नाही, म्हणुन आपणांस निवेदन करते कि, आमच्या ज्या कामाचे वर्क आर्डर झालेले आहे, त्या कामाला तुम्ही तात्काळ या बजेटमध्ये मंजूरी द्यावी, असे निवेदन मी आपणांस करीत आहे. मा.महापौरजी, जब भी आप आर्थिक बजेट बनाते है तो इसमे आय और व्यय इन दोनो पहलुओ की महत्वपुर्णता होती है, मैं आय के कुछ स्त्रोतो को आपके सामने रखना चाहती हुं। मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्त महोदय ने २८९ करोड रुपये प्रापर्टी टॅक्स मे रखे थे, जिसमे पिछले वर्ष २४६ करोड रुपये जमा हुऐ थे, मा.महापौरजी, अभी अध्यक्ष,स्थायी समितीने इसमे २२३ कोटी रुपये रखे है, इसमे आपने ६७ करोड रुपयो की आय कम दर्शायी है। मा.महापौरजी, आपकी अध्यक्षता मे पिछले २३ अगस्त को आपने एक बैठक आयोजित की थी, और उस बैठक मे आपने सारे जनप्रतिनिधीयो को शहर के सभी आमदारो को बुलवाया था, उस मिटींग की प्रोसीडींग भी है जिसमे आपने निवेदन मा.आयुक्त महोदय से किया था कि जो पानी टॅक्स है और जो मालमत्ता टॅक्स है, वह ५० प्रतिशत कम किया जाये, लेकिन मा.महापौरजी आपने यह बात तत्कालीन आयुक्त श्री मुंढेजी पर ढकेल दी थी। और आज आप राज्य सरकार पर ढकेल रहे है मैं आपको कहना चाहती हुँ कि, प्रिन्सीपल अमाउंट कम करने का अधिकार यह राज्य सरकार को है और और पॅनाल्टी शास्ती माफ करने का अधिकार यह हमारे आयुक्त महोदय को है, मैं इस चर्चा के माध्यमसे आयुक्त महोदय से निवेदन करना चाहती हुं कि, कोविड जैसी महामारी के चलते आज हर आदमी आर्थिक रुप से तंगी का सामना कर रहा है और इसलिये आयुक्त महोदय मैं आपसे निवेदन करती हुं कि, मालमत्ता कर और पानी कर मे कम से कम ५० प्रतिशत की कमी आपने करनी चाहिये, हमे इसपर सकारात्मक निर्णय लेना होंगा, मालमत्ता कर व पानी कर यह कम होना यह समय की आवश्यकता है, इसलिये आप जल्द से जल्द यह कम करे। पिछले आयुक्त ने ढाई करोड रुपये एलबीटी से अंगित कि थी और उससे ज्यादा हमारे पास जमा भी हुऐ, लैकिन एलबीटी आज अबॉलिश हो गयी है, अगर इसमे रिलॅक्सेशन मिलेगा तो उसका फायदा व्यापारी बंधुओ को मिलेगा, इसलिये हमने इस पर निर्णय लेकर सरकार के पास एक ठराव भेजना चाहिये। मा.महापौरजी, मार्केट ऐसा स्त्रोत है जो महानगरपालिका के मुख्य आय के स्त्रोत मे आता है, आयुक्त महोदय ने १४२५ कोटी रुपये इसमे रखे थे, और अभी के अध्यक्ष महोदय ने भी १४२५ कोटी रुपयो की आय इसमे अपेक्षित की है। मा.महापौरजी, मैं यह कहना चाहती हुं कि, छोटे छोटे दुकानदार नागपूर महानगरपालिका के मार्केट मे बैठे हुऐ है, हमारे दुकानधारक या ओटेधारक जिनको हमने ओटे अलॉट किये है, वह छोटी छोटी दुकान लगाकर बैठते है और लॉकडाउन मे उनका व्यापार भी पुरी तरह बंद हो गया है। मा.महापौरजी, ऐसे वक्त मे मानवता को ध्यान मे रखते हुऐ हमने सबने यह निर्णय लेना चाहिये कि, जो पॅनाल्टी इन ओटेधारको पर लग रही है वह पॅनाल्टी हमने तात्काल माफ करनी चाहिये। मा.महापौरजी, अगर आप कहते है कि हमको महानगरपालिका की आय बढानी है तो आप प्रिन्सीपल अमाउंट ले सकते है, छोटे दुकानदारो को तुरंत व्यवसाय करने का मौका देना चाहिये। मा.महापौरजी, स्थावर विभाग हमारे महानगरपालिका का एक महत्वपुर्ण विभाग है, मा.महापौरजी, इसपर बहोत ज्यादा अनदेखी नागपूर महानगरपालिकाने की है, मा.महापौरजी, इसका तात्काल डिजीलॉयझेशन किया जाना चाहिये, ऐसा मैं अनेक वर्षो से देख रही हुं इतनी अनियमितता इस विभाग मे है कि आज भी वहां मॅन्युअली काम होते है। मा.महापौरजी, आज हम ई-गर्व्हनेंस की बात करते है, टॅक्नालॉजी की बात करते है

लैकिन आज भी स्थावर विभाग मे बहोत सारी प्रापर्टीयो का ग्राउंट रेंट नही बनाया गया है। क्या हम ऐसे प्रापर्टीयो की यादी नही बनासकते क्या हम उन लोगो से पैसा वसुल नही कर सकते, कर सकते है लैकिन इसके लिये आपकी मानसिकता चाहिये मैं आपसे विनंती करती हुॅं कि, स्थावर विभाग एक ऐसा विभाग है जिसका नगररचना विभाग से समन्वय होना बेहद आवश्यक है। लैकिन अनेक ऐसे उदाहरण मेरे सामने आये है जिसमे समन्वय बिल्कुल नही है, महानगरपालिका की प्रापर्टी लिज पर दी गयी है, उन प्रापर्टीयो पर बिल्डरो ने बिल्डींग बनवाली, वह लोगो को बेचकर चले गये, लेकिन उस जगह का आज भी ग्राउंट रेंट जमा नही किया गया, यह किसका दोष है यह महानगरपालिका का नुकसान हो रहा है अगर आय के स्त्रोत पर आपने ध्यान दिया होता तो निश्‍चितरुपसे यह विषय आपके सामने आया होता। हमने इन सारी चिजो को जल्द से जल्द ठिक करके आगे कदम रखने चाहिये। मा.महापौरजी, इसके साथ साथ हमारे यहां जाहिरात विभाग है इस विभाग के व्दारा जानबुझ्कर बडी कंपनीयो को फायदा पहोंचाने के काम किये जाते है, ऐसा मेरा आरोप है। एक तरफ आप लोग बडी बडी बाते करते है, बडे बडे जुमले देते है कि हमारी इतनी इनकम होंगी, एक तरफ हम इंकम होने के लिये आय के स्त्रोतो को खोज रहे है अरे जो आय के स्त्रोत हमारे है, उनमे हमने यह सारी चिजो को सम्मीलीत करना चाहिये, जिससे हमारे आय बढ सकती है। मा.महापौरजी, गरीबो पर अन्याय करने और बडी बडी कंपनी को फायदा पहोंचाने का काम स्थावर विभाग मे किया जाता है यह मेरा सीधा आरोप है मैं बताना चाहती हुॅं कि, सन २०१३ मे जाहिरात विभाग ने एक टेंडर निकाला और टेंडर मे एन.एम.सी. साईट और प्रायव्हेट साईट के बारे मे दर्शाया गया, एन.एम.सी. साईट का नियंत्रण सिव्हील कार्यालय से किया जाता है और प्रायव्हेट साईट का नियंत्रण झोनल कार्यालय से किया जाता है, मा.महापौरजी, यह टेंडर केवल तीन वर्ष के लिये निकाला गया था, मा.महापौरजी, तीन वर्ष पुर्ण होने के बावजुद भी इसे आज इतने वर्ष हो गये एक्स्टेंशन, एक्स्टेंशन दिया जारहा है, मा.महापौरजी, मुझे इसमे कही न कही आप लोगो का सत्ताधारी का गलत इंट्रेस्ट लगता है। अगर आपको लगता है तो आप अभी भी उसके टेंडर निकाल सकते है ओपन कॉम्पीटीशन होंगी, मा.महापौरजी, ज्यादा पैसा महानगरपालिका को प्राप्त होंगा। कही कंपन्या है, वह म.न.पा. को पैसे देंगी, जो प्रिन्सीपल अमाउंट जो अग्रीमेंट महानगरपालिका ने किया है, उस अग्रीमेंट के हिसाब से हमने अमाउंट डिपॉझीट करना चाहिये, अगर वह कंपनी रकम जमा नही करती तो हमने उनसे पॅनॉल्टी वसुल करनी चाहिये हम गरीब लोगो पर पॅनाल्टी लगाते है लैकिन बडी कंपनी को छुट देते है। यह बात सोंचने की नितांत आवश्यकता है और इसलिये मेरी यह मांग है कि उन बडी कंपनीयो से पॅनाल्टी वसुल की जाये बडी कंपनीयो से और पैसा हमारी तिजोरी मे जमा किया जाये। मा.महापौरजी, पिछली सभा मे विषय क्रमांक १०७ लाया गया था कि, ओ.सी.डब्लु को ५२ कोटी रुपये देने का, मा.महापौरजी, मैं आपसे निवेदन करना चाहती हुॅं और पुछना भी चाहती हुॅं कि आप बताईये कि नागपूर शहर मे ऐसे कितने एरीआ है जहां ओसीडब्लु ने २४ बाय ७ लागु किया है, आज ८० प्रतिशत ऐसे एरीअे है जहां ओसीडब्लु ने २४ बाय ७ लागु नही किया है केवल ३० प्रतिशत ऐसे एरीआ है जहां २४ बाय ७ लागु किया गया है, इस कंपनी ने अग्रीमेंट के अनुसार कौन कौनसी चिजे की है, हमारा इनके साथ क्या अग्रीमेंट था और इन्होने कौन कौनसे काम किये है, यह देखने की आवश्यकता नही है क्या ? केवल प्रस्ताव बनाते है कि हमको ५२ कोटी रुपये ओसीडब्लु को देना है, आज भी लोगो को गंदा पानी दिया जारहा है, आज भी नागपूर शहर टॅकरमुक्त नही हुआ है, मैं आपसे निवेदन करती हुॅं कि, ओसीडब्लु को यह ५२ करोड रुपये न देकर इस निधी का उपयोग विकास निधी मे करना चाहिये। मा.महापौरजी, प्रधानमंत्री आवास योजना के बारे मे मैं कुछ कहना चाहता हुं, मैं जानती हुॅं कि यह योजना केंद्र सरकार ने बनाई है इस योजना के तहत ९० प्रतिशत सबसिडी तब मिलती थी जब कॉग्रेस की सरकार थी, आज मैं दोनो पार्टीयो के साथ नही हुॅं लैकिन यह बात मैं निष्पक्ष रुपसे कहना चाहती हुॅं कि, जब कॉग्रेस की सरकार

थी तब जे.एन.यु.आर.एम. योजना अंतर्गत बीएसयुपी के जीज ९० प्रतिशत सबसिडी मिलती थी और गरीब जनता को १० प्रतिशत भरना पडता था, लैकिन आज पीएमवाय के अंतर्गत ९० प्रतिशत जनता को भरना पड रहा है और १० प्रतिशत की सबसिडी मिल रही है इसलिये जनता परेशान है, आज जनता पैसे नही भर पारही है, लोगो ने छोड दिया, मा.महापौरजी, आज भी पी.एम.वाय. के अनेक फलॅट खाली है, इसलिये मैं आपसे निवेदन करती हुँ कि, पटटे वाटप पर ज्यादा से ज्यादा ध्यान देकर गरीबो के साथ न्याय करना चाहिये ताकि लोगो को सहारा मिले, ताकि लोगो के सर पर छत मिले यह मैं आपसे मांग करती हुँ। सातवे वेतन आयोग की बात मा.अध्यक्ष महोदय ने की, आपने आपके भाषण मे इस बात का उल्लेख किया, लैकिन हर बार लॉलीपाप देने का काम अध्यक्ष महोदय अपने भाषण मे करते आये है, यह मैं आरोप इसलिये लगा रही हुँ कि, आपही बताईये आपने आपके भाषण मे कहां कि, तारीख २८-०६-२०१९ को ठराव लिया गया ठराव क्रमांक ४०९ जिसमे सातवे वेतन आयोग की राशी दी जाये लैकिन मैं पुछना चाहती हुँ कि, जब आपकी सत्ता थी तो तब वह काम क्यों नही किया गया, लैकिन सातवे वेतन आयोग की आड मे मालमत्ता कर व पानी कर को कम न करने की यह आप सब लोगो की साजिश तो नही है, आगे चलकर घाटो की बात करती हुँ कि, शहर के छे घाटो मे ब्रिटेक्स आपने फ्री किये लैकिन अंतिम संस्कार के लकडीयो के पैसो का शुल्क वसुल किया जारहा है, इस चर्चा के माध्यम से मेरा निवेदन है मा.आयुक्त महोदय से मा.महापौरजी से कि, अंतिम संस्कार के लिये लगनेवाली लकडी यह हर किसी को निशुल्क मिलनी चाहिये, इसके लिये कोई भी पैसा वसुल नही किया जाना चाहिये । मा.महापौरजी, एन.डी.एस. की बात करती हुँ इस विषय मे एक अजीबोगरीब बात मेरे सामने आयी कि, ५ करोड रुपये हर वर्ष उनकी सॅलेरी देने के लिये खर्च होते है, यह वर्तमानपत्र मे जाहिरात किसने दी यह नागपूर महानगरपालिका ने दी, यह क्यों दी क्योंकि सुरक्षा रक्षको की जरुरत थी, आपने उन लोगो को काम पर लिया फिर उसके बाद ५ करोड रुपयो को घटाकर आपने ढाई करोड रुपये कर दिया आज जो सुरक्षा रक्षक हमारे यहां है, वह सुरक्षा रक्षक हम क्या कम करने वाले है, हमने इस बात पर सोंचना चाहिये। व्यवस्थाऐ जहां खराब होती है वहां एन.डी.एस. के लोग पहोंचकर काम करते है हमारी नाराजगी का सामना करते है कई बार जनता की नाराजगी का सामना करते है लेकिन अगर मा.महापौरजी इनपर अन्याय हुआ तो यह बहोत गलत बात है, और इसलिये आपसे मांग करती हुँ कि, सुरक्षा रक्षको के लिये और हमारे महानगरपालिका की मालमत्ता की सुरक्षा के लिये इन व्यवस्थाओ की निगरानी के लिये पांच करोड रुपये रखे राशी रखे ताकि इनपर किसी भी प्रकार का अन्याय न हो। मा.महापौरजी, आपली बस का हम बहोत व्याख्यान करते है इसमे १०८ करोड रुपये तत्कालीन आयुक्त महोदय ने रखे थे, ओर १०८ कोटी रुपये हमारे अध्यक्ष महोदयने भी रखे है लैकिन अब तक आपली बस क्यों शुरु नही हो पाई है। अभी एक नगरसेवक कह रहे थे कि, महाराष्ट्र सरकार बस चला रही है, लैकिन मैं कहना चाहती हुँ कि, महाराष्ट्र सरकार ने व्यक्तिगत निर्णय लेने के लिये नागपूर महानगरपालिका को निर्देश दिये है, आज मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे और दिल्ली सब जगह बसेस शुरु हो गयी है, लैकिन हमारे यहां बस शुरु क्यों नही हुई है क्या हम बस नही चला सकते, अगर हम बस नही चला पारहे है तो हमने एम.एस.आर.डी.सी. से बस क्यों ली, मेरी मांग है कि, जल्द से जल्द बसेस शुरु करके यहां की जनता को रिलीफ दिया जाये। मा.महापौरजी, एक आखरी निवेदन करती हुँ जिस तरह राज्य सरकारने पोलिस कर्मचारीयो के लिये निर्णय लिया जितने अधिकारी, कर्मचारीयो की कोरोना से मौत हुई उनको ५० लाख रुपयो का मुआवजा देने के संदर्भ मे निर्णय लिया है उस तरीके से हमने भी अपने अधिकारीयो और कर्मचारीयो को मुआवजा देने का निर्णय लेना चाहिये, वह अधिकारी, कर्मचारी जिनकी कोरोना के कारण मौत हुई है, उन्हे कोरोना के काल मे डयुटी की, उस वक्त उनकी मौत हुई, अगर हम उनको २५ लाख का मुआवजा देते है तो उससे बडा मानवता का काम कोई दुसरा नही होंगा और इसलिये मैं आपसे कहना चाहती हुँ कि, उन्हे भी २५

लाख का मुआवजा देने के संदर्भ मे बजेट को मंजूरी देते वक्त घोषणा करे। हेल्थ डिपार्टमेंट के लोग, आशा वर्कर इन लोगो ने दिन रात काम किया, सुबह छे से लेकर के रात ९ बजे तक इतना काम किया है कि उनकी जितनी प्रशंसा की जाये उतनी कम है। मा.महापौरजी, लैकिन प्रशंसा से पेट नही भरता, प्रशंसा से काम नही होते, मा.महापौरजी, मेरी आपसे प्रार्थना है कि इन लोगो को इंसेन्टीव्ह दिया जाये, इन लोगो को प्रोत्साहनपर राशी दी जाये ताकि यह लोग आगे चलकर और अच्छा काम कर सके। मा.महापौरजी, मस्कासाथ के ट्रंक लाईन के संदर्भ मे एक बहोत अच्छा विषय मा.सदस्य, श्री रमेश पुणेकरजी ने रखा हम दोनो मिलकर मा.आयुक्त महोदय के पास मे गये थे, आयुक्त महोदय ने बहोत अच्छे से हमारे निवेदन को स्विकार किया, उन्हे कहां कि हा सच मे वह काम पुरा होना चाहिये, लैकिन मा.महापौरजी, उस दिशा मे अगर वह काम ८ दिन मे शुरु नही हुआ तो हम लोग जनता के साथ उग्र आंदोलन करेगें वह ट्रंक लाईन अंग्रेजो के जमाने की है, वहा ३५ फिट गहरे चेंबर्स है, और चेंबर के पास बडे बडे गडडे हो गये है, इसलिये आपसे निवेदन करती हुॅ मैंने जिन जिन मांगो को आपके पास रखा है, बजेट को मंजूरी देते वक्त आप मेरी इन सारी बातो को बजट सम्मीलीत करे, यही आपसे निवेदन करती हॅ, मा.महापौरजी, आपने मुझे बोलने का मौका दिया इसलिये मैं आपको धन्यवाद देती हुॅ। जय महानगरपालिका, जय महाराष्ट्र, जय विदर्भ।

श्रीमती नंदा जिचकार:- मा. महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.आयुक्तसाहेब, या महानगरपालिकेचे मा.सत्तापक्ष नेते,विरोधी पक्ष नेता, सर्व नगरसेवक, पत्रकारबंधू. मा. महापौरजी, मला असे वाटते, मा.स्थायी समिती अध्यक्षांनी या ठिकाणी जे बजेट आपल्या समोर मांडलेले आहे. या बजेटची सगळे जण आतुरतेने वाट पाहत होते. सभागृहातील सगळया नगरसेवकांनी मान्य केले की एवढया कठीण स्थितीमध्ये मा.स्थायी समिती अध्यक्षांनी हे बजेट प्रस्तुत केले आणि आज त्यावर चर्चा करीत आहे. सगळयांच्या मनात शंका येत होती की या नागपूर शहरासाठी सेवा करीत असतांना लोकप्रतिनिधी म्हणून आपण जेव्हा निवडून आलो तर या वर्षी आपल्याला काम करता येणार नाही आणि मग लोक आपल्या दारावर येतील आणि आम्ही त्यांना कारणेच सांगत बसणार आहे. परंतु या सर्व प्रश्नामधून आज मा.महापौरजी यांच्या मागदर्शनामध्ये विजयजी झलके यांनी सगळयांची समस्या सोडविली. प्रत्येक नगरसेवकांना सुध्दा वार्ड निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. आज आपण बघतो, शहराच्या विकासाला एक प्रकारची खिळ बसलेली होती. हे शहर मा. मुख्यमंत्र्यांचे शहर, हे शहर मा. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी आणि मा.देवेंद्र फडणवीस यांचे शहर म्हणून एकप्रकारचा दुस्वास या सध्याच्या मुख्यमंत्र्यांनी मांडलेला होता. त्या सुड भावनेतून जे आयुक्त कुठल्याही शहराचा विकास करु शकले नाही. आज जर त्याची गोळाबेरीज केली तर तत्कालीन आयुक्त यांच्या कार्यकाळात नागपूर शहराचा विकास जो आहे तो शुन्यच दिसतो. परंतु आज या नागपूर शहराची बागडोर मा.महापौरजी यांच्या खांद्यावर आहे. ते यशस्वीपणे संपुर्ण शहराचा विकासाला चालना देत आहे आणि यात सर्वात मोठा वाटा स्थायी समिती अध्यक्ष विजयजी झलके यांचा आहे. आपण बघतो, आपला देश हा कृषी प्रधान आहे आणि आपल्या देशातील शेतकरी हा या देशाचा पाठीचा कणा आहे. त्यांचा सुध्दा विचार आपले तत्कालीन सन्माननीय मुख्यमंत्री यांनी शेतक-यांना संपुर्ण बाजारपेठ खुली करुन दिली. मध्ये कोठलाही दलाल नाही. शेतकरी आपला माल स्वत: बाजारपेठेत विकू शकतात यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. या त्यांनी घेतलेल्या निर्णयात आपण बघतो तर सर्वत्र क्रांती झालेली आहे. शेतकरी बाजार उघडलेला आहे. याला सन्माननीय विजयजी झलके यांनी शेतकरी बाजाराला १० करोड रुपयाचा निधी ठेवला. महानगरपालिकेची आरक्षित जागा सुध्दा अव्हेलेबल करुन देतील असे जाहीर केले. त्याबद्दल स्थायी समिती अध्यक्षांचे त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करते. त्यांनी अनेक अशी कामे जाहीर केलेली आहे ती अद्यापपर्यंत या

शहरात झालेली नाही. आपण बघतो, अंत्योदय चालता फिरता दवाखाना जाहीर केला. त्यांच्या योजना त्यांच्या डोक्यातुन, सर्व पक्षीय नेत्यांच्या मार्गदर्शनाने जाहीर केलेल्या आहेत. त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. मला एकच सुचना करावयाची आहे. आता जेव्हा हा चालता फिरता दवाखाना राहील तेव्हा वेंन्टीलेटरची सोय त्या ठिकाणी असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण वेंन्टीलेटर नसेल तर अनेक लोकांचे जीव जावू शकतात. या बजेटमध्ये पुन्हा मी स्थायी समिती अध्यक्षांचे मनपुर्वक अभिनंदन करेल त्यांनी वंदेमातरम उद्यान आणि गणित उद्यान असे दोन प्रोजेक्ट जाहीर केले आहे ते आपल्या शहराच्या एक पोषक वातावरणासाठी अत्यंत आवश्यक असे प्रोजेक्ट आहेत. या ठिकाणी आपण ८० टक्के उद्यानामध्ये बघतो नागरिकांसाठी व्यायाम करण्यासाठी ग्रीन जीम लावलेले आहेत. ग्रीन जीम मुळे नागरिकांचे आरोग्य आणि इतकी इम्युनिटी डेव्हल्प झालेली आहे हे आपण या कोव्हीडच्या महामारीमध्ये बघितलेले आहे. या ग्रीन जीमचा वाटा नागरिकांचे आरोग्य चांगले ठेवण्यामध्ये आहे. यामध्ये एकच सुचना कराविशी वाटते, हे जे जीम आहेत त्यांचे मेंटेन्स मात्र आपण लक्ष देवून करायला हवे. नागरिकांच्या तक्रारी येतात, ग्रीन जीम आहे मात्र त्या आऊटडेटेड झालेल्या असतात, तुटलेल्या असतात. त्याचे मेंटेन्ससाठी काही तरी योजना आपण आपल्या बजेटमध्ये नक्की करावी. आज अत्यंत कौतुकास्पद असा निर्णय मा.स्थायी समिती अध्यक्षांनी घेतला आहे. मला असे वाटते मा.महापौरजी यांचे सुध्दा इच्छा होती विशेष पोलीस पथक या शहरासाठी असावे. ही महत्वाची बाब आहे. जेव्हा अतिक्रमण काढण्यासाठी महानगरपालिकेचे अतिक्रमण पथक जाते आणि पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवितो तेव्हा पोलीस विभाग म्हणते की भांडणे होवू दया, मारामारी होवू दया त्यानंतर पोलीस त्या ठिकाणी येईल. ही गोष्ट अशी होती की याबद्दल आपले होत बांधले गेले होते. कुठे तरी कायद्याच्या चौकटीत सापडलेलो होतो. खरचं पोलीस येत नाही, या ठिकाणी तर आपल्याला धोका आहे आणि आपण अतिक्रमण काढायचे कसे. यासाठी स्वत:चे विशेष पोलीस पथक असणार ही बाब फार मोठी आहे. हे शहर स्वच्छ करण्यासाठी, या शहरातील अतिक्रमण साफ करण्यासाठी विशेष पोलीस पथकाची मदत खुप चांगली होणार आहे. एक क्रांती या शहराकरिता होईल. या शहरातील अतिक्रमण काढण्यासाठी या पोलीस पथकाची आपल्याला मदत होईल या साठी मा.महापौरजी आणि मा.स्थायी समिती अध्यक्ष यांचे मी मनपुर्वक अभिनंदन करते. मा.महापौरजी, आज आपण म्हटले, दहा झोनमध्ये १० शीतपेटी आपण देणार आहे. ही सुध्दा समाजाकरिता आवश्यक असणारी बाब आहे. या कोव्हीडच्या काळामध्ये आपण बघितले असाल की शीतपेटी सुध्दा उपलब्ध होत नव्हती आणि त्यामुळे अत्यंत त्रास व्हायचा. अशा १० शीतपेटी दहा झोनमध्ये देणार असू तर या सारखी चांगली गोष्ट नाही. आज सन्मानीय महापौरजी यांच्या इच्छेनुसार , जो कुणी महापौर म्हणून येईल त्याची मनापासून इच्छा असते की त्याचे शहर हे स्वच्छ आणि सुंदर असावे आणि या शहरातील प्रशासन हे सुस्थितीत राहील. मा.महापौरजी यांनी प्रत्येक ठिकाणी टायलेट उभारण्यासाठी पुढाकार घेतला. शहरातील नागरिकांसाठी टायलेट आवश्यक आहे. आता नागरिकांच्या सवयी हळूहळू बदलत आहेत. जेव्हा प्रशासन त्यांना टायलेट अव्हेलेबल करुन देतील तर या शहराचा हाही प्रश्न सुटेल. आज या नागपूर शहरामध्ये फिरतांना अनेक ठिकाणी असे जाणवते की हे काम करण्याची गरज आहे. फक्त इच्छाशक्ती असेल तर लोकांच्या सपोर्टने अनेक गोष्टी करु शकतो. उदाहरणार्थ नागपूर शहरातील मटन मार्केट जे आपल्याला व्यवस्थित लावणे गरजेचे आहे. या शहरातील भाजीपाला विक्रेत्यांचा प्रश्न होता तो आपण सोडविलेला आहे. अशा ठिकाणी जे मटनमार्केट आहेत त्यामुळे कुत्र्यांचा जो त्रास होतो तोही प्रश्न आपला सुटू शकतो. अशा अनेक छोटया छोटया गोष्टी मध्ये मा.महापौरजी आणि मा.स्थायी समिती अध्यक्ष यांनी लक्ष देवून त्यासाठी चालना त्या विषयाला दिलेली आहे परंतु गांभीर्यपुर्ण या विषयावर लक्ष देण्याची गरज आहे. मा.महापौरजी, आभाताई पांडे यांचे भाषण मी ऐकत होती त्या डब्यातुन काहीतरी खात होत्या. मला ही खुप इच्छा झाली आणि

मलाही भुख लागलेली आहे परंतु करु तर काय करु कारण मा.महापौरजी यांनी आदेश दिले होते की सभागृह चालत असतांना कृपया काही खाऊ नये तो विषय तसाच ठेवला. आभाताई पांडे कॅमेरा बंद करण्यास कदाचित विसरल्या असतील परंतु अशी काही चुक माझ्या हातातून होवू नये असे मी कटाक्षाने पालन करेल. आभाताई पांडे यांनी म्हटले, टेंडर मध्ये कुठेतरी सत्तापक्ष यांचा गलत इंट्ररेस्ट आहे. आता प्रत्येक गोष्ट ऑनलाईन असते, प्रत्येक टेंडर ऑनलाईन असते. प्रत्येक टेंडरमध्ये तुम्ही म्हणा, आम्ही म्हणा, महापौर म्हणा, कुणीही काहीही करु शकत नाही. तेव्हा आपल्या लक्षात येईल की हा गलत इंट्ररेस्ट ऑनलाईन प्रोसेसमध्ये कुणीही इंटरफेअर करु शकत नाही. म्हणून मला वाटते हे डोक्यातुन काढून टाकावे की सत्तापक्षाचा कुठे तरी गलत इंन्ट्रेस असतो. त्यांनी असेही म्हटले की हर किसी को श्मशान मे लकडी जो है फ्री मे मिलना चाहिए, हर किसी का अर्थ क्या ? माझ्या सारखीला कशाला फ्री पाहिजे. या शहरात अनेक श्रीमंत लोक राहतात त्यांना कशाला फ्री मध्ये लाकडे हवीत. त्यांनी म्हटले असते की इस शहर के गोरगरीब तर मी समजू शकली असती, त्यांनी म्हटले असते की इस शहर की बेवारस जनता के लिए तर मी समजू शकली असती. परंतु हर किसी को श्मशान मे लकडी फ्री मिलनी चाहिए हे म्हणजे काय ? महानगरपालिका ही माझी आहे. महानगरपालिकेचा पैसा हा लुटण्यासाठी नाही तर महानगरपालिकेचा पैश्याचा योग्य वापर व्हावा. गोरगरीबांसाठी वापर व्हावा. गरीबांसाठी हे शासन आहे. गरीबांसाठी त्याचा उपयोग व्हावा असे मी मानते. आज आपण बघतो. जेव्हा राज्य सरकार फडणवीसाचे सरकार होते आणि आता ठाकरेंचे आहे. आभाताई बोलले, राज्य सरकारने १४०० कोटी दिले, अरे पण कोणत्या राज्य सरकारने दिले. ठाकरे साहेबांनी एक दमडी सुध्दा दिली काय? या राज्य सरकारने ९४ जीएसटी वरुन ४० वर आणला. ३० लक्ष लोकसंख्या असलेल्या या शहरात ४० कोटी जीएसटी मिळाला त्याने या शहराचे काय होणार आहे. एलबीटी बंद आहे. जकात नाका बंद आहे. इतक्या बिकट परिस्थितीत राज्य सरकार मदत करणार नसेल वेळेवर संपुर्ण जीएसटी देणार नाही तर अशा परिस्थितीत या शहराचा विकास कसा होणार आहे. या शहराचा विकास करण्यासाठी मा.महापौरजी, मा.नगरसेवक, मा. पदाधिकारी कामाला लागले. राज्य सरकार फक्त कोणतीही मदत करीत नाही. काय तर हे शहर फडणवीसांचे शहर आहे, हे शहर गडकरी साहेबांचे शहर आहे. येथे भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे. या समजूतीमुळे या शहराचा खेळखंडोबा होण्यासाठी हे लोक प्रयत्न करीत आहेत. आज आपण बघतो, एक घर बांधण्यासाठी घेतले तर प्रत्येक जण हा बॅकेकडून कर्ज घेतो. ही तर महानगरपालिका आहे. महानगरपालिकेमध्ये जेव्हा २०० कोटीचे लोन सॅग्शन करुन ठेवलेले आहे. पूर्वी आम्ही २५० कोटी कर्ज घेतले होते ते आम्ही फेडले त्याची पायी नी पायी आम्ही फेडली. जुने संपले आणि आम्ही नवीन ऋण घेतलेले आहे. महाराष्ट्र बॅकेकडून २०० कोटीचे कर्ज सॅग्शन करुन ठेवले आहे त्यातील ४१ कोटी घेतलेले आहे आणि १४९ करोड रुपये आम्हांला घ्यायचे आहे. उगीचच आम्ही पैसे नाही, पैसे नाही म्हणत बोंबलत बसलो तर शहराचा विकास होणार नाही. आज परिस्थिती बदलली आहे. घर बांधावयाचे असेल तर कर्ज घेवून त्याचे हप्ते आपण फेडतो. महानगरपालिकेला सुस्थितीत आणावयाची असेल तर आज आयचे स्त्रोत, आय आणण्याचा विचार करावा. आजच्या परिस्थितीत आपल्याकडे जी टीम आहे आमचे मा.महापौरजी, आमचे मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.सत्तापक्ष नेते, मा.विरोधी पक्ष नेते, आयुक्त आहेत या सगळयांच्या प्रयत्नांनी हे शहर विकासाची कास धरुन प्रगतीपथावर जात आहे. या शहराचा आता बजेट झालेला आहे. जर बजेट झाले नसते तर काम कसे केले असते. बजेट इतक्या दिवसापासून लांबला गेला त्यामुळे प्रत्येक नगरसेवकाला असे वाटत होते की या शहराने आम्हांला निवडून दिले परंतु आपल्याला कामे करता येतील किंवा नाही. परंतु मला असे वाटते कासवाच्या गतीने कां होईना आमची महानगरपालिका सुस्थितीत येईल. या प्लॅटफार्मवरुन महानगरपालिकेला सुस्थितीत आणण्याचे काम आपले सत्तापक्ष नेता करीत आहे. आज सन्माननीय पिंटूजी झलके यांनी अनेक विषयावर

प्रकाश टाकलेला आहे. आपल्याला स्थावर विभागामधून आय येत असते. आता एक गोष्ट मा.सदस्य श्री. होले यांनी चांगले सांगितले की आपल्या महानगरपालिकेच्या काय प्रापर्टी आहेत परंतु शाळा सुध्दा आपल्या नावावर नाहीत. स्थावर विभागाने आपल्या महानगरपालिकेच्या प्रापर्टीचे डाक्युमेंट क्लिअर करणे. त्यात क्लिरीटी असणे आवश्यक आहे. जेथे जेथे कन्फयुजन असेल ते दूर करुन घ्यावे आणि डाक्युमेंट क्लिअर करावे. माझी एक विनंती आहे, जाहिरातीचे बोर्ड लावतांना कुठेही लावले जातात. माझी विनंती आहे काही निकष पाळण्यात यावे. त्यांना महापालिकेची जागा सांगण्यात यावी हे चुकीचे धोरण आहे. मा.महापौरजी, जाहिरातीमुळे शहराचे विद्रुपीकरण न होता सौदर्यीकरणात भर पडेल अशी काळजी घेतली पाहिजे अशी या मार्फत आपल्याला विनंती करते. शहर वाहतुकीचा जर विषय आम्ही घेतला तर शहराच्या वाहतुकीसाठी १०२ करोड आम्हांला अनुदान दयावे लागतात. आमचे शहर स्मार्ट सिटी म्हणून घोषित झाले आहे आणि मेट्रो सोबत आमचा करार झालेला आहे. आपली ही जागा आणि आपली ही बस देवून टाकावी तर सोयीचे राहील. मा.महापौरजी, आपण जर प्रयत्न केला तर त्याला सुध्दा यश येईल. स्मार्ट ट्रान्सपोर्ट अंतर्गत आपली बस मेट्रोला चालवायला दिली तर १०२ कोटीचे अनुदान जे जाते त्यातून आपल्याला सुटका मिळेल. मेट्रोला आपली बस चालवायला दयावी. स्मार्ट ट्रान्सपोर्ट अंतर्गत जेथे जेथे स्मार्ट बस स्टॉप दिले आहेत आणि तेथे किऑन्स लावलेले आहे. मला असे लक्षात नाही येते की याचा आपल्याला उपयोग काय? मा.महापौरजी, स्मार्ट सिटी अंतर्गत किऑन्स जे बस स्टॉपवर लावलेले आहेत त्याचा आपल्याला नेमका किती उपयोग होत आहे. त्याची आपल्याला गरज आहे काय याची मा.महापौरजी आपण आपल्या मार्गदर्शनाखाली माहिती घ्याल. स्मार्ट बस स्टॉपवर अद्यावत लागलेले किऑन्स याच्यावर सुध्दा आपण निर्णय घ्यावा. आपण स्मार्ट सिटी अंतर्गत बॉयोमायनिंगसाठी भांडेवाडी येथे प्रयत्न करीत आहे. २२ एकर जागा त्यामध्ये कामात येणार आहे. २२ एकर जागा खाली झाल्यावर तेथील लोकांना त्याचा फायदा होणार आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आपल्या नागपूर महानगरपालिकेचा क्रमांक बॉयोमायनिंगचे काम अद्याप पर्यंत पुर्ण न करु शकल्यामुळे मागे राहत होतो. प्रत्येक गोष्टीत समोर परंतु बॉयोमायनिंगचे काम न केल्यामुळे मार्क्स कमी मिळत होते. मला अभिनंदन करावेसे वाटते की महानगरपालिकेच्या शासनाने हा विषय बॉयोमायनिंगचा स्मार्ट सिटीमध्ये देवून सोडविला. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नागपूर शहराचे नाव सुध्दा वर येईल यात मला कुठलीही शंका वाटत नाही. आभाताई पांडे बोलल्या, सातवा वेतन आयोग, आपण सातवा आयोगाचा विषय दरवर्षी बजेट मध्ये ठेवतो. सातव्या वेतन आयोगाला सत्तापक्षांचा याला कोणताही विरोध नाही. विरोध असल्याचे काही कारण नाही. कर्मचारी महानगरपालिकेचे काम करतात, दिवस रात्र एक करतात या कर्मचा-यांसाठीच सातवा वेतन आयोग आहे. सत्तापक्षाचा याला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही हे मी या माध्यमातून मला सांगावेसे वाटते. कर्मचा-यांना सुध्दा माहीत आहे. ही प्रशासनाची बाब आहे ती त्यांना केव्हा इम्पलीमेंट करावयाची आहे. शाळेचा सुध्दा विषय होता. शाळेच्या विषयामध्ये विद्यार्थ्यांना टॅबलेट देण्यावर भर दिला आहे. अत्यंत अभिनंदनीय बाब आहे. प्रत्येक शहर, प्रत्येक एरिया टेक्नोज एरिया आहे. अशा येणा-या काळात आपण टॅबलेट पुरविणार आहेत परंतु काही पर्टीक्युलर वेळेसाठी आपल्या शाळेमध्ये वायफॉय,इंटरनेट सुध्दा पुरविण्याची व्यवस्था केली पाहिजे जेणेकरुन त्यांना इंटरनेटद्वारे टॅबलेट वापरण्याकरिता शिकविता येईल. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपण शाळांना टॅबलेट पुरविले तर मुलांना त्याचा चांगला वापर करता येईल. आज सन्माननीय अध्यक्ष महोदयांचे भाषण झाले. बी १२ पेज वर एक थोडी प्रिन्टींग मिस्टेक झाली आहे की वार्ड निधी २० लाख पर प्रभाग त्यांनी म्हटलेले आहे. ती दुरुस्ती करुन घ्यावी. ती दुरुस्ती पर नगरसेवक असली पाहिजे. जी भाषणामध्ये प्रिन्टींग मिस्टेक आहे. कारण सगळया प्रभागामध्ये ४ नगरसेवक आहेत आणि २० लाख रुपये ४ नगरसेवकांना कधीच पुरणार नाही. पर प्रभाग न करता पर नगरसेवक अशा शब्द त्या

ठिकाणी करावी अशी विनंती मी करते. आज आपण बघितले तर भांडवली खर्चाची जी पुरवणी सादर केली आहे भाग-१ आहे. काही कामे ज्यांचे टेंडर झालेले आहेत अशी कामे आलेली नाही आहेत. माझी विनंती आहे ज्यांचे टेंडर निघाले असे सर्व नगरसेवकांचे कामे आहेत त्या सर्व खर्चांचा बांधील खर्चामध्ये इन्क्युलड करावा अशी सदनाच्या मार्फत आपल्याला विनंती राहील. महिला उद्योजिका भवन हा मोठा प्रोजेक्ट होता तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि अर्थमंत्री सुधीरभाऊ मुनगुंटीवार यांनी या प्रोजेक्टसाठी १० कोटी रुपये दिले होते. ते महानगरपालिकेत आणले ते विशेष हेडमध्ये ठेवलेले आहेत. त्या राशीचा वापर त्याच बाबीकरिता वापरता येतो. मला वाटते ही सुध्दा एक प्रिन्टींग मिस्टेक आहे त्याच्यासमोर बिरसा मुंडा स्मारका करिता टाकलेले आहे. माझी विनंती आहे, याकरिता वेगळा निधी देण्यात यावा. महिला उद्योजिका भवन बनविण्यासाठी हा निधी तसाच राहू दयावा. आज मला असे वाटते, सर्वसमावेशक असे बजेट मा.स्थायी समिती अध्यक्षांनी मा.महापौरजी यांच्या मार्गदर्शनामध्ये येथे प्रस्तुत केलेले आहे. या बजेटला मी माझे समर्थन जाहीर करते. सगळयांच्या संमत्तीने बजेट मान्य करण्यात यावे अशी विनंती करते. मला ऐकुन घेतले, सन्माननीय महापौरांनी मला बोलण्याची संधी दिली त्या बद्दल त्यांचे धन्यवाद.

श्री.अविनाश ठाकरे:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय स्थायी समिती अध्यक्ष, सन्माननीय सत्तापक्ष नेते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सभागृहातील सर्व नगरसेवक, प्रशासनातील सर्व प्रमुख अधिकारी, सर्व पत्रकार बंधू. एक अत्यंत महत्वाचे आणि ऐतिहासिक बजेट मा.स्थायी समिती अध्यक्ष श्री.पिंटूजी झलके यांनी मांडला आहे त्याचा मी मनापासून अभिनंदन करतो. मा.महापौरजी, ऐतिहासिक याकरिता की या पेंडामिक काळामध्ये हे बजेट आलेले आहे. या शहराने देखील जेव्हा पासून ही महानगरपालिका अस्तित्वात आली , पहिल्यांदा या पेंडामिक स्थितीचा अनुभव आलेला आहे. येणारी आय मागील जे आयुक्त होते त्यांनी जी थांबवलेली विकास कामे सत्तापरिवर्तनाने नवीन सरकारने काढलेले नवीन आदेश त्यामुळे थांबविलेली विकास कामे त्याच प्रमाणे आरोग्य यंत्रणेवर असलेला ताण आणि असलेली स्थिती सुस्थितीत आणण्यासाठी आणि अधिक दृढ करण्याकरिता काही निर्णय घ्यावे लागतात. शैक्षणिक क्षेत्राच्या वाढीकरिता काही टेक्नॉलॉजीकरिता काही निर्णय घ्यावे लागत आहेत हया सर्व बाबींचा अभ्यास करुन अत्यंत महत्वपुर्ण बजेट सन्माननीय पिंटूजी झलके यांनी मांडला आहे. मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो. फार मोठया प्रमाणात विकासाची कामे या नागपूर शहरात सुरु होते. आदरणीय नितीनजी गडकरी आणि आदरणीय देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून जो निधी आला त्या निधीच्या माध्यमातून फार मोठया प्रमाणात या नागपूर शहरात विकासाची कामे सुरु होती. आणि अचानकपणे जानेवारी महिन्यापासून आयुक्त आले आणि त्यांनी ब-याच कामाला ब्रेक लावला. त्यानंतर कोरोना आला आणि या नागपूर शहराची परिस्थिती ढासळली. या सगळया परिस्थितीत नागपूर महानगरपालिकेचे उत्पन्न कमी झाले. या सर्व येणा-या काळामध्ये वाटचाल करणे अतिआवश्यक आहे. हे ऐतिहासिक बजेट आहे. हे ऐतिहासिक यासाठी आहे की हे पहिले बजेट असे आहे की यामध्ये आयुक्तांनी दिलेल्या बजेट पेक्षा कमी तरतूद आहे आणि हे सन्माननीय अध्यक्ष यांनी या आपल्या बजेटमध्ये केलेली आहे आणि हे पहिल्यांदा असे घडत आहे. अनेक स्थायी समिती अध्यक्ष झाले, मी सुध्दा स्थायी समिती अध्यक्ष होतो. सर्व स्थायी समिती अध्यक्षांची इच्छा असते आपण जास्तीचे बजेट दिले पाहिजे. आपण वाढीव बजेट दिले पाहिजे. सन्माननीय पिंटू झलके यांनी स्वत:वर कंट्रोल ठेवत कमी किंमतीचा बजेट या शहराला दिला. जे आवश्यक आहे तेच त्यामध्ये टाकले गेले आहे. महत्वपुर्ण बाब म्हणजे हे बजेट वाचतांना जाणवले ती म्हणजे झोन अंतर्गत कामाचे जे डिस्ट्रीब्युशन केले आहे ते प्रत्येक झोन कुठले काम आवश्यक आहे त्या कामावर निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. याच्यामध्ये स्थानिक नागरिकांचे जे महत्वाचे कामे

आहेत ते बजेटमध्ये घेतलेली आहेत. अभ्यासपुर्ण निर्णय घेतलेला या बजेटमध्ये पाहायला मिळत आहे. या बजेटवर अनेक जण बोलले विशेषत: विरोधी पक्षाचे काही सदस्य यांनी काही मुद्दे ठेवले ते अत्यंत चुकीच्या पध्दतीने मांडले. याचा उल्लेख माजी महापौरजी नंदाताई जिचकार यांनी उल्लेख केला आहे. घाटावरील लाकडाच्या संदर्भात आभाताई बोलल्या, आभाताईंना कदाचित माहीत नसेल की आम्ही जेव्हा सत्तेत होतो त्या वेळेला, अजूनही आहोत आणि पुढेही राहणार आहोत.आमच्याच कार्यकाळामध्ये घाटावर फ्री ऑफ कॉस्ट लाकडे पुरविण्याचा निर्णय महानगरपालिकेला मंजुर केलेला होता. पुढच्या काळामध्ये यामध्ये ऑडीट ऑब्जेक्शन आल्यामुळे हा निर्णय रद्द करावा लागला. मा.आभाताई आपल्याला विनंती आहे, आपण ऑडीटर विभागाशी बोलावे, आणि त्यांना हा निर्णय बदलायला सांगावा म्हणजे परत एकदा महानगरपालिका निर्णय घेवू शकेल आणि आपण फ्री ऑफ कॉस्ट लाकडे देवू शकू. आभाताईने आणखी एक विषय कर्मचा-यांच्या पगाराच्या संदर्भात मांडला होता, मध्यंतरीच्या काळात कर्मचा-यांच्या पगाराच्या बाबतीत प्रस्ताव आम्ही मांडला होता. २०१९ मध्ये सत्ता आपली होती. २०१९ मध्ये सत्ता परिवर्तन झालेले आहे. २०१९ च्या सत्तापरिवर्तनाच्या थोडया काळाअगोदर आमची सत्ता होती आता कॉग्रेसची सत्ता आहे. आपण कोठल्याही पक्षाचे नाहीत त्यामुळे विरोधी पक्ष नेत्याच्या नेतृत्वामध्ये मा.मुख्यमंत्र्यांशी बोलून महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाचा पैसा निश्चितपणे आणून देवू शकतो. त्यांनी सांगितले ११०० करोड रुपये राज्य सरकारने दिले. त्यांनी कुठल्या सरकारचे अभिनंदन केले माहीत नाही. खरं तर मागच्या सरकारने ते पैसे दिले होते. या सरकारने जरी दिले असेल तर आभाताई पांडे मी निश्चितपणे सांगू इच्छितो की जो काही केंद्रसरकारकडून पैसा येतो आहे जीएसटीच्या माध्यमातून येतो, त्यातील एक हिस्सा महानगरपालिकेला महाराष्ट्र सरकार देते त्यामुळे राज्य सरकारचे ज्यावेळी अभिनंदन करता त्यावेळी केंद्र सरकारचे सुध्दा अभिनंदन केले पाहिजे. या पॅनडॅमिकच्या काळामध्ये त्यांच्याकडेच सुध्दा पैसा येत नाही तरी सुध्दा केंद्र सरकार ही तरतूद करुन पैसे देत आहे. या बजेटबद्दल सर्व चांगले बोललेले आहेत.अतिशय महत्वाचा निर्णय म्हणजे महानगरपालिकेचे पोलीस स्टेशनबाबत, पोलीस स्टेशनचा विषय प्रस्तावित करुन महासभेपुढे मंजुरीकरिता पाठविलेला आहे. हा अतिशय योग्य निर्णय आहे. अशा प्रकारचा निर्णय झाल्यानंतर आम्ही ज्या भागाचे रिप्रेझेन्टेटीव्ह करतो त्या भागात सातत्याने बांधकाम सुरु असतात. एनआयटीचे लेआऊट आहेत. या भागात अनधिकृत बांधकामाच्या तक्रारी जास्त असतात. यामुळे फार मोठा फायदा होणार आहे. हा घेतलेला निर्णय अतिशय चांगला निर्णय आहे याबद्दल या ठिकाणी मा.स्थायी समिती अध्यक्षांचे अभिनंदन करतो. मी माझे भाषण संपविण्याच्या अगोदर बरेच लोक बोलले ते चांगले बजेट आहे म्हणून बोलले. जवळपास सर्व मुद्दे त्यांनी कव्हर केलेले आहेत. मला राजकीय भाषण देण्याची आवश्यकता वाटत नाही. अत्यंत कठीण काळामध्ये हे बजेट आलेले आहे आणि आपण सर्वांना घेवून चालावयाचे आहे. प्रशासनाच्या बाबतीत जे मा.स्थायी समिती अध्यक्षांनी आपल्या या अर्थसंकल्पात मांडलेले आहे ते अत्यंत योग्य पध्दतीने मांडलेले आहे. प्रशासनाची जबाबदारी प्रशासनाने पार पाडली पाहिजे. मध्यंतरीच्या काळात प्रशासन जनप्रतिनिधीप्रमाणे वागायला लागले होते. त्यामुळे त्या परिस्थिती खराब व्हायला लागल्या होत्या. महानगरपालिकेमधील जनप्रतिनिधीची एक स्वत:ची भुमिका आहे. प्रशासनाची वेगळी भुमिका आहे. प्रशासनाने आपल्या भुमिकेत राहिले पाहिजे. जनप्रतिनिधींच्या जनभावना प्रशासनासमोर मांडत असतांना कायद्याच्या अनुरुप आहे किंवा नाही. त्यामुळे कायद्यामध्ये परावर्तित करावयाचे असेल कुठल्या गोष्टी कराव्या लागतील या बाबी प्रशासनाने आपल्या पध्दतीने मांडल्या पाहिजे. आर्थिक नियोजनाच्या बाबतीत जनतेच्या ज्या समस्या आहेत त्याच जनप्रतिनिधी आर्थिक समस्या, विकासाच्या समस्या मांडत असतात. प्रशासनाने ही भुमिका मांडली पाहिजे. प्रशासनाने याचे नियोजन केले असले पाहिजे. आर्थिक समस्या सोडविण्यासाठी निधी कशाप्रकारे खर्च

करावयाचा हे प्रशासनाचे काम आहे आणि प्रशासनाने त्याचे आर्थिक नियोजन करावे. माझ्या प्रभागामध्ये ४ महिन्यापूर्वी दुर्दैवाने सॅनीटरी इन्स्पेक्टरचा हार्टअॅटाकने मृत्यू झाला. गेल्या चार महिन्यापासून या प्रभागाला सॅनीटरी इन्स्पेक्टर नाही. एवढया कोव्हीडच्या काळात प्रभागात सॅनीटरी इन्स्पेक्टर नाही. ती फाईल फायलेरिया विभागाकडून आरोग्य अधिकारी दासलवार यांच्याकडे आणि यांचेकडून ती फाईल फायलेरिया विभागाकडे जात असेल इतकी ढिलाई प्रशासन घेत असेल तर नागरिकांच्या समस्या कशा सुटणार आहेत. अनेक ठिकाणी पाण्याचे डबके साचलेले आहे. अडीच लाख पॉप्युलेशनचा प्रभाग एका सॅनीटरी इन्स्पेक्टरवर असतांना प्रभागात सॅनीटरी इनस्पेक्टर नाही ही अत्यंत दुर्देवी बाब आहे. प्रशासन दुबळया नेतृत्वाचे आहे आणि असे अधिकारी जे कोताई ढिलाई करीत असतील तर एक जेष्ठ नगरसेवक चारवेळा पत्रव्यवहार करीत असेल, त्या अधिका-याशी चर्चा करीत असेल. तरीही प्रभागात सॅनीटरी इन्स्पेक्टर मिळत नसेल तर या सारखी शोकांतिका नाही. मा.महापौरजी, अशा अधिका-यावर निश्चितपणाने कार्यवाही करावी. मा.स्थायी समिती अध्यक्षांना माझी विनंती आहे. घाटाच्या संदर्भात जो काही बांधील खर्च त्या ठिकाणी ठेवलेला आहे, डिस्ट्रीब्युट केलेला आहे. त्यामध्ये धंतोली झोनला स्मशानघाटासाठी निधी दिलेला आहे. याठिकाणी मला स्थायी समिती अध्यक्षांना एक विनंती करावयाची आहे की गेल्या वर्षी अंदाजपत्रकात ५० लक्षाची तरतूद  चिंचभवनाच्या घाटाकरिता करण्यात आली होती. चिंचभवन घाट हा नवीन प्रस्तावीत घाट आहे. त्याला खर्च जास्त येतो. ऑलरेडी २ कोटी रुपये खर्च झालेला आहे. शेवटचा ५० लक्षाचा जो इन्स्टॉलमेंट आहे तो आम्ही मागच्या स्थायी समितीकडून मंजूर करुन घेतला होता. मागच्या मा.अध्यक्षांनी तो दिला होता परंतु  कोरोनाच्या काळामध्ये तत्कालीन आयुक्तांनी रोक लावली होती त्यामुळे तो इम्प्लीमेंट होवू शकला नाही.  तो ५० लक्षाचा निधी कॅरीफॉरवर्ड करुन दयावा जेणेकरुन त्या घाटाचे काम पुर्ण करण्यास मदत होईल. या कोरोनाच्या काळामध्ये घाटावर कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसल्यामुळे खुप अडचणी आल्या. आमच्या प्रभागापासून लगतच्या घाटावर ५ ते ७ किलोमीटर जावे लागते. काही सहकार नगरच्या घाटावर तर काही मानेवाडाच्या घाटावर जातात. हा घाट निर्माण झाला तर निश्चितपणाने ५०० ते १००० मीटरच्या अंतरावर घाट उपलब्ध होईल. या घाटासाठी ५० लक्षाचा निधी कॅरीफारवर्ड करुन दयावा अशी मी मा.स्थायी समिती अध्यक्षांना विनंती करतो. मा.स्थायी समिती अध्यक्षांनी अतिशय उत्कृष्ठ असे बजेट दिलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या बजेटला माझे समर्थन देतो आणि येथे थांबतो. जयहिंद, जयभारत.

श्री. धर्मपाल मेश्राम :- मा. महापौरजी, मा. सभापती अर्थसंकल्पाला समर्थन देतांना या नागपूर महानगरीचे महापौर मा. संदीपजी जोशी यांच्या नेतृत्वामध्ये महानगरपालिका एका वेगळया लक्षाच्या दिशेन वाटचाल करीत आहे हे मी आपल्य निर्देशनास आणुन देऊ इच्छितो, खरे तर जगात सगळीकडे कोविड-१९ ची वैश्विक महामारी अशाही अवस्थेमध्ये जेथे सर्व अर्थाने परिवाराची ताटातूट झालेली आहे. एखादा वडील माणुस जर दुर्दैवाने मृत्यु झाला तर त्याची बॉडी देखील त्या मुलाला किंवा त्यांच्या परिवाराच्या सदस्यांना पाहायला मिळत नाही. अशा स्थितीमध्ये नागपूर महानगरपालिकेमध्ये त्यांच्या १३ वर्षात १५ वेळा बदल्या झाल्या अशा आयुक्तांचे आगमन होणे आणि आयुक्त म्हणून कमी परंतु प्रशासनिक अधिकारी म्हणून जास्त ज्यांचे प्रभाव ज्यांनी निर्माण करण्याचा प्रयत्न केला अशा आयुक्तांच्या कार्यकाळामध्ये मी स्थायी समिती सभापती पिंटु झलके यांचे अभिनंदन खऱ्या अर्थाने करेल, त्यांचे कारण असे आहे की, नागपूरच्या चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी ज्या आयुक्तांनी १० लक्ष रुपयांचे बजेटमध्ये प्रावधान केलं, त्याला वाढवुन त्यांनी ९० लक्ष ७५ हजार रुपये केले. बॉटनीकल गार्डनसाठी त्यांनी ५ लक्षापासुन अडीच कोटी रुपये, खेळाच्या मैदानासाठी १ करोड पासून सव्वासात करोड रुपये, गांधीसागर तलावाकरिता शुन्य रुपयांपासुन १५ करोड रुपये, १८५७ च्या

स्वतंत्रता संग्राम संघर्ष स्मारकासाठी ५० व्या वर्षगांठ निमित्त प्रावधान दिले आहे. ५ लक्षापासुन तर ५० लक्षापर्यंत, राजकीय स्वच्छ व अंतर्गत वायु प्रदुषण नियंत्रण प्रकल्पापासुन सुरक्षा रक्षकांच्या कामासाठी प्रावधान दिले. शुन्यापासुन २४० लक्षापर्यंत या स्थायी समितीने आपल्या अर्थसंकल्पामध्ये प्रावधान केलेले आहे आणि इतकेच नव्हेतर या शहरातील तमाम मुस्लिम बांधवांच्या श्रध्दा ज्या ताजबागला आहे त्या ताजबागच्या सौंदर्यीकरणासाठी त्या आयुक्तांनी प्रावधान केले त्याच्या १० पट प्रावधान मा. अध्यक्ष श्री. पिंटु झलके यांनी केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासाठी १५ लक्षापासुन दुप्पट प्रावधान पिंटु झलके यांनी केलेले आहे. त्यामुळे त्यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. अन्नाभाऊ साठे स्मारकासाठी ज्या आयुक्तांनी प्रावधान केले त्याच्या दहापट प्रावधान पिंटु झलके यांनी केले. नागपूर शहरातील विविध चौकामध्ये जे चर्मकार बांधव माझे रस्त्यांवर टपऱ्या लावून बसतात. लोकांच्या जोडयाला पॉलिश करण्यासाठी त्यांच्याकरिता फक्त १ लक्ष प्रावधान या नागपूर शहराच्या आयुक्तांनी केले होते. त्याच्या दहापट प्रावधान पिंटु झलके यांनी आपल्या अर्थसंकल्पामध्ये केलेले आहे. आम्हांला पाहायला मिळाले की मागच्या ६ महिन्याच्या कार्यकाळामध्ये ज्या आयुक्तांनी नागपूर शहराच्या महानगरपालिकेचे सभागृहातच नव्हे तर या देशातील लोकशाहीचा कणा असलेल्या लोकप्रतिनिधींना उभे आव्हान देण्याचा प्रयत्न केला आणि म्हणून मला अभिनंदन करावे लागेल की, या अर्थसंकल्पाचे समर्थन करतांना लोकशाहीला महापौरांनी उचलुन धरले आणि नागपूर शहरातील १५६ नगरसेवकांना प्रतिनिधीत्व व त्यांचा न्याय हक्क मिळवुन दिला. नागपूर शहराच्या ३५ लक्ष लोकसंख्येचा आवाज या सभागृहात गाजला, गुंजला अशा महापौरांचे अभिनंदन करतांना या बजेटचे मी समर्थन करतो. मा. महापौरजी अर्थातच बुधवार बाजार असेल, महाल बाजार असेल, सक्करदरा बाजार असेल या सगळया बाजारासाठी शुन्य रुपयांचे प्रावधान बजेटमध्ये होतं. मी पिंटु झलके यांचे अभिनंदन यासाठी करतो त्यांनी २५ करोड रुपयांचे प्रावधान केलेले आहे. मच्छी बाजार असेल, भाजी बाजार असेल किंवा ऑरेंज सिटी स्ट्रिटचा मेट्रो मॉल मधील प्रकल्प असेल ३० लक्षापासुन २५ करोड रुपयांपर्यंत नेण्याचे काम केलेले आहे. नागपूर शहरातील रुग्णांसाठी ज्या वैद्यकीय साधन सामुग्री फक्त १० लक्ष रुपयांचे प्रावधान होते एकीकडे मोठमोठया बाता मारल्या ५००० लोकांसाठी आम्ही कोव्हीड हॉस्पीटल केले. परवानग्या नसतांना ५-५ हॉस्पीटल बांधले, शासनाच्या अनुदानाचा संपूर्ण पैसा खड्डयात ओतला त्या माणसाने रुग्णालयांच्या वैद्यकीय साधन सामुग्रीसाठी फक्त १० लक्ष रुपयांचे प्रावधान केले होतं काम कुठे केलं या आयुक्तांनी, फेसबुकवर, व्हॉटस् ॲपवर सोशल मिडीयावर, त्या साधन सामुग्रीसाठी पिंटु झलके यांनी प्रावधान केलेले आहे. साडेतीन करोड रुपयांचे, या अशा अप्रवासी अधिकाऱ्यांच्या भरवश्यावर नागपूर शहरातील ३५ लक्ष लोकसंख्येचे शहर चालणार आहे काय? हा जर शहरातील व्यापारांनी विचारलेला प्रश्न असेल तर मा. महापौरजी योग्य आहे आणि म्हणून मी पिंटु झलके यांचे अभिनंदन करेल, त्यांनी ही रक्कम साडेतीन करोड रुपयांपर्यंत वाढविली. शासन अनुदानाचे १०० करोड रुपये मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यकाळामध्ये मंजूर झाले ते १०० करोड रुपये अजुन आम्हांला मिळाले नाही. दुर्दैवाने आमचे सरकार गेलं महाविकास आघाडीचे सरकार आलं. नवीन नवीन दोस्त्या झाल्या, नवीन नवीन कार्यालयात लोक बसायला लागले, आणि केलं काय तर पूर्ण लांबीचे सिमेंट रोडचे बांधकाम करण्यात येणारे रस्ते १८.३० किलोमिटर पैकी सगळेच्या सगळे थांबविले, अंशत: रद्द करण्यात आलेले रस्ते १०.३० किलोमिटर पैकी ६ किलोमिटरचे रस्ते थांबविले, काम सुरु न झालेले १०.३० किलोमिटर पैकी पुर्णच्या पूर्ण थांबविले, कायदा हाता धरुन एम.एम.सी. ॲक्टच्या कलम ८६ चे कारण सांगून कायद्यात नसलेल्या तरतुदीचा उहापोह करुन ज्या आयुक्तांनी या नागपूर शहराच्या ३५ लक्ष लोकसंख्या असलेल्या शहराची ऐसीतैसी केली. त्या शहराला वठणीवर आणि वळणावर आणण्याचे काम मा. महापौरजी यांच्या नेतृत्वात मा. पिंटु झलके यांनी केले आहे. म्हणूनच मला तुमचे अभिनंदन करावे लागेल. मा.

महापौर साहेब या देशात लोकशाहीचे तीन प्रमुख स्तंभ आहे. लोक प्रतिनिधीचे सभागृह, एक कार्यपालिका, दुसरी न्यायपालिका, पण कार्यपालिका करते काय? सरकार कोणाचेही येऊ द्या, सरकारमध्ये कितीही चांगले माणसे बसु द्या परंतु कार्यपालिका मात्र आपल्या बापाचे राज्य आले की काय या तोऱ्यात वागते, तुम्ही आय.ए.एस. झालात म्हणून काय झालं? तुम्ही एखादी परीक्षा पास केली म्हणून काय झालं? लोकांच्या भावना तुमच्यापर्यंत पोहचल्या ? तुम्हांला काय सारे कळले ? हे सरकार लोकशाहीच सरकार हे लोकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आलेले आहे आणि लोकांच्या हिताचे रक्षण हे फक्त नी फक्त त्यांनी पाठविलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातुनच होतं हे प्रशासनाने लक्षात ठेवले पाहिजे मा. महापौर साहेब.अनेक गोष्टी मागच्या कार्यकाळामध्ये मग तो कार्यकाळ कोव्हीड-१९ च्या रुपात असेल किंवा काल पर्वाचा असेल किंवा आजपर्यंतचा असेल अनेक गोष्टी आपल्या माध्यमातुन व लोकशाहीच्या चौथा स्तंभ मानलेल्या पत्रकाराच्या माध्यमातुन लोकांच्या पुढे मांडण्याचा प्रयत्न केला अनेक गोष्टी मांडल्या आहे. आम्हांला आश्चर्य वाटते की, प्रॉपर्टी टॅक्स नागपूर शहरात किती वाढला? परंतु प्रापर्टी टॅक्सच्या जाहिरातीच्या संकलनासाठी किंवा वसुलीसाठी १ कोटी रुपयांचे खर्चाचे प्रावधान बजेटमध्ये का केले जाते. अत्यंत आश्चर्यजनक गोष्टी आहे या, मी आपल्याला सांगू इच्छितो की, महानगरपालिकेच्या विविध आस्थापना असतील त्यामध्ये बागा असतील, मैदनाने असतील, सन २०१६-२०१७ चा सुरक्षा रक्षकांच्या करीता वास्तविक खर्च होता ११ करोड ६३ लक्ष, ४१ हजार रुपये आश्चर्य आहे. सन २०२०-२१ ला सन्माननीय आयुक्तांनी प्रावधान केलं १२ करोड रुपये केले आश्चर्य आहे. मी पिंटुं झलकेजी तुमचे अभिनंदन करतो तुम्ही त्याला कमीत कमी खेचून ९ कोटी रुपयांपर्यंत कशासाठी तुम्हांला एवढी सुरक्षा पाहिजे, प्रशासनाला काही भिती आहे का लोकप्रतिनिधीची? त्यामुळे ३००-३०० लक्ष रुपये किंवा ३-३ करोड रुपये जास्तीचे प्रावधान करायची गरज काय? मला आश्चर्य या गोष्टीचे वाटते की, एल.बी.टी. संपली, जकात संपली, किती वर्ष झाले किंबहुना परंतु त्यांच्यासाठी आस्थापना खर्च १५ करोड ५० लक्ष रुपयांचा खर्च आजच्या बजेटमध्ये करण्यात आला आहे. सरकार कोणाचेही असा, माणसे किती चांगले असो, परंतू आम्ही करतो काय, याच पध्दतीने पदाधिकाऱ्यांना दुर्लक्षित करुन ज्या पध्दतीचे काम नागपूर महानगरपालिकेमध्ये सुरु आहे. लोकांचा सर्वसामान्य समज असा आहे की, या पक्षाचे सरकार आहे म्हणून हे सर्व लोकप्रतिनिधी जबाबदार आहे असे मुळातच नाही. या देशाचे संविधान असं म्हणते आम्ही लोकप्रतिनिधी आहोत, आम्ही कायदे करु, तुम्ही फक्त कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासरनाचे आहे, कार्यपालिकेचे आहे. कार्यपालिकेला वाटते आम्ही जे करु तो कायदा आहे. सन्माननीय महापौर साहेब ज्या पध्दतीचे प्रयत्न आज नागपूर शहराच्या नागपूर महानगरपालिकेमध्ये मागच्या काळात झाले ते सारेच्या सारे प्रयत्न, ती दंडेली आम्हांला कुठेतरी कमी करण्याची गरज आहे अशी माझी विनंती आहे. संविधान चौकामध्ये नागपूर शहरामध्ये देशातील सर्वात पहिला संविधान चौक आपल्या कार्यकाळात निर्माण केला. सन्माननीय संदीप जाधव उपमहापौर असतांना त्यांनी पुढाकार घेतला सन्माननीय नितीनजी गडकरी व तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झालं दुर्दैवाने आजही महानगरपालिकेच्या बजेटच्या पुस्तिकामध्ये त्यांचे नाव रिझर्व्ह बँक चौक अस झालं. मी आपल्याला विनंती करतो की, या जुजबी दुरुस्ती करावी आणि त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेच्या अंतर्गत सेवेत असतांना मृत्यु झालेल्या सफाई कामगारांच्या वारासदारांना बांधून देण्यासाठी ४ करोड रुपयांचे प्रावधान मागच्या अनंक वर्षापासुन सुरु आहे. परंतु मा. महापौरजी दुर्दैव आहे या शहराचे मी ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो त्यांचेही की प्रशासनाने आजपर्यंत या पदांतर्गत १ रुपयाही खर्च केलेला नाही याचा तीव्र शब्दामध्ये निषेध करतो. मी आपल्य माध्यमातुन विनंती करतो या बजेटमध्ये मनपा विभागाच्या कामाकाजाच्या संगणकीकरणाला आयुक्तांनी प्रावधान केले २५ करोड ४२ लक्ष रुपये आणि मी आरोप केला होता की

सीडॅक कंपनीच्या माध्यमातुन या कोणाच्या नातेवाईकांच्या आहे ? निश्चितपणाने हा घोळ देखील उजागर करण्याचा प्रयत्न मी मागच्या काळात केला होता. एवढया पैशांची गरज का पडली निश्चितपणाने या घोळाची चौकशी होणे किंवा हिशोब होणे आवश्यक आहे. सन्माननीय पिंटु झलके यांचे अभिनंदन मी करेल त्यांनी पदांतर्गत २५ करोड ४२ लक्ष रुपयांचे प्रावधान ८ करोड रुपयांवर आणले, सन्माननीय महापौर साहेब आपल्या मार्गदर्शनातुन आपल्या माध्यमातुन, आपल्या प्रयत्नातुन भारतीय जनता पक्षाच्या या सत्ताकाळामध्ये प्रशासनावर वचक आणण्याची अत्यंत गरज निर्माण झालेली आहे. या बजेटचे मी सर्वार्थाने पूर्ण ताकदीने सन्मान करीत मी समर्थनार्थ उभा आहे आणि आपण मला बोलण्याची संधी दिली या ठिकाणी थांबतो व आपले त्याबद्दल खुप खुप धन्यवाद मानतो.

श्रीमती वैशाली नारनवरे:- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.आयुक्त मा.विरोधी पक्ष नेते, मा. सत्तापक्ष नेते, मा.पदाधिकारी, मा.अधिकारी, मा. नगरसेवक, मा. नगरसेविका, कर्मचारी आणि आमचे पत्रकार बंधू, मा.महापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्षांनी कोव्हीड-१९ महामारीच्या संक्रमणामध्ये अत्यंत कठीण परिस्थितीत अंदाजपत्रक तयार केले. कोव्हीडच्या महामारीत कोणत्याही मा.सदस्यांना नाराज न करता, कोणत्याही नगरसेवकांचे मन दुखावणार नाही या हेतून हा अंदाजपत्रक तयार केला असावा. मा.महापौरजी, अशा संकट प्रसंगी मा.स्थायी समिती अध्यक्षांनी हिंमत दाखवून हा अंदाजपत्रक सादर केला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. मा.महापौरजी, मालमत्ता कर आणि पाणीकर या विषयाच्या संदर्भात शास्ती माफ करण्याचा विषय जो ठेवण्यात आला त्यावर स्थायी समिती अध्यक्षांच्या विषयाशी मी सहमत आहे. कोव्हीड या जागतीक महामारीच्या संक्रमणातून कुणीही सुटलेला नाही. भारत देशही सुटलेला नाही आणि भारत देशा अंतर्गत या नागपूर शहरामध्येही या महामारीने थैमान घातलेला होता आणि याचा प्रभाव जनसामान्यावर आहे. या महामारीच्या संक्रमणाच्या काळात खुप लोग आर्थिकदृष्टया हतबल झालेले आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे अशा परिस्थितीत स्थायी अध्यक्षामार्फत शास्ती माफ करण्याचा निर्णय घेणे आणि तो विषय सभागृहासमोर ठेवणे हा विषय मला योग्य वाटतो आणि मी स्थायी समिती अध्यक्षांचे समर्थन करते आणि स्थायी समिती अध्यक्षांना धन्यवाद देते. परंतु मा.महापौरजी, आम्ही प्रत्येक वर्षी परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाबद्दल बोलत असतो. प्रत्येक वर्षी महानगरपालिकेत आपणांस आणि मा.आयुक्तांस निवेदन देत असतो परंतु त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला जात नाही. मा.महापौरजी, मराठीत एक म्हण आहे, 'काही करा पळसाला पान तीनच' ही म्हण बरोबर आहे मा.महापौरजी, गेल्या ३० वर्षापासून हा विषय प्रलंबित असून २०२० काळापर्यंत या महानगरपालिकेत कधी कॉग्रेसची तर कधी बीजेपीचे शासन येवून सुध्दा हा विषय मार्गी लावण्यासाठी एकही शासनाने प्रयत्न केला नाही. मा.महापौरजी, महानगरपालिका आणि राज्य सरकार यांचा समन्वय शक्तीच्या अभावामुळे व इच्छाशक्तीच्या अभावामुळे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक अद्याप भुमीपुजनाच्या प्रतिक्षेत आहे. भाजपाच्या शासनाच्या काळामध्ये असे वाटले होते की या स्मारकाच्या कामाला चालना मिळेल. कारण नागपूर महानगरपालिकेत आणि राज्यात एकच पक्षाचे सरकार होती. तेही आता धुळीस मिळाले. मा.महापौरजी, म्हणून मी या सभागृहाला आव्हानात्मक विनंती करते की या सभागृहात कोणत्या पक्षाचे सत्ता असो त्यांनी जातीवाद, धर्मवाद, राजकारण बाजूला ठेवून या भारताचे परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी पुढाकार घेवून या स्मारकाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करावा. खंत या साठी वाटते मा.महापौरजी की सध्याच्या परिस्थितीत बहुजन समाज पार्टी शासनाला स्मारकासाठी आठवण करुन देते. प्रत्येक वर्षी बजेटमध्ये २ कोटी रुपये या स्मारकासाठी आर्थिक तरतूद करुन ठेवण्यात येते. इतक्या वर्षापासून ही रक्कम दरवर्षी

ठेवीत असतात. मी सुध्दा ज्या वर्षी पासून निवडून आलेली आहे. तेव्हा पासून पाहत आहे २०१७-१८, २०१८-१९ पर्यंत महागाई वाढली. इतकी महागाईत वाढ झाली असतांना या स्मारकासाठी निधी फक्त २ कोटीच ठेवण्यात येतो त्या रक्कमेच्या वाढीला काहीही चालना मिळाली नाही. मा.महापौरजी, रमाई घरकुल योजना या योजनेला उंटाच्या तोंडात जिरेमिरे असे नाव देण्यात यावे. कारण या योजनेत जो निधी देण्यात आला आहे तो उंटाच्या तोंडात जिरेमिरे देण्यासारखा दिलेला आहे. नागपूर शहरात जास्तीत जास्त ६५ टक्के जनता स्लम झोपडपट्टीमध्ये निवास करतात. १५ ते २० टक्के लोक असे आहेत की जे आपले जीवनमान हातावर आणणे आणि पानावर खाणे. त्यांना स्वत:च्या पैशाने घर बांधणे हे त्यांचे दिव्य स्वप्नच आहे. अशा परिस्थितीत एकावेळी नाही तर त्यांना टप्प्याटप्याने घर मिळाला पाहिजे अशी महानगरपालिकेची भुमिका असली पाहिजे. मा. महापौरजी, या भुमिके अंतर्गत जर विचार केल्यास तर २ कोटी रक्कम ही कमी रक्कम आहे. नवीन सुधारित बजेटमध्ये याच्या दहा पट रक्कम वाढवून जास्तीत जास्त लोकांना याचा फायदा मिळाला पाहिजे असे मला वाटते अन्यथा याचा मला विरोध करावा लागेल. मा.महापौरजी, जलप्रदाय विभाग अंतर्गत माझ्या प्रभागात आताही टॅन्करद्वारे पाणी पुरवठा केला जातो. नागपूर शहरात ओसीडब्लू कंपनी नागपूर शहर टॅन्करमुक्त करीत नाही. दुषित पाणी पुरवठा केला जातो. हा पाणी पुरवठा बहुतेक प्रभागात होतो. जवळपास दोन-तीन वर्ष झाले आतापर्यंत वस्तीमध्ये कनेक्शन मिळाले नाही. ओसीडब्लू कोणते काम करीत असते. ज्या ठिकाणी नळाला पाणी येत नाही अशा ठिकाणी मोठया प्रमाणात बील घेतले जाते. मा.महापौरजी, ही समस्या माझ्या प्रभागात नाही तर संपुर्ण नागपूर शहराची आहे. त्यांना प्रत्येक अर्थसंकल्पात त्यांना मोठी रक्कत ठेवत असतो. आताच्या पण अर्थसंकल्पात १७५ कोटीची तरतूद केली आहे याचा मी विरोध दर्शविते. मा.महापौरजी, शिक्षण, शिक्षणामुळे खरा नागरिक घडत असतो. विद्यार्थ्यांना शिक्षणाची गरज आहे. प्रत्येक प्रभागाअंतर्गत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु कराव्यात. कोव्हीड-१९ महामारीत शहर अंतर्गत आज आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे पालक आपल्या पाल्यांना खाजगी शाळेत शिकवू शकणार नाही. तेव्हा माझे म्हणणे असे आहे आपली सत्ता आहे. आपण सत्तेत असतांना बंद असलेल्या शाळा सुध्दा सुरु कराव्यात त्यामुळे भविष्यातील पीढीला याचा फायदा होईल त्याकरिता आपणांस विनंती करते. मा.महापौरजी, वैशाली नगर दहनघाट, या ठिकाणी दहनघाटाची व्यवस्था अत्यंत दुर्भिक्ष आहे. या ठिकाणी लाकडे, जळण ही पावसाच्या पाण्यामध्ये ओले होतात. पिण्याच्या पाण्याची सुध्दा व्यवस्था नाही. घाटाची दुरावस्था झालेली आहे. मा.महापौरजी, माझ्या प्रभागात असलेल्या या घाटासाठी तरतूद करण्यात यावी. तसेच चांभार नालाकरिता मागच्यावर्षी निधी ठेवलेला होता. चांभार नाला हा वस्तीतून जात असता त्याची सुरक्षाभिंतीच्या तरतूदीसाठी अर्थसंकल्पात उल्लेख केलेला नाही. त्या सुरक्षाभिंतीसाठी अर्थसंकल्पात प्रोव्हीजन असली पाहिजे अन्यथा या अर्थसंकल्पाचा मी विरोध करते. मा.महापौरजी, आताच काही नगरसेवकांनी सांगितले की कमिश्नर साहेबांनी सांगितले की आम्ही डांबरीकरणाकरिता पॅचेस सुध्दा करु शकत नाही असे बोलले आहेत. मा.महापौरजी, ते आमच्या फाईली मंजूर करतील काय ? त्यांनी नगरसेवकांच्या फाईली लवकरात लवकर मंजूर करुन देतील अशी मी आपल्या तर्फे त्यांना विनंती करते. या अर्थसंकल्पात जुन्या कामावर भर दिलेला आहे. मा.महापौरजी, आताच आभाताई पांडे बोलल्या, घाटावर दहनासाठी लाकडे निशुल्क करण्यात यावी. परंतु नंदाताईनी त्याला व्यक्तिगत घेतल्यासारखे वाटले. त्या म्हणाल्या की श्रीमंत लोकांना याची आवश्यकता वाटत नाही. मी असे म्हणेल की श्रीमंत लोकांना याची गरज नाही तर त्या श्रीमंत लोकांनी महानगरपालिकेमार्फत किंवा संस्थेमार्फत काही मदत घाटावर करावी. नंदाताई म्हणाल्या की घर बांधण्यासाठी बँकेकडून लोन मिळू शकते. मी त्यांना सांगू इच्छिते या सभागृहामार्फत की स्लम भागातील लोकांकडे लोन घेण्याची आणि लोन घेतल्यानंतर लोन फेडण्याची सुध्दा ऐपत नसते. जेव्हा त्या महापौर होत्या तेव्हा मी त्यांना आपल्या प्रभागात दौरा करण्याची

विनंती केली होती परंतु त्यांनी कधीही दौरा केलेला नाही. आज त्यांनी दौरा केला असता तर आज त्या अशा बोलल्या नसत्या. मा.महापौरजी, उत्तर नागपूरमध्ये स्लम भागामध्ये लोक कशाप्रकारे राहतात. त्यांना महानगरपालिकेतर्फे जर काही घर बांधण्यासाठी निधी देतो तो कमी आहे असे त्यांना वाटले असते. या ठिकाणी अनेक नगरसेवकांनी आणि मी सुध्दा ज्या काही उत्तर नागपूरकरिता ज्या काही सुचना दिलेल्या आहेत त्या सुचनांना सुध्दा नवीन अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी एवढीच विनंती करते आणि आपले भाषण संपविते, धन्यवाद.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक आमचे मित्र अध्यक्ष स्थायी समिती यांनी अंदाजपत्रक २० तारखेला सादर केले. मा.महापौरजी विलंबाने हे बजेट सादर केल्याबद्यल त्यांनी त्यांनी सुरुवातीलाच दिलीगीरी व्यक्त केली माफी मागितली. मात्र हा विलंब कशामुळे झाला त्याचे कारण देत असतांना त्यांनी सांगितले की तत्कालीन आयुक्तांनी १५ मार्चच्या आधी हे बजेट सादर करणे गरजेचे होते कायद्याने ते बंधनकारक होते त्यांनी ते बजेट वेळेत सादर केले नाही. म्हणुन मला हा बजेट सादर करण्यासाठी विलंब झाला आहे. मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्त तुकाराम मुंढे साहेबांनी १६ मार्चला स्थायी समितीकडे हे बजेट सादर केले. म्हणजे हा जो विलंब होता तो एक महिन्याचा होता. मा.महापौरजी जर एक महिन्याआधी हे बजेट आयुक्तांनी जर दिले असते तर त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये उल्लेख केला की ३१ मार्चच्या आधी मला बजेट करणे शक्य झाले असते. एक महिना जरी उशीर झाला असेल त्यावेळी मुंढे साहेबांकडे आम्ही हा विषय घेऊन गेलो होतो की बजेटला उशीर होत आहे त्यावेळेस अकाऊंट विभागाकडुन जे आकडे येणे अपेक्षित होते ज्या पध्दतीच्या आकडयांचे संकलन त्यांना पाहिजे होते त्या पध्दतीचे संकलन आपल्या प्रशासनाच्या माध्यमातून त्यांना उपलब्ध झाले नाही असे कारण त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी दिले. मा.महापौरजी, १६ मार्चला ज्यावेळी आयुक्तांनी स्थायी समितीकडे बजेट सादर केले त्याचवेळी या भारतामध्ये पर्यायाने नागपूर शहरामध्ये कोव्हीडची स्थिती निर्माण झाली होती आणि कोव्हीडच्या स्थितीमध्ये संपुर्ण प्रशासन हे कोव्हीडच्या नियंत्रणामध्ये लागले त्यामुळे कदाचित हा विलंब झाला असावा असे मी मानतो परंतु मा.महापौरजी विलंब किती काळाचा तर मा.महापौरजी हा विलंब ६ महिन्यापेक्षा अधिक काळाचा आहे. मागच्या वर्षी सहाव्या महिन्यामध्ये बजेट सादर झाला नाही. या वर्षी पॅन्डमिक स्थिती असल्यामुळे दहाव्या महिन्यामध्ये हे बजेट सादर झालेले आहे. हे बजेट सादर केल्यानंतर त्यांनी प्रथमत: एक मानस व्यक्त केला की पेनडॅमिक सिच्युऐशनमध्ये जसे आयसोलेशनमध्ये आपण ज्या बाधीत झालेल्या नागरिकांना ठेवत होतो तसे आयसोलेशन मध्ये मी कोणत्याही नगरसेवकांना ठेवणार नाही. कुठलाही भेदभाव करणार नाही अशा पध्दतीची भावना सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती यांनी व्यक्त केली. अध्यक्ष स्थायी समिती श्री.विजय झलके हे अभियंता आहे. जिज्ञासु आहे, अभ्यासु आहे, चिकित्सक वृत्तीचे आहे. मला असे वाटत होते की निश्चितपणाने त्यांची झलक या बजेटवर राहील मात्र त्यांची कुठलिही झलक या बजेटवर आपल्याला दिसुन येत नाही आणि हे बजेट त्रैवार्षिक बजेट वाटुन राहिले आहे. मागच्या वर्षीच्या बजेटला मी दिड वार्षीक बजेट म्हणालो कारण की विरेंद्र कुकरेजा स्थायी समिती अध्यक्ष असतांना त्यांनी घोषण केल्या होत्या प्रावधानाचे वाटप त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये केले होते त्यालाच कॅरीफॉरवर्ड करण्याचे काम मागचे स्थायी समिती अध्यक्ष श्री.पोहाणे यांनी सुध्दा केले. आता पिंटु झलके निश्चितपणाने चांगले बजेट ठेऊ शकले असते माझे मित्र आहे. परंतु दुर्देवाने दोन सिच्युऐशन येथे निर्माण झाली आहे. पहिली सिच्युयेशन जी आहे की पेनडॅमिक स्थिती निर्माण झाली. पॅनडॅमिक स्थितीमध्ये महानगरपालिकेचे आर्थिक स्त्रोत कमी झाले, उत्पन्नाचे साधने आटुन राहिलेले आहे हे एक कारण आहे. दुसरे कारण अत्यंत महत्वाचे आहे की मागील १० वर्षापासून महानगरपालिकेचा जो आर्थिक

ताळमेळ आपण बिघडविलेला आहे आणि हा आर्थिक ताळमेळ बिघडविल्यानंतर दरम्यानच्या काळात या देशामध्ये नोटबंदी झाली, जिएसटी लागु झाली, आणि संपुर्ण देशाचे एकॉनॉमिकल बॅलन्स बिघडले आणि त्यामुळे अनेक नागरिकांच्या नौक-या गेल्या, त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी झाले, त्यांची क्रयशक्ती कमी झाली पर्यायाने त्याचा परिणाम या शहराच्या महानगरपालिकेच्या उत्पन्नावर निश्चितपणाने झाला आहे. आपल्या देशाच्या बजेटमध्ये जी वृध्दी व्हायला पाहिजे होती ती निगेटीव्ह मध्ये जात आहे. आपला जीडीपी निगेटीव्ह मध्ये जात आहे. या परिस्थितीमध्ये या शहराचा बजेट वाढेल ही अपेक्षा सुध्दा आपण करु शकत नाही. नागपूर सुध्दा एक भारताचाच अंग आहे. भारताच्या आतमधले एक महत्वाचे शहर आहे त्यामुळे जी भारताची स्थिती आहे तीच स्थिती नागपूर शहराची आहे आणि तीच स्थिती आपल्या नागपूर महानगरपालिकेची आहे. त्यामुळे चालुन आलेली चांगली संधी असतांना मला असे वाटते की आमचे मित्र विजय झलके यांना या संधीचा फायदा घेता येऊ शकला नाही. त्यासाठी परिस्थिती मोठया प्रमाणात कारणीभुत आहे असे मला वाटते. मा.महापौरजी, सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती यांनीएक परिशिष्ट दिले आहे त्या परिशिष्टामध्ये त्यांनी महसुली व भांडवली बांधीव खर्चाचे परिशिष्ट दिले आहे. ज्या विकास कामांना मागच्या वर्षी कामाला वर्कऑर्डर मिळाले होते परंतु प्रत्यक्षात या वर्षी कामाला सुरुवात झाली नाही अशा सर्व कामांना तत्कालीन आयुक्तांनी स्थगिती दिली त्यामुळे ते प्रलंबित कामे कॅरीफॉरवर्ड करायचे आहे आणि त्याचे प्रावधान त्यांनी या पुस्तिकेमध्ये त्यांनी नमुद केले आहे त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी या संपुर्ण कामांना स्थगिती दिली सर्व नगरसेवकांची ओरड झाली होती की आमचे वर्कऑर्डर झालेले कामे थांबले आहे. मी तत्कालीन आयुक्तांशी त्या विषयासंदर्भात चर्चा करण्यासाठी गेलो होतो मा.महापौरजी जर हे कामे त्यावेळी खर्चामध्ये आपण घेतले असते तर हे कामे मागच्या वर्षीच्या खर्चामध्ये घेतलेले नाही त्यामुळे खर्च वाचला असेल मा.महापौरजी हे बजेट २७०० कोटीपेक्षा अधिकचे व्हायला पाहिजे होते याचे प्रावधान आपण या वर्षी करुन राहिलो आहे. त्यामुळे वाचलेले पैसे या वर्षीच्या बजेटमध्ये का वाढवुन घेतले नाही. मा.महापौरजी हे संपुर्ण आकडे जरी आपल्याला पुस्तकात दिसत असले तरी वास्तविकतेमध्ये प्रत्यक्षामध्ये ते आकडे आपल्या महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये नाही. महानगरपालिकेची तिजोरी रिकामी झालेली आहे ही वास्तविकता आपण मान्य केली पाहिजे. ही वास्तविकता आपण नागरिकांना देखील समजुन सांगितली पाहिजे. नागरिकांची क्रयशक्ती कमी झाली, नागरिकांच्या नौक-या गेल्या, उदरनिर्वाहाचे साधणे संपुष्टात आले, अशा स्थितीमध्ये महानगरपालिकेचा कर भरणे सुध्दा नागरिकांना परवडत नाही. उत्पन्नाचे नविन स्त्रोत या एक वर्षामध्ये निर्माण होतील असे नाही. त्याचा एक लाँग टर्म प्लॅन असायला पाहिजे होता. मा.महापौरजी १० वर्षापासून पुर्ण बहुमतामध्ये आपली सत्ता महानगरपालिकेमध्ये आहे. परंतु आपण नविन उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केले नाही त्यामुळे मा.महापौरजी ही जी आर्थिक डबघाईस आलेली स्थिती आहे ती फक्त कोव्हीड – १९ मुळे आलेली नाही तर ती मागील १० वर्षापासून आपण जो अवास्तव खर्च केला त्याचे नियोजन ज्या पध्दतीने करायला पाहिजे होते त्या पध्दतीने केले नाही त्यामुळे ते चाके रुतणारच होते ते चाके आता यावेळी रुतले. आता आपण त्याला कोव्हीडचे कवच लावण्याचे काम व आपले अपयश झाकण्याचे काम मा.महापौरजी आपण पध्दतशीरपणे आपण सर्व लोक करीत आहे. त्यांनी या खर्चामध्ये बघा की मी आयसोलेशन मध्ये कोणाला ठेवणार नाही अशा पध्दतीने सुपर्ण खर्चाचा गोषवारा तयार केला. या गोषवारामध्ये शेवटी काही लोकांचे नावे आहे जे पेनडॅमिक मध्ये आहे, जे आयसोलेशनमध्ये आहे. ज्यांच्या विकास कामांना जर एकही रुपया येथे दिलेला नाही किंवा त्यांचे कामे मागच्या वर्षी पुर्ण झाले असतील तर त्यांनी त्याचे स्पष्टीकरण दयावे. नागेश सहारे बीजेपी यांच्यासाठी या पुस्तकामध्ये शुन्य रुपये आहे. म्हणजे मागच्या कमीटेड एक्सपेंडीचर मध्ये त्यांच्या नावाने एकही रुपया त्यांच्या नावानी नाही कदाचित मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये त्यांनी पुर्ण पैसे खर्च

केले असतील किंवा मागच्या वर्षी त्यांना एकही रुपया दिलेला गेला नसतील, दुसरे नाव आहे रेखा साकोरे, तिसरे नाव आहे प्रगतीताई पाटील, चौथे नाव आहे अभय गोटेकर या सर्व लोकांसाठी एकही रुपया या मध्ये शिल्लक राहिलेला नाही. मग सर्व नगरसेवकांची मोठी ओरड होत होती की आमच्या प्रभागातील कामे थांबलेले आहे. आता ही किती लोकांची ओरड होत होती तर मा.महापौरजी माजी स्थायी समिती अध्यक्ष श्री.प्रदीप पोहाणे साहेब जे आहे माजी स्थायी समिती अध्यक्ष त्यांच्या कामासाठी १० कोटी ६० लक्ष रुपयांचा या पुस्तीकेमध्ये प्रावधान ठेवलेले आहे. एका नगरसेवकांसाठी १० कोटी ६० लाख रुपये आहे. हे उच्चांक स्थानावर आहे. दुसरे स्थान आहे विरेंद्र कुकरेजाजी यांच्या ठिकाणी ९ कोटी ६२ लाख, त्यानंतर प्रभाग १९ मध्ये नगरसेवकांचे नाव अंतर्भुत नाही तेथे ८.४४ लाख, प्रभाग १८ म्हणजे दटके साहेबांचा वार्ड तेथे ६०८ लाख, मा.महापौरजी ही स्थिती आहे. या प्रावधानाच्या यादीमध्ये सन्माननिय स्थायी समिती अध्यक्ष स्वत: कुठल्या स्थानावर आहे. हे अत्यंत महत्वाचे आहे. स्थायी समिती अध्यक्ष स्वत: हे ९३ व्या स्थानावर आहे. मा.महापौरजी ज्या वेळेस आपण २०१८- १९ मध्ये प्रावधान दिले होते त्यावेळेस विरेंद्र कुकरेजा हे हायस्ट होते. यामध्ये अनेक सन्माननिय नगरसेवक हे भारतीय जनता पक्षाचे जरी नगरसेवक असले त्यांचे अधिकाधिक प्रावधान १ कोटी पेक्षा अधिक नाही ऐवढयाच रकमेचे प्रावधान या ठिकाणी उपलब्ध करुन दिले आहे. अशा नगरसेवकांची संख्या जवळ जवळ १०० आहे. अनेक नगरसेवकांचे तर ६ लाख रुपये ३ लाख रुपये,२ लाख रुपये, ५ लाख रुपये ऐवढे कमी प्रावधान मागच्या वर्षीचे प्रलंबित आहे. त्यामुळे आयसोलेशन हे शब्दच्छेल आहे. मागच्या वर्षी मी बजेटच्या निधी वाटपामध्ये ज्या पध्दतीचे निधी वाटप केला जातो ज्याचा कुठलाही आधार नाही. त्या भागातील कामे पाहुन निधी दिला पाहिजे परंतु तसे न करता सरसकट नगरसेवक पाहुन तो किती वजनी आहे, तो किती जेष्ठ आहे, त्यांची न्युसन्स व्हॅल्यु किती आहे त्याच्या अनुरुप या निधीचे वाटप केले जाते मा.महापौरजी त्यामध्ये १३५ नगरसेवकांना निधीचे वाटप केले मात्र १५ नगरसेवक जे दुर्देवी ठरले, या जगात कोरोना येण्याच्या अगोदरच आयसोलेशनमध्ये टाकले होते. त्यांची संख्या जवळजवळ १५ आहे. मा.महापौरजी अत्यंत महत्वाचा विषय सन्माननिय स्थायी समिती अध्यक्षांनी उल्लेख करतांना एक गोष्ट प्रकर्षाने सांगितली की मागील आयुक्तांनी कायदेशीर पध्दतीने बजेट सादर केले नाही. त्यांनी भाषणामध्ये तसा उल्लेख केला. अनपेड एक्सपेंडीचर व कमिटेड एक्सपेंडीचर या अर्थ संकल्पीय प्राथमिक घटकामध्ये त्याचा उल्लेख नाही याचा निष्कर्ष सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती यांनी परस्पर काढुन टाकला याचा अर्थ कुठलाही बांधील खर्च बाकी नाही असा समज सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती यांनी परस्पर करुन घेतला. मा.महापौरजी या महानगरपालिकेमध्ये मागील १० वर्षापासुन भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे आणि भारतीय पक्षाची सत्ता असतांना आपल्याच पक्षाचे स्थायी समितीचे अध्यक्ष दरवर्षी झालेले आहे आणि या स्थायी समितीच्या अध्यक्षांना माहिती नाही. एखादया आयुक्तांच्या आकडयांवर ते विश्वास ठेवतात आणि विश्वास ठेऊन तो समज करुन घेतात की मागच्या वर्षीचे कुठलेही जुणे देणे नाही म्हणुन आम्हाला असे वाटत होते की मागच्या वर्षीचे कुठलेही देणे नाही म्हणुन हे कामे झाले पाहिजे असा जर भ्रम व असा जर समज सन्माननिय स्थायी समिती अध्यक्ष आपल्या भाषणामध्ये व्यक्त करीत असेल तर मला असे वाटते की निश्चितपणाने या शहराचे दुर्देव आहे. या शहराचा आर्थिक ताळेबंद ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे. मी आकडयामध्ये जाणार नाही. या ठिकाणी अनेक वक्त्यांनी सांगितले या अगोदर अविनाश ठाकरे सांगितले की आमचे स्थायी समिती अध्यक्ष पहिले आहे मा.आयुक्तांनी दिलेल्या बजेटपेक्षा कमी रकमेचे बजेट दिले. प्रत्येक स्थायी समितीच्या अध्यक्षांना असे वाटते की मी अधिक रकमेचे बजेट सादर केले पाहिजे. मी सुरुवातीलाच म्हटले की आमचे मित्र विजयभाऊ हे अभ्यासु आहे, जिज्ञासु आहे, चिकित्सक आहे आणि ते निश्चितपणाने या पेक्षा अधिक चांगले बजेट देऊ शकले असते परंतु त्यांना देता आले नाही याचं कारण असे आहे की मागील अनेक

वर्षापासून कॅरी फॉरवर्ड करीत करीत जी लायबिलीटी आपण वाढवुन राहिलो होतो त्या लायबिलीटीचा फुगा कधीना कधी फुटणार होता, तो फुगा आता निश्चितपणाने फुटलेला आहे असे मला येथे नमुद करायचे आहे. संपुर्ण दोन गोष्टीवर आपण सर्व ठिकळया फोडुन राहिलो. वास्तविकता मान्य करायला तयार नाही. की आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पुर्ण विकास कामाला खिळ बसविली. त्यांच्या कार्यकाळामध्ये कुठलाच विकास होऊ दिला नाही. आपण लक्षात घेतले पाहिजे की तुकाराम मुंढे साहेब या शहरामध्ये किती महिने होते ते फक्त ९ ते १० महिने महानगरपालिकेमध्ये आयुक्त म्हणुन राहिले, त्यातील ४ महिने हे कोरोना काळामध्ये गेलेले आहे. या १० महिन्याच्या काळामध्ये फक्त नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती डबघाईस आली अशा पध्दतीचे काल्पनिक चित्र या शहरामध्ये आपण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहात मात्र ती वास्तविकता नाही. मागील पाच वर्षामध्ये या शहराचे आमदार सन्माननिय देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री होते. मी या आधी देखील सभागृहामध्ये चर्चा करीत असतांना सांगितले की त्यांनी या शहराच्या विकासासाठी भरपुर निधी उपलब्ध करुन दिला आणि ते निश्चितपणाने दिले आाणि ते करणे स्वाभाविक आहे कारण की ते या शहराचे नागरिक आहे. या महानगरपालिकेचे नगरसेवक होते, महापौर होते.

श्री.अविनाश ठाकरे :- पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, प्रफुल्लजींनी आता जो आयुक्तांच्या संदर्भात विषय मांडला तो चुकीच्या पध्दतीने मांडत आहे. भुमिका सर्वांची एकच राहिली तुकाराम मुंढे जेव्हा आयुक्त होते तेव्हा तुम्ही सरसकट कामाला खिळ लाऊ नका तुम्ही महत्वाच्या कामाला मंजूरी दया आणि तुकाराम मुंढे आयुक्त असतांना त्यांनी सरसकट सर्व विकास कामांना खीळ लावली होती आणि आमचेही म्हणणे तेच होते ही परिस्थिती वर्षानुवर्ष अशीच चालत असते ही काही पहिल्यांदा वेळ नाही आली की लायबिलीटी आली म्हणुन, आपल्यावर लायबिलीटी प्रत्येक वेळला असते त्यामुळे आपण जे किमान रेगुलर काम आहे, जे नागरिकांच्या उपयोगाची कामे आहे. गडर लाईनचे काम आहे या कामांना खीळ लाऊ नका, ही भुमिका आपण सातत्याने मांडत आलेलो आहे. परंतु प्रफुल्लजी त्यांच्या भाषणामध्ये चुकीचे इंटरप्रिटेशन करीत आहे. सत्तापक्षांच्या नगरसेवकांनी असे कुठेही म्हटले नाही सभागृहामध्ये की आयुक्तांनी सरसकट कामांना खीळ न लावता रेगुलर कामांना खीळ लावली असे आपले वक्तव्य नव्हते. त्यामुळे प्रफुल्लजी मी आपल्याला करेक्शन करु इच्छितो की आम्ही कधीही असे म्हटले नाही की जे इमरजन्सी कामे आहे ते करावे हीच भुमिका आमची होती. आणि ही रेगुलर प्रोसेस चालु होती. मी तुमचे अभिनंदन करतो की तुम्ही तुमच्या भाषणामध्ये चुकीच्या पध्दतीने इंटरप्रिटेशन मांडण्याचा प्रयत्न केला परंतु भुमिका तीच मांडली जी सत्तापक्षाची होती.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी आमचे मित्र सन्माननिय अविनाश ठाकरे यांनी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन घेतली. मा.महापौरजी माझ्या भाषणामध्ये जर एखादा चुकीचा मुद्या आला असेल, पुढेही येणार असेल तर त्या ठिकाणी त्या नंतरच्या वक्त्यांनी त्या संपुर्ण विषयाला इंटरअप करुन आपण खोळुन घेतले पाहिजे. मा.महापौरजी याच्या अगोदर सन्माननिय नंदाताई जिचकार बोलल्या, या ठिकाणी आमचे अविनाश भाऊ बोलले, धर्मपाल मेश्रामजी बोलले अनेक लोक बोलले, त्यांच्या भाषणातील अनेक मुद्ये मला खोडुन काढता आले असते, त्यांनी सुध्दा चुकीच्या पध्दतीने अनेक मुद्ये त्यांनी मांडलेले आहे. मात्र आम्ही त्यांना पुर्णपणे बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यांचे म्हणणे आम्ही ऐकुन घेतले, ही डिबेट आहे प्रत्येक वेळेस आपण पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन आणि पॉइंट ऑफ ऑर्डर घेत असु तर मला असे वाटते की कुठेतरी आपण भाषणामध्ये खोळंबा निर्माण करतो अशी स्थिती निर्माण होईल म्हणुन माझी आपणांस नम्रपणे विनंती आहे की पहिल्यांदा

ऐकुण घ्यावे, लोकशाहीमध्ये ऐकले पाहिजे, प्रॉब्लेम हा आहे आपला, आपल्याला ऐकायची सवय नाही. आणि सर्वांनी चुप राहिले पाहिजे आणि आम्ही जे म्हटले तेच मान्य केले पाहिजे अशा प्रकारचा आपला दुराग्रह असतो. मा.महापौरजी माझी विनम्रपणे विनंती आहे की पहिल्यांदा आपण ऐकुण घ्या, माझ्या मांडणीमध्ये जर काही चुक झाली असेल निश्चितपणाने ते खोडुन काढण्याची संधी आपल्याला उपलब्ध आहे. त्यामध्ये मला काही आक्षेप असण्याचे कारण नाही. मी माझी भुमिका मांडत आहे. आपण त्यांचे इंटरप्रिटेशन आपण कसे घेता तो तुमचा अधिकार आहे मात्र माझ्या भाषणानंतर आपणा तो मांडाला पाहिजे. मा.महापौरजी दुसरा एक विषय असा आहे की या बजेट पुस्तिकेमध्ये या महानगरपालिकेच्या नियमावलीची खुप चर्चा झालेली आहे. आणि महानगरपालिकेमध्ये असलेले विविध प्राधीकरण आणि त्या प्राधीकरणाचे अधिकार आणि कायदयामध्ये अंतर्भुत असलेल्या तरतुदी याचा खुप उल्लेख झालेला आहे. मी पहिल्यांदा बघत आहे. ज्या वेळेस तुकाराम मुंढे साहेब आयुक्त असतांना एका स्थगन प्रस्तावावर पाच दिवस सभा चालविली होती. त्यावेळी मी म्हटले होते की, विविध प्राधीकरणाच्या अधिकारामध्ये होणारा हस्तक्षेप यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधीमध्ये संघर्ष निर्माण होण्याची स्थिती निर्माण झालेली आहे. कोण कोणाच्या अधिकारामध्ये हस्तक्षेप करीत आहे यावर आपण स्वतंत्र चर्चा केली पाहिजे, त्यावेळी आयुक्त तुकाराम मुंढे हे समजा चर्चा करण्यासाठी तयार नव्हते त्यावेळी माझी भुमिका अशी होती की एक समन्वयाचे वातावरण तयार केले पाहिजे. आता तुकाराम मुंढे हा विषय संपलेला आहे. आता विषय असा आहे की आयुक्तांना या महानगरपालिकेमध्ये कुठले कुठले अधिकार दिले आहे. स्थायी समितीला कुठले अधिकार आहे. मा.महापौरांना प्राधिकरण म्हणुन कुठल्या अधिकार आहे आणि हाऊस कुठले अधिकार आहे हे डिफाईन केलेले आहे. सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती यांना या संपुर्ण गोष्टींचा अंतर्भाव आपल्या बजेटच्या पुस्तीकेमध्ये करण्याची आवश्यकता का भासली, यांचे म्हणणे आहे की तत्कालीन आयुक्तांनी बजेट नियमाप्रमाणे दिले नाही. मा.महापौरजी तत्कालीन आयुक्तांनी जर नियमाप्रमाणे बजेट दिले नाही तर अशा कुठल्या नियमांचे त्यांनी उल्लंघन केले त्या संदर्भामध्ये या सभागृहात स्वतंत्र चर्चा करता आली असती. आजही आम्हाला बोध होत नाही. आज दिडशे नगरसेवक आहे त्यांना बोध झाला असेल तर मला माहिती नाही. की कुठल्या नियमांचे त्यांनी पालन केले नाही. याची चर्चा या सभागृहात व्हायला पाहिजे होती मात्र मा.महापौरजी अशा प्रकारच्या चर्चेपासुन आपण दुर जातो आणि बजेटमध्ये एखादी वोळ टाकुन एक वेगळया प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करतो. आणि नियमामध्ये आठवण झाली की २५ लाखापर्यतचे अधिकार मा.आयुक्तांना आहे. आणि २५ लाखांच्या वरचे अधिकार हे मा.महापौरांना ५० लाखापर्यतचे आहे. मा.महापौरजी नियमाप्रमाणे महापौर निधीच नाही. कायद्यामध्ये अंतर्भुत नाही की महापौरांना विकास कामांना स्वतंत्र निधी देणे. कायद्यामध्ये असे अंतर्भुत आहे मा.महापौरांना २५ लाखापासून ५० लाखापर्यतच्या एखादया कामाला मंजूरी देता येते मात्र वर्षभरामध्ये त्याची टोटल ही अडीच कोटीपेक्षा अधिक असु नये, हा नियम आहे परंतु मा.महापौरजी आपण एक परंम्परा म्हणुन व नागपूर शहराचे प्रथम नागरीक म्हणुन आपण तो निश्चितपणाने त्यांचा तो मान ठेवला की मा.महापौर शहराच्या विविध भागामध्ये जात असतील, नागरिकांच्या समस्या त्यांच्यापुढे येणार असतील मा.महापौरांकडे ५ कोटी रुपयांचा निधी असला पाहिजे हे मान्य केले. मा.महापौरजी अनेक गोष्टी आपण अशापध्दतीने मान्य करीत असतो. २५ लाखाच्या वरचे कामे स्थायी समितीकडे आलेच पाहिजे अशाप्रकारचा अट्टहास निश्चितप्रमाणे कायदयाप्रमाणे स्थायी समितीचा आहे मात्र कुठल्या स्थितीमध्ये मा.महापौरजी सर्वसामान्य स्थितीमध्ये, सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती म्हणतात की कोव्हीड—१९ च्या काळात ज्या संविदा केलेल्या आहेत त्या कायदयाच्या चाकोरीमध्ये बसत नाही. वरतुन त्या कलमाचा उल्लेख करुन संपुर्ण रद्य करता येऊ शकतील असा सुध्दा उल्लेख करीत आहे. मा.महापौरजी या कोव्हीड —१९ च्या काळामध्ये कुठला कायदा अंमलामध्ये

होता. कोव्हीड– १९ च्या काळामध्ये फक्त नागपूर शहरातच नाही तर पुर्ण राज्यभरामध्ये त्या त्या प्राधीकरणाने ॲपेडमीक डिसीजेस ॲक्ट १८९७, व डिझास्टर मॅनेजमेंट ॲक्ट २००५ च्या कायदयामध्ये तरतुद आहे. त्याचा अवलंब केला आहे. (ॲक्टचे वाचन केले) मा.महापौरजी याचा अर्थ असा आहे की कुठल्या कायदयामध्ये काहीही अंतर्भुत असले तरीही या स्थितीमध्ये त्या प्राधीकरणाला जे योग्य वाटेल ते योग्य ठरवुन त्या पध्दतीने ते कारवाई करतील. या ठिकाणी सन्माननिय अध्यक्ष स्थायी समिती या संपुर्ण जुन्या कायदयाचा ॲपॅडमीक डिसीसेस ॲक्ट आणि डिझास्टर मॅनेजमेट ॲक्ट या संपुर्ण कायदयाला ते नजरअंदाज करतात आणि ओढुन तोडुन आमचा कायदा सर्वोच्च आहे असे सांगण्याचा प्रयत्न करतात. मा.महापौरजी, ज्या विधी मंडळाने महानगरपालिकेचा ॲक्ट तयार केला त्याच विधीमंडळाने डिझास्टर मॅनेजमेंट ॲक्ट सुध्दा केलेला आहे त्याच संसदेने केला आहे त्यामुळे तो सुध्दा कायदा आपल्याला बंधनकारक आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. मा.महापौरजी त्यांच्या भाषणामध्ये एक अत्यंत महत्वाचा शब्द आहे मनपाचे उत्पन्न खर्च नियोजन कामाची गती का थांबलेली आहे. मा.महापौरजी ते मान्य करतात की मनपाचे उत्पन्न थांबले, खर्च थांबला, नियोजन थांबले, आणि कामाची गती थांबली ही स्थिती का निर्माण झाली, ही स्थिती १० महिन्यामध्ये किंवा ६ महिन्यामध्ये निर्माण झालेली आहे काय ? या शहराच्या कामाचे नियोजन, या शहरामध्ये उत्पन्नाचे नविन स्त्रोत निर्माण करण्याचे अपयश हे निश्चितपणाने सत्तापक्ष म्हणुन आपले आहे ते आपण स्वीकारले पाहिजे आपण ते न स्वीकारता कोव्हीडच्या नाव करीत करीत. आहे. मी सकाळी एक कल्पना करीत होतो की ख्रीसमस ट्री ला कापुस लटकुन दया आणि सांगा की हा बर्फ आहे. तसच आहे काही अपयश आले की कोव्हीड, आपले अपयश आपण मान्य केले पाहिजे, तरीसुध्दा चुकीतुन दुरस्ती निश्चितपणाने होऊ शकते, मा.महापौरजी या बजेटमध्ये विशेष तर काहीच नाही, ना कुठला अर्थ आहे ना कुठला संकल्प आहे. कुठली दिशा नाही कुठले धोरण नाही. याचे कारणे या आधी नमुद केले आहे. तर कुठल्या कारणान्वये दिशा राहिली नाही. हा बजेट आपल्याला फेब्रुवारी पर्यत आपल्याला इंम्प्लीमेंट करायचा आहे. जुनेच काम आहे नविन कामांचा मोह त्यांनी निश्चितपणाने टाळला, चांगली गोष्ट केली. नविन कामे त्यामध्ये अंतर्भुत केले नाही कारण की आपली त्यामध्ये क्षमताच राहिली नाही. कोव्हीडमुळे संपुर्ण जगाची अर्थव्यवस्था डबघाईस आली त्यामुळे आपण काही वेगळा काही तीर मारु शकु ही पण अपेक्षा करीत नाही. मात्र आपल्याला अशा परिस्थितीमध्ये आपल्याला काही बचत करावा लागेल, ती बचत कुठली करावी लागणार आहे. मी काल दिवसभर कामाचे नावे पाहत होतो. त्यामध्ये खांडकी रस्ते किती मिटरच्या रस्त्याला आपण खांडकी रस्ते करणार आहे ९ मिटरच्या रस्त्यावर खांडकी रस्ते, खांडकी म्हणजे काय तर डांबरीकरणाच्या रस्त्याच्या बाजुला आपण पेव्हींग ब्लॉक्सचे बहुतांश कामे ही पेव्हींग ब्लॉकचे कामे आहे. मी या आधीही म्हटले होते की या संपूर्ण कामाची चौकशी झाली पाहिजे. आमचे दक्षिण पश्चिम नागपूर विधानसभा मतदार संघामध्ये माजी मुख्यमंत्र्यांच्या मतदार संघामध्ये जवळ जवळ १५ कोटी रुपयांचे खांडकी रस्ते हा आपला विकास आहे. केवळ १५ कोटी रुपयांचे फक्त पेव्हींग ब्लॉक त्याचे सुध्दा स्टॅन्डर्ड आहे. ९ मिटरच्या रस्त्यांचे डांबरीकरण साधारणत: ५ मिटर असते उरलेली जागा ४ मिटर, एका बाजुला २ मिटर आणि दुस-या बाजुला २ मिटर ते आपण पुर्ण पेव्हींग करुन टाकतो. सर्व्हीस लाईनसाठी ती आपल्याला जागा सोडावी लागते. यामध्ये १५ कोटी रुपये आपण शासनाच्या निधीतुन खर्च करुन राहिलो आहे. ही पण वास्तविकता आपण शहरातील नागरिकांपासुन लपुन ठेवत आहे. मा.महापौरजी निश्चितपणाने याला मी विकास म्हणणार नाही. २ ते ४ योजना या अर्थसंकल्पामध्ये मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी अंतर्भुत केल्या, त्यासाठी त्यांचे प्रामाणिक प्रयत्न राहीतील तरी सुध्दा मला वाटत नाही त्यामध्ये ते काही यशस्वी होतील, सातत्याने पुर्व वक्त्यांनी या ठिकाणी उल्लेख केला की महाविकास आघाडीचे सरकार आल्याबरोबरच या शहराच्या विकासाला खिळ बसली, मा .महापौरजी महा विकास आघाडीचे सरकार ३०

नोव्हेबर २०१९ ला अस्तीत्वात आलं, लगेच नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन होते, मंत्रीमंडळाचा विस्तार जानेवारीच्या पहिल्या आठवडयामध्ये झाला, तरी साधारणत: फेब्रुवारी - मार्च पासुन पॅनडॅमिक स्थिती निर्माण झाली, पुर्ण देशामध्ये आपण राज्यामध्ये आर्थिक स्थिती डबघाईस आली होती. मा.महापौरजी महाविकास आघाडीने पैसे थांबविले आमच्यावर मोठया प्रमाणात अन्याय केला आणि या ठिकाणी नगरसेवक श्री.संजय बंगाले यांनी सांगितले की मागच्या ५ वर्षामध्ये आम्ही ६५ वर्षाचा अन्याय आम्ही दुर केलेला आहे. म्हणजे ६५ वर्ष या शहरावर खुप मोठया प्रमाणात अन्याय झाला, एकच पक्षाचे म्हणजे कॉग्रेस पक्षाचे सरकार होते आणि कॉग्रेस पक्षाच्या सरकारने ६५ वर्ष काहीही केले नाही अशा प्रकारचे अहिर्भाव आमचे मित्र संजय बंगाले यांनी व्यक्त केला. मा.महापौरजी त्यांनी अटलजींचे पार्लमेंटचे भाषण ऐकावे, ६५ वर्षात कॉग्रेस पक्षाने या देशात कोणते कोणते कामे केले आहे, या ६५ वर्षामध्ये कॉग्रेस पक्षाने जे विकास कामे केले, संस्था निर्माण केल्या त्याच्या बळावर आपण या विकासाचे कामे पुढे घेऊन चाललो आहे. यांचे म्हणणे आहे की आम्ही भेदभाव केला नाही. आपण फक्त कॉग्रेसच्या नगरसेवकां बरोबर भेदभाव करता असे नाही मा.महापौरजी आपण भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांसोबत सुध्दा भेदभाव करता तो विकास कामाच्या संदर्भात करता, तो निधी वाटपाच्या संदर्भात करता, मा.महापौरजी या संदर्भामध्ये आपल्याला विनम्रपणे सांगु इच्छितो की या महाविकास आघाडीने आमचे पैसे कमी केले म्हणुन आपण एक सर्वपक्षीय शिष्टमंडळ नेले पाहिजे अशा प्रकारचे वक्तव्य सन्माननिय नंदाताईने या ठिकाणी केले. आता सर्व पक्षीय शिष्टमंडळ जर आपल्याला न्यायचे आहे तर मा.मुख्यमंत्र्यांकडे घेऊन जाऊ, मी कालच वर्तमानपत्रामध्ये वाचत होतो मा.विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानसभा श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी म्हटले की आम्ही जीएसटीच्या स्वरुपाचे पैसे केंद्र देईल तेव्हा देईल मात्र ६० हजार कोटी रुपयांचे कर्ज काढण्याची कुवत आणि क्षमता या राज्य सरकारची आहे. त्यामुळे राज्य सरकारने कर्ज काढले पाहिजे. मा.महापौरजी केंद्र सरकारकडे या राज्याचा जे थकित अनुदान आहे जी.एस.टी. च्या स्वरुपातले ते मागण्यासाठी मा.महापौरजी माझी नंदाताईंना विनंती आहे की मा.गडकरी साहेब, मा.फडणवीस साहेब यांच्या नेतृत्तवामध्ये आपण सर्वपक्षीय शिष्टमंडळ सन्माननिय पंतप्रधानांकडे घेऊन गेले पाहिजे, कोणाच्या वतीने तर संपुर्ण राज्याच्या नागरिकांच्या वतीने जर राज्याकडे जर पैसे आले तर मला असे वाटते की निश्चितपणाने राज्य सरकार या शहरातील विकास कामांसाठी पैसे देण्यास कटीबध्द आहे. आणि ते संपुर्ण पैसे देतील याची आम्हाला खात्री आहे. नंदाताईंचा विषय होता की शहर बस सेवा मेट्रोला देऊन टाका,आणि त्यांचे म्हणणे आहे की आमची महानगरपालिका काही सक्षम नाही शहर बस सेवा चालविण्यासाठी आणि मेट्रोने ती सेवा मागितलेली आहे त्यामुळे ती सेवा दयायला काही हरकत नाही अशी भावना त्यांनी व्यक्त केली मग मा.महापौरजी महानगरपालिका सुध्दा मेट्रोला दिली पाहिजे महानगरपालिका सुध्दा आपण चालविण्यासाठी सक्षम नाही, आपल्या कार्यकाळामध्ये संपुर्ण आघाडयावरील आपले अपयश आहे. आपण २४ बाय ७ च्या संदर्भात या शहरातील नागरिकांना आपण अश्वासन दिले होते कोणते आश्वासन दिले होते की आम्ही या शहरातील जनतेला २४ तास पाणी देऊ, मा.महापौरजी विधानसभेमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आश्वासन आहे नोव्हेंबर २०१९ पर्यत या शहरातील जनतेला आम्ही २४ तास पाणी देऊ, ते पुर्ण झाले आहे काय ? आज पावसाळा अजुनही अर्ध्या स्थितीमध्ये आहे परंतु आजही अर्ध्या वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी नाही. या शहरातील महानगरपालिकेंच्या शाळेची स्थिती काय आहे ? या संदर्भात आपला लॉग टर्म प्लॅन काय आहे ? आता मागच्या आठवडयात आपण १२ ते १३ शाळा बंद केल्या आहे, कुठले नियोजन आहे, कुठले धोरण आहे, या शहरामध्ये खुप गाजावाजा करीत स्कॅनिया कंपनीच्या २९ ग्रीन बसेस बंद केलेल्या आहे, हे आपले अपयश आहे. आपण फक्त मुंढे साहेबांवर खुप तोंडसुख घेतले की त्यांनी फक्त व्हीडीयोवर ५००० खाटांची व्यवस्था उभारली, मी काय म्हटले ते जाऊ दया,

आयुक्त काही या शहराचे परमनंट नाही, ते येतील २ ते ३ वर्ष राहतील आणि जातील, आपण या शहराचे नागरिक म्हणुन आपण सत्तापक्ष म्हणुन ज्या शहरातील नागरिकांनी आपल्याला अत्यंत जबाबदारीने सत्तेवर बसविले, या शहराचा कारभार चालविण्याची जबाबदारी आपल्यावर टाकली त्यांनी या शहराच्या नियोजनाच्या दृष्टीकोणातून, आरोग्याच्या दृष्टीकोणातून मागील १० वर्षामध्ये आपण जर कुठले काम केले असेल तर ते आपले अपयश आहे, पेनडॅमिक स्थिती निर्माण झाली त्यावेळी संपुर्ण यंत्रणा कुचकामी ठरली होती, हे फक्त नागपूर शहरातील कुचकामी ठरली यातील भाग नाही संपुर्ण देशभरातील किंवा राज्यातील यंत्रणा कुचकामी ठरली होती. मा.महापौरजी आज सर्वीकडे ओरड आहे की घरोघरी कचरा गोळा करणारी यंत्रणा निर्माण केली पण आज घरोघरी कचरा गोळा करणारी यंत्रणा नागरिकांच्या घरापर्यत जात नाही अनेक कामगारांना त्यांनी कामावरुन कमी केले आणि कारण काय सांगितले की कचरा कमी होऊन राहिला, कचरा जरी कमी झाला असेल तरी घरी काही कमी झालेले नाही. तुम्हाला जरी माझ्या घरी यायचे असेल आणि २ किलो जर मी रोज कचरा निर्माण करणार असेल अशा स्थितीमध्ये १ किलोमध्ये कचरा कमी झाला त्यामुळे कामगारांना कामावरुन कमी करण्याचे कारण काय ? तुम्ही कसे काय कामगारांना कामावरुन कमी केले. कारण पर टनचा जो रेट आहे तो रेट आपण निश्चितपणाने त्याचे कॅलकुलेशन करुन केलेले आहे. मा.महापौरजी, आपण अशाच पध्दतीने आपण ओसीडब्लु ला कोटयावधी रुपये देत आहे. कोटयावधी रुपयांची आपण दंडमाफी केलेली आहे, आपण नागपूर शहरातील जनतेच्या मेहणीतीच्या पैशाची दंडमाफी केलेली आहे. म्हणुन या बजेटमध्ये काहीही अंतर्भुत नाही. कारण आण्यातच नाही तर परातुन कुठुण येणार आहे. कुठल्याही योजना आपण घेतल्या नसल्या तरी जुन्या योजना पुर्णत्वास जातील की नाही या बाबतीत माझ्या मनामध्ये निश्चितपणाने शंका आहे. नविन कुठल्याही विकास कामाचे ॲनेक्सचर जोडलेले आहे त्याला सुध्दा प्रावधान उपलब्ध होईल की नाही, काही कॉग्रेसचे नगरसेवक मा.आयुक्त साहेबांना भेटायला गेले होते.आयुक्त साहेबांनी म्हटले की आमच्याकडे पैसेच नाही, आता मग मागचे आयुक्त काही थैली भरुन घेऊन गेले काय मुंबईला बदलीच्या ठिकाणी, या आयुक्तांनी पैसे लपून ठेवलेले आहे काय ?आपल्या तिजोरीमध्येच नाही म्हणुन मा.महापौरजी हा अर्थसंकल्प निरर्थक आहे, कुठलाही अर्थ नसलेला अर्थसंकल्प आहे. मी अजुनही सांगतो की विजय झलके अत्यंत चांगला व्यक्ती जो कल्पक आहे. समोरच्या दृष्टीकोणातून नविन अनेक योजना त्यांना निर्माण करता आल्या असत्या, ते अपयशी ठरले, दुर्देवी ठरले,खर्चाकडे जरी त्यांनी लक्ष दिले नाही तरी उत्पन्नाच्या दृष्टीकोणातून त्यांनी नविन नविन कल्पनांच्या माध्यमातून उत्पन्न यामध्ये अंतर्भुत केले असत. आता या कंडीशनमध्ये स्ट्रीट व्हेंडर खुप वाढले त्यांना सोयी उपलब्ध करुन दयायच्या आहे आपल्याला, मा.महापौरजी, केंद्र सरकारचे धोरण आहे. आपला कायदा आहे आणि आपण दुसरीकडे स्ट्रीट व्हेंडरवर कारवाई करुन राहिलो. त्या स्ट्रीट व्हेंडर कमेटीचे गठण करायचे आहे त्या अनुषंगाने याचे सर्व्हे करणे आवश्यक आहे. नविन स्ट्रीट व्हेंडर या शहरामध्ये २० ते २५ हजार निर्माण झालेले आहे त्यांची नोंद करुन त्यांच्याकडुन आपल्याला फि वसुल करता येते काय ? अशा वेगवेगळया माध्यमातून आपल्याला उत्पन्न निर्माण करता येऊ शकते काय ? हा प्रयत्न केला पाहिजे. सोबत बचत पण अत्यंत महत्वाची आहे. त्यांनी बजेट पुस्तीकेमध्ये सांगितले की चुक भुल लेना देना ही म्हण जशी आहे तशीच एक म्हण आहे की आपल्याला अडीअडचणीच्या काळामध्ये राखीव निधी असतात तो राखीव नीधी आपण ठेवला नाही केवळ उधळपट्टी करण्याचे काम आपण या ५ वर्षामध्ये केले सर्वस्वी राज्य सरकारवर अवलंबून राहिलो आता राज्यसरकार बदलले प्रत्येक वेळी काही नागपूर शहराचा मुख्यमंत्री राहील असे तर नाही. ही लोकशाही आहे लोकशाही मध्ये जे लोक ठरवतील त्या व्यवस्थेनरुप मुख्यमंत्री म्हणुन निवडल्या जाईल, ज्यावेळी आपल्या शहराचा मुख्यमंत्री नाही त्यावेळी जर मदतीचा जो पुर आहे तो कमी झाला तर ही महानगरपालिका स्वयंपूर्ण आर्थिक

सक्षम कशी होईल, या दृष्टीकोणातून आपण अजिबात लक्ष दिले नाही, किंबहुना या ५ वर्षामध्ये आपण आळशी झालो, परावलंबी झालो हे अपयश आपले आहे याचा गवगवा आपण कोव्हीडच्या माध्यमातून करीत आहे याचा आम्ही निश्चितपणाने विरोध करतो. नविन उत्पनाचे स्त्रोत निर्माण करण्यासाठी आमचे सहकार्य जेथे आवश्यक असेल तेथे निश्चितपणे सहकार्य देण्याची आमची तयार आहे. यावेळी आपण म्हणत आहे की प्रापर्टी टॅक्स संदर्भात आपण खुप पुरका आणुन राहिलो की प्रॉपर्टी टॅक्स ५ टक्के माफ करा, मा.महापौरजी २० तारखेच्या सभेमध्ये जी सभा आवाज येत नाही या कारणामुळे आपण सभा स्थगित केली त्या सभेमध्ये तो प्रश्न अंतर्भुत आहे. त्या प्रस्तावामध्ये मा.आयुक्तांनी जेवढे टक्के टॅक्सेशन प्रपोज केले स्थायी समितीने तेवढेच टक्के ॲज इट इज केलेले आहे. जर आपल्याला असे वाटत होतं की या वर्षी नागरिकांची आर्थिक स्थिती अडचणीची आहे कठीण आहे अशा स्थितीमध्ये नागरिकांना रिलीफ दयायला पाहिजे आयुक्त जर ते देत नसेल आमच्याकडे जे प्रदत्त अधिकार आहे किंवा कायदयामध्ये जे अधिकार आहे त्या कायदया अंतर्गत आपण टॅक्सेशन स्लॅब निश्चितपणाने कमी करु शकतो. जर मा.आयुक्त शास्ती माफी देत नसेल तरी सुध्दा आपण १२ टक्क्यापर्यत टॅक्सेशन स्लॅब कमी करु शकतो आज प्रॉपर्टी टॅक्स ५४ टक्क्यापर्यत आहे. त्याला जर आपण कमी करायचा असेल तर त्याला १२ टक्क्यापर्यत नेता येऊ शकते निश्चतपणाने नागपूर शहारातील नागरिकांना आपण रिलीफ देऊ शकतो परंतु खरोखर प्रामाणिक मानसिकता असली पाहिजे. फक्त प्रत्येक ठिकाणी राजकारण करणे आणि आपले अपयश कोणावर तरी ढकलुन देणे हा प्रकार बजेटच्या माध्यमातून करण्याचा प्रयन्त केला आहे त्याचा मी निश्चितपणाने कॉग्रेस पक्षाच्या वतीने मी विरोध करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्या बद्यल आपले आभार व्यक्त करतो आणि इथेच थांबतो, धन्यवाद, जय हिंद जय भारत.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, सुबह से सत्र २०२०-२१ के अर्थसंकल्प पर चर्चा शुरु है, और इसी चर्चा के दरम्यान मा.सदस्य, श्री गुडधे ने अपनी प्रखरवाणी से सभी मा.सदस्यो को संबोधित किया, नागपूर महानगरपालिका के जो चुनिंदे नगरसेवक है जिन्हे प्रखर के साथ साथ शिक्षित, सर्वसमायोजित साथ ही साथ मे प्रगल्भ प्रकांड विद्यवान के रुप मे जाना जाता है, उसमे आदरणीय श्री गुडधेजी का नाम आता है, मा. स्थायी समिती अध्यक्ष ने अपने भाषण मे पिछले आयुक्त पर उसने अदत देणे या कमिटेड एक्स्पेडेचर अपने बजट मे क्यों नही रखा और वह नियमानुरुप क्यो नही बना, यह आक्षेप लगाते समय केवल आक्षेप नही लगाया, बल्कि अपना बजट देते समयअलग से एक पुस्तिका भाग एक के रुप मे प्रकाशित की और दिशानिर्देशित किया कि मैं केवल आरोप नही लगा रहा हुं, मैं सूचना भी दे रहा हुं कि, आनेवाले वर्ष से इस प्रकार से एक जुने देणे की एक पुस्तिका प्रकाशित करके नयी परंपरा की शुरुवात की जायेगी, केवल इतना ही नही मा.महापौरजी, मा.गुडधेजी ने अपने उदबोधन मे कहां कि, तत्कालीन आयुक्त की यह गलती थी, उस सभागृह मे छे छे दिन तक भाषण होने के बाद गुडधेजी ने इस बात को सामने क्यों नही लाया, मा.महापौरजी, उस छे दिन की सभा मे छे घंटे का दयाशंकर का भी भाषण है, जो गुडधेजी ने पुरी तन्मयता के साथ मे इमानदारी से सुना है, और उसमे दयाशंकर ने यह प्रश्न किया है, निगम आयुक्त से कि, आप अपने बजट मे एक तरफ कहते है कि महानगरपालिका को हजारो करोडो रुपयो का देना बाकी है, २१०० करोड रुपये देना बाकी है और दुसरी तरफ आप जब अपना बजट सभागृह के समक्ष रखते है तो उसमे जुने देने के रुप मे अदत देने के रुप मे या कमिटेड एक्स्पेंडेचर के रुप मे एक रुपये की भी राशी नही रखते, इसका अर्थ यह होता है कि, पुराना कुछ देना नही है, और कुछ कमिटेड एक्पेंडीचर बचा नही है जितने काम हुऐ थे उसके सारे पैसे दे चुके है, यह बात सभागृह के मेरे भाषण अधिभुत है, मा.गुडधेजी उस भाषण के प्रत महानगरपालिका से प्राप्त करके उसको फिर से

उच्चारीत कर सकते है, और अगर मैं गलत कह रहा हुॅ तो आनेवाले सभागृह मे मुझ पर आरोप लगा सकते है कि, दयाशंकर ने भी सभागृह मे झुंठ बोला था। मा.महापौरजी, मैं नही चाहता था कि, जो आदमी जो व्यक्ती हमारे बिच रहा ही नही उस व्यक्ति पर कुछ चर्चा करे, कारण वह व्यक्ती चला गया है, उसपर चर्चा करने का कोई औचित्य नही है कारण वह चला गया है, लैकिन उसके व्दारा किये गये कार्यो को उसके जाने के बावजूद भी प्रतिपादीत करने की वकालत अगर कोई करता है तो मै कृबध आपसे निवेदन करना चाहता हुॅ कि उसको उत्तर देना नितांत आवश्यक है। इसलिये मैं नाम ले रहा हुॅ अन्यथा उनका नाम लेना मैं उचित नही समझता। मा.महापौरजी, मैं आपको बडी प्रगलभता के साथ बताना चाहता हुॅ कि, साथरोग प्रतिबंध अॅक्ट के अंतर्गत चाहे वह १८९७ का अॅक्ट हो, चाहे २००५ का अॅक्ट हो, उन दोनो अॅक्ट के अंतर्गत आयुक्त महोदय को कार्य करने के लिये निविदा करने के लिये अधिकार दिये गये है, इस बात से कोई भी एतराज नही कर रहा है, मा.अध्यक्ष, स्थायी समिती ने भी इस बात से एतराज नही किया है, लैकिन उस अॅक्ट का पालन करते समय किन किन चिजो की तरफ ध्यान देना चाहिये, इस बात के लिये महानगरपालिका के अॅक्ट मे नियोजन किया गया है, उन चिजो की परिपूर्ती मा.आयुक्त ने न करते हुऐ एक तानाशाही भुमिका अपनाई इस दृष्टीसे से मा.अध्यक्ष, स्थायी समिती को अपने विचार इस तरीके से यहां उच्चारीत करना पडा। मा.महापौरजी, आपके माध्यम से मैं प्रफुलजी को बताना चाहता हुॅ कि, हमारा जो अॅक्ट है इसके अंतर्गत नागपूर म्युनिसीपल कार्पोरेशन का संचालन होता है, इस अॅक्ट के अंतर्गत प्रकरण ७ मे संविदा नाम का एक संपुर्ण अलग से चॅपटर है, और उस चॅपटर मे ७३ डी के अंतर्गत स्पष्ट रुपसे उल्लेखित है कि, निगम आयुक्त की जवाबदारी संविदा को लेकर के क्या है। मा.महापौरजी, यह जो पुस्तक मे छपा हुआ है उसका मैं वाचन करना चाहता हुॅ, मा.महापौरजी, उसमे स्पष्ट लिखा हुआ है कि, ज्यात ५ लाख रुपयापेक्षा अधिक परंतु २५ लाख रुपये व त्यापेक्षा जास्त रकमेचा खर्च अंतर्भुत असलेल्या प्रत्येक संविदेची माहिती अशी संविदा केल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आंत निगम आयुक्तांनी स्थायी समितीला कळविले पाहिजे. यांनी हमारा जो संविधान है जिस संविधान के अनुरुप हम नागपूर महानगरपालिका का संचालन करते है, और जिस संविधान के कलम और पोट कलम का उल्लेख देकर के हमारे निर्वाचित जनप्रतिनिधीयो के पर को कुतरने की साजिश किसी छिपे अजेंडा के अंतर्गत तत्कालीन व्यक्ती ने की, मैं उस व्यक्ती का नाम नही लेना चाहुंगा, उस व्यक्ती के किये गये काले कारनामो को आप आज भी वकालत करके स्थापित करने की चेष्ठा करते है, और हमारे अॅक्ट मे प्रकरण ७ मे ७३ (डी) मे उल्लेखित किये गये नियमो का आयुक्त ने कर्तव्य पालन नही किया तो उसपर कौनसी कार्यवाही करनी चाहिये, गुडधेजी आप नागपूर महानगरपालिका के ज्येष्ठ नगरसेवक है, आप केवल ज्येष्ठ नही श्रेष्ठ नगरसेवक है, हम आपसे अपेक्षा कर सकते है, जो गलत है उसको गलत आपने बोलना चाहिये, चाहे गलती किसी की भी हो। मा.महापौरजी, इतना ही नही हमारे यहां साथरोग प्रतिबंध अॅक्ट के अंतर्गत जो अधिकार दिये गये है, उन अधिकारो मे आयुक्त के लिये उल्लेखित है कि, महानगरपालिका की कलम ३१९ अंतर्गत ३१९ लक्ष द्या, मा.महापौरजी, २० जून २०२० दुपारी १२ वाजता सभागृहातुन मा.आयुक्त पडुन गेले होते. कारण त्याचवेळेस नागपूर महानगरपालिकेचे मा.सदस्य, श्री अविनाशजी ठाकरे यांनी प्रश्न उभा केला होता कि, कलम ३१९ प्रमाणे आयुक्तांनी साथरोग प्रतिबंधाच्या कार्यकाळात जे काही काम केले त्यांनी त्याची पुर्ण लेखी नस्ती सभागृहाच्या पटलावर मा.सदस्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे हे करणे त्यांना नियमाने बंधनकारक आहे, ती सफाई संबंधी असो, रुगण कामासंबंधी असो किंवा विकास कामासंबंधी असो ती हॉस्पिटल बांधण्यासाठी असो कि इतर साहित्य खरेदी करण्यासाठी असो जे जे काही आयुक्तांनी दुर्धर रोगाशी नागरिकांच्या बचावासाठी नियोजन केले आहे ती प्रत्येक बाब सभागृहाच्या पटलावर आणणे हे नियम ३१९ प्रमाणे आयुक्तांना बंधनकारक होते आणि आयुक्तांनी ते काम

केले नाही, असा प्रश्न त्या सभागृहात मा.अविनाशजी ठाकरे यांनी उपस्थित केला होता. मा.महापौरजी, मी आपल्या माध्यमातुन मा.ज्येष्ठ नगरसेवकांना सांगु इच्छितो कि, २० जुनला हा प्रश्न आला कारण कि २० अगष्टला जी सभा झाली त्यादिवशी तात्कालीन आयुक्त कार्यरत होते त्यांनी आपला पुर्ण अहवाल सभागृहाच्या पटलावर का सादर केला नाही. त्याचे कारण हे तो नाही कि, आमचे वर्तमान विधायक श्री प्रविण दटके यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता कि, तुम्ही जे काही काम केले आहे ते तुकडे करुन केले आहेत. महानगरपालिकेच्या नियोजित नियमाच्या विरोधात जावून आयुक्त काम करीत आहे, याच्यावर एक चौकशी समिती बसविली पाहिजे, याकरिता आपण एक चौकशी समिती तयार केली आहे. आणि हे सत्य आहे कि, त्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केला आणि महानगरपालिकेच्या पटलावर ती सर्व बाब आणली नाही. काही असा तो नाही ना. मा.महापौरजी, माणुस गेला विषय संपला कारण त्याच्या संदर्भात बोलण्याचे कोणतेही कारण नाही. कारण तो गेला आणि गेल्यानंतर आजपर्यंत तो रिकामाच आहे. आजपर्यंत रिकामाच आहे आणि याच्यात नागपूर महानगरपालिकेचा काहीच दोष नाही. त्याचे अधिकार नागपूर महानगरपालिकेनी हिसकावले नाही, तो रिकामा का आहे, त्याचे आत्मनिरीक्षण त्यांनी करावयास पाहिजे. मा.महापौरजी, तो आपल्यातुन निघुन गेलेला आहे, आपल्यामध्ये राहिलेला नाही, त्याच्यासंदर्भात आपणांस बोलण्याचे कारण काहीच नाही, तो आपला विषय नाही. मी तर अभिनंदन करतो मा.अध्यक्ष, स्थायी समितीचा आणि अभिनंदन यासाठी करतो कि, गुडधेजी सारखा सिनिअर माणुस त्यांचे अभिनंदन करीत आहे आणि हा स्विकृत करीत आहे कि,आमचा विजय कल्पक आहे, तो झलके असून ही झलकण्याच्या भानगडीत राहत नाही. त्यांनी वास्तविक बजेट प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला, नाही तर नागपूर महानगरपालिकेत असे अनेक लोक आहे जे झलकण्याशिवाय काहीच करीत नाही. पण झलकेचा आडनांव झलके असून सुध्दा त्यांनी झलकण्याचा प्रयत्नच केला नाही, केला का नाही केला, त्यांनी वास्तविक बजेट महानगरपालिकेचा सादर केला. त्याचा नांवच विजय आहे. मा.महापौरजी, कोणीही माणुस असो, तो नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा अध्यक्ष बनला तर पेपरमध्ये छापुन येते कि महानगरपालिकेच्या तिजोरीची चाबी अमूक माणसाच्या हातात देण्यांत आली, तो नागपूर नगरीचा कुबेर ठरलेला आहे. आणि त्या कुबेरचे नांव आता प्रफुलजी उच्चारीत करीत आहे काही जुन्या अध्यक्षांचे नांव कि, त्यांच्या प्रभागात विकास कामाकरिता किती रुपये देण्यांत आले आहे, त्यांच्या प्रभागात किती रुपये देण्यांत आले आहे. हे ही उच्चारीत केले कि, नागपूर शहराचे एक व्यक्ति महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले म्हणुन नागपूर शहराला पैसे देणे बंधनकारक होते. चित भी मेरी पट भी मेरी अरे स्थायी समिती अध्यक्ष जहां का है वहां वह पैसे देंगा ही, यअ अपेक्षित क्यों नही है मा.महापौरजी, थाली बजाना है तो दोनो हाथो से बजाना पढेगा और चुटकी बजाना है तो दो उंगलीयो से बजाना पडेगा, इसलिये बोलते समय यह सोंचकर बोलना चाहिये कि, मैं पहले क्या कहु, क्योंकि आपको सुनने वाले लोग भी है, जो आपके मुरीद है जो आपको सुनते है। मा.महापौरजी, हर स्थायी समिती अध्यक्ष चाहता है कि, मेरे कार्यकाल मे मेरे इलाके मे काम होना चाहिये, मेरे इलाके मे काम होना चाहिये, शहर मे काम होना चाहिये यह भी उनके भाव होते है लैकिन अपने इलाके को प्राथमिकता देने की वह कोशिश करता है, बहोत कम लोग होते है जो अपना प्रभाग छोडकर के शहर के बारे मे विचार करते है, मैं किसी के बारे मे कोई टिप्पणी नही करना चाहता लैकिन महानगरपालिका का जब इतिहास लिखा जायेगा तो उस इतिहास मे गुडधेजी के भाषण के वह अंश भी होंगे जिसमे महानगरपालिका के बजट मे से ३४७ लाख रुपयो का जो वितरण किया गया, उस वितरण मे स्थायी समिती का अध्यक्ष ९३ वे नंबर पर था, पहले नंबर पर नही था, यह ऐतिहासिक काम अगर किसी ने किया है तो मेरे स्थायी समिती अध्यक्ष ने किया है इसलिये मैं सब से निवेदन करना चाहता हुं कि, श्री पिंटु झलके के इस ऐतिहासिक कदम के लिये हम तरतरध्वनी से सब झलकेजी का स्वागत करे। कारण यह बात करने के लिये

हिम्मत लगती है, उन्होने हिम्मत की और उस हिम्मत को नोटीफाय करने का काम गुडधेजी ने किया है उन्होने कहां है कि मैं यह बात कॉग्रेस पार्टी की तरफ से कह रहा हुं इसका मतलब कॉंग्रेस पक्ष ने प्रमाणपत्र दिया है कि नागपूर के इतिहास का पहला स्थायी समिती अध्यक्ष जिसने अपने बजट मे नियोजन करते समय अपने को ९३ वे नंबर पर रखा है पहले नंबर पर नही रखा है । सबने इस बात के लिये थालीयॉ बजानी चाहिये। कारण पिंटु झलके जो है वह सचमुच मे हिम्मत वाला व्यक्ती है। कुछ नगरसेवकोने अपने भाषण मे कहां मैं उनका नाम नही लेना चाहता, उनका चेहरा अपने आप सामने आ गया, क्योंकि वह हमेशा कुछ न कुछ दो लाईन चार लाईन पांच लाईन सुनाते रहते है, उन्होने अपने भाषण मे कहां कि, स्थायी समिती अध्यक्ष ने वार्ड फंड ५० लाख रुपये कर देना चाहिये, अच्छी बात है, ५० लाख रुपयो की बात उन्होने कही, मान्यवर यह बजट का उल्लेख करते समय महानगरपालिका ने पिछले वर्ष जो आय की अपेक्षा व्यक्त की थी, उससे कम क्यों है यह बात ज्येष्ठ नगरसेवकोने पुछा, पत्रकारो ने भी पुछा, इस सभागृह के अन्य नगरसेवकोने भी पुछा, मा.महापौरजी, यह जो नियम है निवड उत्तपन्नाच्या दोन प्रतिशत जी आय राहिल उसको वार्ड फंड के रुप मे स्थापित किया जाता है, मैं संबंधित सदस्यो से इस सभागृहाके माध्यम से निवेदन करना चाहता हुं कि, नागपूर महानगरपालिका के सारे के सारे नगरसेवक और अधिकारी मिलकर के यह संकल्प करले कि हम ७००-८०० कोटी रुपयो का आंकडा टॅक्स के माध्यम से उत्पन्न प्राप्त करने की कल्पना करे उस कल्पना के माध्यम से ७००-८०० करोड रुपये सभागृह के समक्ष लाकर के देंगे, मैं उस संबंधित सदस्यसे कहना चाहता हुं कि, जिस दिन उतनी रक्कम प्रार्प्टी टॅक्स से लेकर के हम आजायेगे उस दिन आपका वार्ड फंड अपने आप नियमो के अंतर्गत ५० लक्ष रुपये हो जायेगा इसके लिये आप निश्‍चितरुपसे प्रयास करे, मैं सभी सदस्यो से यह निवेदन करना चाहता हुं कि, इस प्रयास मे हम लोग भी कंधे से कंधा मिलाकर साथ दे, कजिस से अपने क्षेत्र के विकास के कलिये अगर महानगरपालिका की आय मे वृध्दी होती है तो आपके क्षेत्र मे बडे प्रमाण मे विकास काम होंगे, इस दृष्टीसे हम प्रयास करे। मा.महापौरजी, एक सदस्य थे उन्होने कहां कि आपके प्रस्तावित बजट मे आयुक्त के आंकडे से आंकडे कम क्यों है, और पुछा कि, आपने मिटींग लेकर कहा था कि टॅक्स मे छुंट देनी चाहिये, वह छुंट क्यो नही दी, वह छुंट दिखी नही, तुम कत्ल भी करते हो तो चर्चा नही होती, और हम आह भी भरते है तो हो जाते है बदनाम, कोविड-१९ के कारण नागरिको के परिवार की स्थिती का हवाला देकर के नागरिको को रिलिफ देने की बात उनको मुआवजा देने की बात हमारे स्थायी समिती अध्यक्ष ने की है, और अगर कोई रियायत देनी की बात करेगा तो वह बजट बनाते समय यह देखेगा कि, अगर रियायत दे दीजाये तो इंकम कम होनी वाली है और रियत नही दी जाये तो इंकम बढने वाली है, जब रियायत देने के लिये हमारा मन साफ है, इसलिये आंकडे मे साफ प्रलिक्षित हो रहा है कि रियात देने के बाद कम पैसे मिलेगे, ज्यादा नही मिलेगें इसलिये हमने आंकडे भी साफ रखे है, अब आपके समझ् मे आया होंगा कि, रियायत देने के बाद पैसे कम मिलेगें, ज्यादा नही मिलेगे तो आप यह बात कह रहे है हमारी नियत साफ है, इसलिये हमारे आंकडे से हमारे विचार भी मेल खारहे है, इसलिये हम नियत, नियती व आंकडे इन सारी चिजो को सच्चाई के साथ प्रतीपादीत करने के लिये यहां आये है। मा.महापौरजी, स्थायी समिती अध्यक्ष ने एक संतुलित बजट दिया, लोकोपयोगी बजट दिया, आज बजट मंजूर होने के बाद किसी प्रकार के टेंडर करने के पश्चात उसके कार्यादेश करने की स्थिती मे पुर्णरुपसे स्थायी समिती अध्यक्ष का कार्यकाल समाप्त हो सकता है, ऐसी स्थिती है, इसलिये स्थायी समिती ने परिस्थिती का आकलन किया, पिछले एक वर्ष मे जो लोगो के रुके हुऐ काम थे, उन कामो मे वार्ड फंड के भी काम थे, इन कामो मे झोनल फंड के भी काम थे, इन कामो मे फिक्स प्रायरीटी के भी काम थे, कहने मे कोई दोराय नही है कि नगरसेवक उसे स्वयं के अधिकार से अपनी इच्छा के अनुरुप अपने इलामे मे काम प्रलक्षित कर सकते है, फाईल नगरसेवक नही बनाता, वह सूचना करता है, प्रशासनव्दारा फाईल तयार

कर नियोजन करने का प्रयास नगरसेवक करता है, नगरसेवक अपने उप अभियंता के साथ मे साईट पर व्हिजीट के लिये गये, व्हिजीट पर जाने के बाद उस काम की फाईल बनाने के लिये उसने बताया, फिर काम की फाईल बनाई गयी, उसपर प्रोव्हीजन मिल गया, फिर उन कामो के टेंडर होगये, उसकी कॉपी भी उसने अपने क्षेत्र के नागरिको को बतादी, आज कल तो सोशल मिडिया है, लोग उस टेंडर की कॉपी लेकर के नगरसेवक को पुछते है, वर्क आर्डर हो गये, उसके बाद भी मा.सदस्यो के प्रयासो से जिन कामो के कार्यादेश हो गये थे, लोग पुछ रहे थे बाबा रे वह काम का क्या हुआ, लैकिन वह नही हो रहे थे, इसप्रकार से मा.सदस्य जनवरी माह से लेकर आज तक अपमानित हो रहे थे, उनके प्रयासो से कार्यादेश होने के बावजूद भी काम नही हो पा रहे थे, अपने प्रभाग मे विकास काम करने के लिये प्रताडित हो रहे थे। उस अपमान से सारे के सारे नगरसेवको को बचाने के लिये मा.पिंटु झलकेजी ने यह प्रयास किये है, इस बात के लिये मैं उनका विशेष रुपसे अभिनंदन करना चाहता हुं। मैं कहना चाहता हुं कि जिन कामो के टेंडर हो गये कार्यादेश हो गये, और जो कार्य प्रोव्हीजन हो करके टेंडर प्रोसेस मे है, ऐसे सारे कामो को मान्यता देने का काम मा.अध्यक्ष, स्थायी समिती ने किया है, मैं इस बात के लिये उनका विशेष रुपसे अभिनंदन करता हुं। अभिनंदन मैं इसलिये भी करना चाहता हुं कि, महानगरपालिका के माध्यम से महिला कल्याण केंद्र के अंतर्गत समाज मे चलने वाली योजनाऐ शुरु की गयी थी, उस योजना को विरोध करने का कोई कारण नही था, लैकिन केवल और केवल मेरी शर्ट ज्यादा सफेद है, यह दिखाने के लिये कुछ लोग काम करते है यह बताने के लिये उस योजना का विरोध किया गया। नागपूर शहर की एकमात्र महिला सांसद आजादी से लेकर आज तक नागपूर शहर मे एकमात्र महिला सांसद बनी है, उनका नाम अनुसयाबाई काळे था, यह अनुसयाबाई काळे, जनसंघ की नही थी, यह अनुसयाबाई काळे भारतीय जनता पार्टी की नही थी, यह राष्ट्रसेविका समिती की नही थी, यह अनुसयाबाई काळे कॉंग्रेस पार्टी की थी, यह अनुसयाबाई काळे जब नागपूर से सांसद बनी, उस अनुसयाबाई काळे की स्मृती मे नागपूर महानगरपालिका ने एक योजना चालु करी, मा.महापौरजी, जिस समय मैं स्थायी समिती का अध्यक्ष था,तो मैंने सोंचा की राज्य सरकार के तरफ से जो महिला न्यायदान केंद्र बने हुऐ है, लैकिन उसकी संख्या कम होने के कारण महानगरपालका के प्रत्येक झोन मे महिला समुपदेशन केंद्र का संचालन होना चाहिये । मा.महापौरजी, २०१२-१३ से महिला समुपदेशन केंद्र का संचालन होरहा है आज महिला समुपदेशन केंद्र इमानदारी के साथ कार्य कर रहे है, मा.महापौरजी, उन समुपदेशन केंद्रो पर निगाह रखना चाहिये, इसलिये जब श्रीमती लाडे मॅडम समाज कल्याण अधिकारी थी, उन्होने जितने भी केसेस महिला समुपदेशन केंद्र मे आते थे, उन सारे केसेस का व्हेरीफिकेशन किया, यह कही बोगस तो नही है, कागज मे लेखी गयी समस्या और महिलाओ से पुछी गयी बात दोनो व्हेरीफाय की गयी कि, कही गलत जानकारी तो नही दी जारही है, उन सारी समस्योओ से पास हो कर के महिला समुपदेशन केंद्र का काम आगे चलने लगा, उस संदर्भ मे लाडे मॅडम ने बताया कि, महाराष्ट्र सरकार ने भरोसा सेल पोलिस विभाग का शुरु किया है, और उस भरोसा सेल के अधिकारी लाडे मॅडम के कॅबिन मे आये, और कॅबिन मे आकर पुछा कि आपका महिला समुपदेशन केंद्र कैसे काम करता है कि उनके पास आनेवालो की संख्या हमसे १० गुना से भी ज्यादा है, उसकी कई शिकायत नही होती और हमारे भरोसा सेल की शिकायत हो रही है, हमने सब महिला समुपदेशन केंद्र का व्हिजीट करने को उनको कहां । आप कल्पना किजीये कि, राज्य सरकार व्दारा संचालित भरोसा सेल के अधिकारी म.न.पा.के महिला समुपदेशन केंद्र की तारीफ करते है और उसके अनुरुप कार्य करने की कोशिश करते है तो इसका मतलब है कि यही अपने आपमे प्रमाणपत्र है कि, हमारा महिला समुपदेशन केंद्र अच्छे से काम कर रहा है, और १० झोन मे काम करने के लिये राशी कितनी थी, केवल ३५ लाख रुपये इस महानगरपालिका के हजारो करोडो रुपयो के बजट मे केवल ३५ लाख रुपये महिलाओ को न्यायदान देने के लिये रखे गये है तो उसपर भी रोक लगाने का काम किया गया। मैं

अभिनंदन करना चाहुंगा मा.स्थायी समिती अध्यक्ष का विजय भव, आपने इस योजना को आज फिर से चालु करने का निर्णय लिया, इसलिये मैं आपका अभिनंदन करता हुँ, कारण अच्छी बातो को कभी समाप्त नही करना चाहिये, विजय भव। मा.महापौरजी, बेटी बचाओ, बेटी पढाओ के अंतर्गत बेटीयो की हत्या गर्भ मे हो जाती थी, किसी भी बेटी की हत्या गर्भ मे नही होनी चाहिये इसलिये नागपूर महानगरपालिका ने एक योजना बनाई और उस योजना को नागपूर महानगरपालिका ने नाम दिया लाडली लक्ष्मी योजना और एक स्लोगन दिया कि, बेटी अब बोझ नही होंगी, मा.महापौरजी, २०१२-१३ मे इस योजना की शुरुवात की गयी, और उस समय किसी प्रायव्हेट एजंसी के साथ मे मिलकर के भारत सरकार के लाईफ इंशोरेंस कंपनी के साथ मे एक अग्रीमेंट करके इस योजना को नागपूर महानगरपालिका मे लागु किया गया जिस दिन बेटी २१ साल की होंगी उस दिन उस बेटी के हाथ मे १ लाख २४ हजार रुपये मिलेगे इस प्रकार की योजना थी, शासन ने केंद्र सरकारने आय.आर.डी.ए. के माध्यम से निर्णय लिया, आय.आर.डी.ए. के अंतर्गत इस योजना को बंद कर दिया, यह योजना बंद करने के बाद कई परिवार इस लाभ से वंचित हो रहे थे, और यह योजना बेटीयो के लिये थी, यह योजना की ब्युटी यह थी कि, जो बी.पी.एल. की कॅटागिरी मे आते है उसके घर अगर बेटी पैदा हुई तो उसी को इस योजना का लाभ मिलेगा, किसी अन्य को नही । और उसी के घर के बेटी लखपती होंगी इस प्रकार से इस योजना की सुंदरता थी। मा.महापौरजी, आय.आर.डी.ए. ने नियम बदल दिये और यह पॉलिसी बंद हो गयी, मैंने व्यक्तिगत रुपसे तत्कालीन महापौर अनिलजी सोले को पत्र दिया, अनिलजी सोलेने मा.नितीजी गडकरी को पत्र दिया, मा.नितीनजी गडकरी ने मा.प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदी को पत्र दिया, और अरुण जेटलीजी को पत्र दिया, जो उस समय वित्तमंत्री थे और उन्होने आयआरडीऐ को फोन दोबारा २०१५ मे लाडली लक्ष्मी योजना को शुरु करवाई। यांनी इस योजना को चालु करवाने के लिये नागपूर के सांसद और केंद्रीय मंत्री ने मा.प्रधानमंत्रीजी को पत्र लिखा, यह ग्रेव्हेटी इस योजना की है, यह ब्युटी इस योजना की है। और मा.प्रधानमंत्री और मा.तत्कालीन वित्त मंत्री के प्रयासो से नागपूर के केंद्रीय मंत्री ने इस योजना को शुरु करवाया, उस योजना को बंद करने का काम उस काले डंडे ने कर दिया। अरे किसी गरीब के घर मे बेटी पैदा होती है, उसको शासन की योजना के अंतर्गत अगर इंशोरेंस से पैसे मिल रहे है तो इसमे आपका पेट दुखने की कोई आवश्यकता नही थी, मैं अभिनंदन करना चाहता हुँ झलकेजी का विजयजी आप यहां पर भी विजय होगये, और आपने अपने बजट मे लाडली लक्ष्मी योजना के लिये प्रोव्हीजन किया है, यह योजना अब बंद नही होंगी इस प्रकार का विश्वास आपने परिवार की बेटीयो को दिया है । उन बेटीयो के फॉर्म नागपूर महानगरपालिका मे आकर प्रलंबित पडे हुऐ है तात्कालीन आयुक्त ने उन फॉर्म को एक्सेप्ट नही किया था, जिसकी वजह से बेटीयो के अमाउंट को एक्सेप्ट नही किया गया था, उन सारी बेटीयो की ओर से और जो बेटीयाँ अब जन्म लेंगी उन बेटीयो की ओर से मैं आपका बहोत बहोत अभिनंदन करता हुँ। आभार भी व्यक्त करना चाहता हुँ ।मा.महापौरजी, एक बात का मैं और निवेदन करना चाहता हुँ सिकलसेल के विषय को लेकर के बहोत चर्चा होती है, मा.महापौरजी,नागपूर शहर मे सिकलसेल का प्रकोप बहोत बडे प्रमाण मे है, मा.महापौरजी, मैंने इस विषय को लेकर के अध्ययन किया और अध्ययन करने के बाद मुझे यह जानकारी प्राप्त हुई कि सिकलसेल के एक पेशंट के इलाज के लिये भारत सरकार की ओर से करीब करीब पांच लाख रुपयो की राशी का नियोजन ग्रँट के रुप मे मिलता है, मा.महापौरजी, सिकलसेल के एक पेशंट के लिये भारत सरकार की ओर से पांच लाख रुपयो की राशी मिलती है,तो नागपूर महानगरपालिकाने होलिस्टीक अप्रौच के साथ मे मिलकर के स्वयं का सिकलसेल सेंटर क्यों नही शुरु करना चाहिये, नागपूर महानगरपालिका का पांचपावली सुतिकागृह है, हमने वहां एक केअर सेंटर सिकलसेल के पेशंट के लिये खोला हुआ है, अगर उसको होलिस्टीक अप्रौच के साथ मे हम शुरु करते है और सिकलसेल की बिमारी से लडने के लिये अगर

नागपूर महानगरपालिका कदम बढाकर के एक कदम आगे बढाती है तो नागपूर मे कँसर के क्षेत्र मे काम करनेवाले सेंटर इंडिया इंस्टीटीयुट के साथ मे चर्चा करके वहां पर इलाज की व्यवस्था करवाती है और वहां पर ऐसे पेशंट अॅडमिट होते है तो वर्तमान देश के स्वास्थमंत्री श्री हर्ष वर्धनजी ने घोषणा की है कि, सिकलसेल के पेशंट के ट्रांस्फर के इलाज के लिये केंद्र सरकार की तरफ से १० लाख रुपयो की निधी दी जायेगी। मा.महापौरजी, अगर केंद्र की योजना के साथ मे नागपूर महानगरपालिका मिलकर के सिकलसेल के उपचार के लिये अगर प्रयत्न करती है तो हिंग लगे न फिटकरी रंग चोखा का चोखा। मा.महापौरजी, जगह हमारे पास है, बांधकाम हमारे पास है, वहां डेडिकेटेड केअर सेंटर का काम हो रहा है, केवल हम उसकी सुविधा मे वृध्दी करके होलिस्टी अप्रौच वहां पर अपनाले वहां ब्लड बँक से लेकर के प्लॉझ्मा तक सारी व्यवस्था का नियोजन करदे, तो यकिन मानिये कि नागपूर शहर अनेक क्षेत्रो मे देश के लिये दिशादर्शक लेकर के जानेवाला रहा है, इस क्षेत्र मे भी इस योजना को लेकर के नागपूर शहर दिशादर्शक लेकर के जाना वाला साबित होंगा, इसमे किसी भी प्रकार की कोई अतिश्योक्ती नही ह, मैं मा.अध्यक्ष स्थायी समिती से निवेदन करना चाहता हुॅ कि, वह अपने कार्यकाल मे होलिस्टीक अप्रौच के साथ मे सिकलसेल के उच्चाटन के लिये आप प्रयास करे जिससे गरीबो के घर मे होनेवाली इस बिमारी से, इस अनुवांशिक बिमारे से उन्हे मुक्ती मिल सके। और लोग सुख के साथ मे अपना जीवन जी सके, इस प्रकार का प्रचार प्रयास मा.अध्यक्ष स्थायी समिती ने करना चाहिये, यह निवेदन मैं मा.अध्यक्ष, स्थायी समिती से करता हुॅ। एक बात का मैं और निवेदन करना चाहुंगा कि, हमारे महानगरपालिका के माध्यम से नागपूर महानगरपालिका ऐसी महानगरपालिका है जो अग्निशमन प्रशिक्षण केंद्र का संचालन भी करती है, मैं स्थायी समिती अध्यक्ष था मेरी बहोत इच्छा थी कि हमारे बच्चो को बाहर जाकर पढने की आवश्यकता नही पडनी चाहिये, महानगरपालिका ने स्वयं का प्रशिक्षण केंद्र शुरु करना चाहिये, और वह शुरुवात भी महानगरपालिका के वह शहिद कर्मचारी जो अग्निशमन करते समय किसी की जान बचाते समय जो खुद बलिदानी हो गये, ऐसे रमेश ठाकरे और प्रभु कुहिकर के नाम से हमने उस केंद्र का उदघाटन किया। आज जो अग्निशमन प्रशिक्षण केंद्र नागपूर महानगरपालिका की तरु से संचालित हो रहा है, वहां से बच्चे पढकर के जारहे है महाराष्ट्र शासन का डिप्लोमा वहां से मिलता है, और केवल ७० हजार की राशी मे ६ महिने के निवास के साथ मे उनके भोजन के साथ मे, उनको प्रशिक्षित करने का जिम्मेदारी नागपूर ममहानगरपालिका वहन करती है। एक अच्छा उपक्रम महानगरपालिका का चालु है वहां पर स्विमींग पुल बनाने का निर्णय लिया गया और स्विमींग पुल बनाने के लिये इस बजट मे एक १ करोड चालिस लाख रुपयो का नियोजन भी किया गया है, मैं मा.अध्यक्ष, स्थायी समितीने निवेदन करता हुॅ कि, मान्यवर आप उस फाईल को महाराष्ट्र सरकार के क्रिडा व सांस्कृतीक विभाग के पास मे भेजीये, और महाराष्ट्र सरकार के पास से यह फाईल केंद्र सरकार के क्रिडा व सांस्कृतीक विभाग के पास भेजीये, इस प्रकल्प के लिये लगनेवाली राशी केंद्र सरकार दे सकती है, कारण शिक्षण संस्थाओ मे स्विमींग पुल बनाने के लिये १०० प्रतिशत ग्रँट देने का काम नागपूर महानगरपालिका ही नही अगर कोई शैक्षणिक संस्था भी स्विमिंग पुल का निर्माण करती है तो उसको भी शतप्रतिशत ग्रँट देने का काम केंद्र सरकार के मार्फत होता है, अगर हम एक फाईल बनाकर भेजे तो यकिनन तौर पर स्विमिंग पुल बनाने के लिये हम जो १ करोड चालिस लाख रुपये खर्च करनेवाले है उसकी भी बचत हो सकेगी इस इस दृष्टीसे हमने नियोजन करना चाहिये, ऐसा मैं निवेदन करना चाहता हुॅ। मा.महापौरजी, गुडधे ने अपने भाषण मे कहां कि केंद्र सरकार की योजना है, हॉकर्स के लिये आपने क्या किया, हॉकर्स के लिये आपने क्या किया, मैंने मा.अध्यक्ष, स्थायी समिती का भाषण बहोत संजीदगी के साथ मे सुना भाषण के समय बहोत सारे लोग बहोत सारी चर्चा कर रहे थे, उसके बिच मे के एक एक शब्द को मैंने सुना, उन शब्दो मे एक शब्द मा. स्थायी समिती अध्यक्ष ने अपने भाषण मे कहां था कि, अगर हम नागपूर शहर को

स्मार्ट बनारहे है तो नागपूर के हॉकर्स भी स्मार्ट बनने चाहिये l नागपूर शहर को स्मार्ट नियोजित अनुशासित दिशानिर्देशित बनने की जरुरत है, शहरके हॉकर्स को स्मार्ट बनाने का संकल्प आपने लिया है, आप उसकी कल्पना कर रहे है, उसका उदाहरण दे रहे है, अच्छी कल्पना के लिये, उसको साहकार करने के लिये आपका भी बडा इंट्रेस्ट रहता है हॉकर्स को लेकर मेरी व्यक्तिगत मनोभावना हॉकर्स के साथ मे जुडी है, हम दोनो सिनिअर्स नगरसेवक मिलकर के पिंटु झलकेजी की इस कल्पना को साहकार करेगें और हॉकर्स को न्याय दिलवायेगें, उनको बैठाने की व्यवस्था करेगें और स्मार्ट हॉकर्स झोन कैसे बनसकता है इस दृष्टीसे भी हम लोग प्रयास करेगें आपने यह कहना कि इस विषय पर विचार ही नही किया गया यह कही न कही जिस समय मा.अध्यक्ष, स्थायी समिती का भाषण शुरु था, उस समय बाकी लोग जो बात कर रहे थे उस समय आपका ध्यान नही रहा होंगा, नही तो आप बहोत ईमानदारी के साथ मे भाषण सुनते है यह मुझे पता है, आपके ध्यान से वह ओझल हो गया होंगा, कान तक नही होंचा होंगा इसलिये बीच मे कोई व्यक्ती अनवधान न करा करे, ऐसा मैं निवेदन करना चाहता हुॅ कि, सिनिअर नगरसेवक भी कुछ कुछ बात सुनने से छुंट जाता है l मैं एक बात के लिये और स्थायी समिती अध्यक्ष का अभिनंदन करना चाहुंगा, वहअभिनंदन इसलिये करना चाहुंगा कि आनेवाला जो वर्ष है वह वर्ष भारत के इतिहास मे एक नये सोपान को जोडनेवाला वर्ष रहेगा, १५ अगस्त तक २०२१ जिस दिन होंगा, उस दिन से भारत की आजादी की डायमंड जुबली की शुरुवात हो जायेगी, और भारत अपने डायमंड जुबली वर्ष मे जब प्रवेश करेगा, तो भारत की आजादी की डायमंड जुबली की शुरुवात नागपूर महानगरपालिका भारत की सेना को समर्पित एक वंदेमातरम उद्यान के माध्यम से करेगी, यह संकल्पना को ध्यान मे लेकर के मा.स्थायी समिती अध्यक्ष ने अपने बजट मे एक वंदेमातरम उद्यान बनाने का नियोजन किया है, उन्होने उसमे कल्पना भी लिखी है कि, भारत की सेना के वे विर जिन्हे भारत सरकार की ओर से परमवीरचक्र मिला है, वीर चक्र मिला है, महावीर चक्र मिला है, किर्ती चक्र मिला है, अशोक चक्र मिला है, अर्थात भारत की सेना की तरफ से दिये जानेवाले जो पुरस्कार स्वरुप नव चक्र है यह जितने सैनिको को मिले है उन सारे सैनिको का मुखवटा म्युरल के रुप मे उस उद्यान मे लगेगा, और उसके निचे उस सैनिक के जीवन की कहानी भी होंगी कि उसे किस कारण से यह सम्मान मिला है l यह जो हमारे देश के सैनिक है, जो देश की खातीर सीमा पर रात् रातभर जागते है जो मायनस ३० टॅम्पेरेचर मे अपनी जिंदगी गुजारते है, और हम रजाई ओढकर घर मे सोते है, जो ५६ डिग्री तापमान मे रेतीले रेगीस्तान मे अपनी जिंदगी गुजारते है, और हम अपने घर मे ए.सी के कमरे मे शान से सोते है, उन वीर सैनिको ने जिन्होने आजादी से लेकर के इन ७५ वर्षो मे अपने प्राण अर्पण करके भारत माता की लाज बचाई है, उनकी स्मृती को चिरंतन रख करके आनेवाला पिढी तक उनके चेहरे और उनकी कारगुजारी पहोंचनी चाहिये, उनके कारनामे उनकी कीर्ती सबको मालुम होना चाहिये उस दृष्टीको स्थापित करने का एक ऐतिहासिक निर्णय मा.अध्यक्ष, स्थायी समिती ने लिया है l मा.महापौरजी, उस उद्यान मे केवल म्युरल नही रहेगें उसके निचे उनका इतिहास भी रहेगा इतिहास के साथ साथ आधे घंटे की कॉमेंट्री भी है कि, बच्चे बैठकर वहां पर इन सारी चिजो को सुने, और कोई भेदभाव नही, थलसेना भी है, जलसेना भी है, वायु सेना भी है और अंत मे आव्हान भी है इनके कार्य को देखते हुऐ क्या हम सेना मे भरती होकर के अपने देश के लिये अपने प्राणो का बलिदान नही दे सकते, आनेवाली पिढी को सेना मे भरती होने के लिये उत्साहित करने के लिये यह निर्णय लिया जारहा है,आज जो जमिन एम्प्रेस मिल के माध्यम से महानगरपालिका को मिली है, शहर के बिच मे छोंटा मोठा जंगल जैसा परिसर बना हुआ है, उस जंगल जैसे परिसर का उपयोग नागपूर शहर के वे नवजवान जो सेना मे भरती होना चाहते है उन्हे हर्डल के प्रशिक्षण के रुप मे पूर्व सैनिको के माध्यम से सैन्य प्रशिक्षण देना और बच्चो को सेना मे जाने के लिये अभिप्रेरीत करना इस भावना के साथ वहां पर नियोजन किया जारहा है l मा.महापौरजी, मैं आपके सामने स्थापित करना चाहुंगा कि,

पिछले साल नागपूर महानगरपालिका के दुर्गा नगर विद्यालय मे पूर्व सैनिको के माध्यम से हमने बच्चो के लिये एक कॅम्प का आयोजन किया, और एक महिने के कॅम्प मे पूर्व सैनिको ने नागपूर महानगरपालिका के बच्चो को इतना प्रशिक्षित किया कि एक वर्ष मे नागपूर महानगरपालिका के छे बच्चे सेना मे जाकर के भरती हो गये, मा.महापौरजी, अगर यह प्रकल्प पूर्व सैनिको के माध्यम से चलता रहा तो मैं यकिनन आपको बताना चाहता हुॅं कि, जितने भी हर्डल्स के खेल होते है, यह सारे के सारे ॲडव्हेंचर से भरे हुऐ होते है और आजकी जो नौजवान पिढी है, उन्हे ॲडव्हेंचर चाहिये और उन्हे यह ॲडव्हेंचर खेल के रुप मे लि गया तो बाकी जगह वह भटकने से बच जायेगा और वह अपनी जवानी को इस ॲडव्हेंचर मे बितायेगा, और वह देश की सेना मे भरती का मनस लेकर के वहां से निकलेगा ऐसे एक अनुपम उपक्रम के लिये मैं मा.अध्यक्ष, स्थायी समिती का बहोत बहोत अभिनंदन करना चाहता हुॅं, केवल मैं मा.अध्यक्ष स्थायी समिती से निवेदन करना चाहता हुॅं कि,अगले वर्ष देश की आजादी की डायमंड जुबली होंगी, उसके पूर्व इसका उदघाटन किस प्रकार से हो सकता है, इसलिये आप नियोजन करे । मा.महापौरजी, केवल सैनिक नही इसके साथ साथ नागपूर जिल्हे मे जितने रणबाकुरो ने इस देश की आजादी के लिये अपने प्राण सर्व किये वह सारे शहिदो के नाम भी वहां लिखे जायेगें, देश आजाद हुआ तो केवल दो सेनाऐ बनी थी, देश की आजादी के लिये एक सेना का नाम था आजाद हिंद सेना था और दुसरी सेना का नाम हिंदुस्तानी लालसेना था, मा.महापौरजी, लाला सेना का इतिहास भी वहां पर लिखा जायेगा, ऐसा भी वहां नियोजन किया जारहा है कारण लोगो को पता तो चले कि, देश को आजाद कराने मे लिये नागपूर मे भी एक सेना बनी थी । और उस सेना का जो सेनापती था, उसने सेना नागपूर मे बनायी था लेकिन होशंगाबाद तक सेना का विस्तार किया था, उसने नागपूर के कलेक्टर को तीन दिन तक बंदी बनाकर रखा था और अंग्रेज तीन दिन तक अपने कलेक्टर को मुक्त नही करवासके, यह इतिहास नागपूर शहर की जनता को मालुम होना चाहिये, यह सब वहां लिखा जायेगा । अतीत को देखो, वर्तमान को समझो, भविष्य अपने आप संवरजायेगा, हम अतीत दिखायेगे, अतीत हमारा आईना है, अतीत को देखोगें तो वर्तमान दिखेगा, भविष्य समझेगा । लोग जब आईने मे अपने आप को देखने की कोशिश करेगें और जब अच्छा बनने की कोशिश करेगे तो और भारत का भविष्य अपने आप अच्छा हो जायेगा, नवजवानो को एक अच्छी दिशा मे प्रेरीत करने के लिये भाई पिंटु झलकेजी ने यह बजट रखा है, मैं मा.अध्यक्ष, स्थायी समिती का अभिनंदन करना चाहता हुॅं कि, मा.अध्यक्ष, स्थायी समिती एक गणित उद्यान का निर्माण करना चाहते है, यह बहोत अच्छा प्रकल्प है,खेल खेल मे गणित सीखने की बात है, इस देश मे भारत के पूर्व प्रधानमंत्री जिस समय उन्होने नागपूर मे उद्यान बनाया, उस समय वह देश के रक्षामंत्री थे, आदरणीय पी.व्ही.नरसिंहारावजी उन्होने अपने कार्यकाल मे रमण विज्ञान केंद्र के नाम से एक विज्ञान सेंटर बनाया है, जहां खेल खेल मे विज्ञान समझया जाता है और खेल खेल मे विज्ञान सीखा जाता है, उसी प्रकार से गणित के सूत्रो को भी खेल के माध्यम से स्थापित करने के लिये गणित जैसे ऐसे विषय को जिसको लोग कलिष्ट समझते है, खेल के माध्यम से गणित के विषय को समझाने का प्रयास मा.अध्यक्ष स्थायी समिती कर रहे है । मा.महापौरजी, मैं आपसे और मा.सभापती, स्थायी समिती इनसे क्षमा चाहते हुऐ निवेदन करना चाहता हुॅं कि, यह मेरा अधिकार नही है परंतु मुझे ऐसा लगता है कि भारत के सर्वश्रेष्ठ गणिततज्ञ रामानुजन के नाम से यह गणित उद्यान बनना चाहिये, इस बात को स्थायी समिती अध्यक्ष स्विकृत करेगें, ऐसी मुझे आशा है ।मा.महापौरजी, समय के पाबंदी है और मा.अध्यक्ष,स्थायी समिती के दिये गये बजट पर सभी ने सकारात्मक रुपसे सारी बाते कही है, बहोत कम इस बजट पर विरोध के सुर आये है, जिस बजट पर विरोध के सुर कम आये है वह अच्छा बजट है, ऐसा कहा जाता है, नाममात्र विरोध भाई विजय झलकेजी के बजट का हुआ है, यह बहोत अच्छी बात है, एक सदस्य ने अपने भाषण मे कहां कि सदस्यो को प्रतिपादित किया गया है, इसके पहले के बजट क्या काल्पनिक थे क्या ? उनका

कहना लाजमी है, यह हकिकत है, बजट देते समय बजट के अनुरुप लिमिटेड समय होता है, लैकिन स्थायी समिती अध्यक्ष के बजट पर न बोलते हुऐ इस देश की आर्थिक स्थिती के उलाढाल केंद्र सरकार के विषयो पर नोटबंदी से लेकर के अभी तक ताला बंदी तक उन सारे विषयो पर उन्होने भाषण किया है मैं केंद्र सरकार के विषयो पर भाषण नही करना चाहता, और केंद्र सरकार के विषयो पर बोल करके मैं अपने आप को बुध्दीमान भी सिध्द नही करना चाहता, मैं केवल इतना कहना चाहता हुँ कि पुरे विश्व की जो आर्थिक स्थिती है, उस आर्थिक स्थिती के अनुरुप आनेवाले समय तमे हम लोग कोई उंची छलांग नही लगा सकते, इस हकिकत को स्विकृत करके और व्यक्तिगत स्वार्थ को बाजु मे रखते हुऐ मैंने बताया कि यह मैं नही कह रहा हुं गुडधेजी कह रहे है कि ३४७ करोड की यादी मे हमारे स्थायी समिती के अध्यक्ष का नाम ९३ वे नंबर पर है।

श्री प्रफुल्ल गुडधे :- पाईंट ऑफ इंफार्मेशन, १३९ वे नंबरवर आहे आणि हे मागच्यावर्षीच्या मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांनी दिलेल्या प्रावधानाच्या अनुरुप मी सांगीतलेले आहे.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मैं स्थायी समिती अध्यक्ष का अभिनंदन करना चाहता हुं कि, मा.स्थायी समिती के अध्यक्ष के इस बजट को सभी लोग सर्वानुमती के साथ मे पारीत करे, एक बात का मैं यहां पर उल्लेख करना चाहता हुँ कि, मा. स्थायी समिती अध्यक्ष ने अपने बजट के प्रथम पृष्ठ पर पोलिस प्रशासन उसके साथ साथ हॉस्पिटल के कर्मचारी, इन सारे लोगो ने मिलकर जो कार्य किया है, उन सारे लोगो के काम को सम्मानित करने के लिये अपने बजट के फ्रंट पेज पर उन्होने इन सासरी चिजो को स्थापित करने की कोशिश की है । नागपूर महानगरपालिका के स्वास्थ कर्मी, नागपूर महानगरपालिका के फायलेरीया के कर्मचारी, नागपूर महानगरपालिका के डॉक्टर्स, नागपूर महानगरपालिका के आशा वर्कर कर्मचारी, नागपूर महानगरपालिका के केवल आशा वर्कर कर्मचारी नही इसके अलावा पोलिस विभाग कारण नागपूर महानगरपालिका ने लॉकडाउन की घोषणा कर दी थी, लाकडाउन की घोषणा होने के बाद उस लॉकडाउन को सफल बनाने के लिये २४ घंटे अहोरात्र परिक्षम पोलिस विभाग ने किया, इसलिये मैं पोलिस विभाग का विशेष रुप से अभिनंदन करना चाहता हुँ, इसके साथ साथ मैं अभिनंदन करना चाहता हुँ, हमारे पूर्व आयुक्त अभिजीत बांगर जी का कि हमारे यहां जो अप्रवासी मजदुर थे, उन अप्रवासी मजदुरो को वापस भेजने के लिये उनके विसावा के लिये, उनके रुकने के लिये उनके रोटी के लिये इन सारी चिजो का नियोजन हमारे कमिशनरेट के माध्यम से बांगरजी के नेतृत्व मे हुआ इस बात के लिये मैं उनका अभिनंदन करना चाहता हुं। मा.जिल्हाधिकारी महोदय जिनके नेतृत्व मे यंत्रणा का संचालन होता है, इस कोविड के अंतर्गत शहर उससे अछुता था, उन्होने इस दौरान रॅशनींग डिस्ट्रीब्युशन से लेकर सारी चिजो का ठिक से नियोजन किया, इसलिये उनका भी मैं विशेष रुपसे अभिनंदन करना चाहता हुँ, इन सारे अभिनंदन के साथ मे एक बात का मैं और उल्लेख करना चाहता हुँ कि, मा.तात्कालीन मैं उनका नाम नही लेना चाहता हुँ महामहिम ने नागपूर शहर के विकास के जितने कामो को अल्पविराम लगा दिया था उस अल्पविराम को हटाकर के, उस सेंटेंस को पुरा करने की दृष्टी से मा.वर्तमान स्थायी समिती अध्यक्ष ने एक अलग से परिशिष्ट स्थापित करके उन कामो को मंजूरी प्रदान की है, और पुराज्यादा से ज्यादा निधी का नियोजन उन कामो के लिये किया है इस बात के लिये मैं उनका अभिनंदन करना चाहता हुँ। मैं एक बात का और अभिनंदन करना चाहता हुँ, मैं स्थायी समिती का अध्यक्ष था, मेरी इच्छा थी कि इस वर्ष स्वामी विवेकानंदजी की १५० वी जयंती है, और स्वामी विवेकानंदजी का स्मारक नागपूर शहर मे बने, स्वामी विवेकानंदजी का स्मारक नागपूर शहर मे बना और वह आप सबके सहयोग से बना मैं ईश्वर का धन्यववाद व्यक्त करता हुँ कि आप सभी के सहयोग के कारण मैं स्थायी समिती

का अध्यक्ष बना, और आपके सहयोग के कारण स्थायी समिती के अध्यक्ष बनने के बाद उस कल्पना को सहकार करने के लिये महानगरपालिका की निधी से उस स्मारक का निर्माण कर सका। इस वर्ष स्वामी विवेकानंदजी की तपस्ली कन्याकुमारी मे जहां पर स्वामीविवेकानंदजी ने काशमीर से कन्याकुमारी पैदल यात्रा करने के बाद जिस शीला पर बैठकर तपस्या की थी और जिस शिला पर बैठने के बाद स्वामी विवेकानंदनजी ने कशमीर से लेकर के कन्याकुमारी तक भारत की तात्कालीन गती को अपनी आँखो के सामने लाया था, और अविराम गती से रोते रोते उन्होने देश की जनता से एक आवहान किया था, आव्हान यही था कि आने वाले १० वर्षो के लिये भगवारन के मंदिर मे जाना बंद करदो इसलिये बंद कर दो की, दरिद्रय देव भव, दुखी देव भव, दिन देव भव, दरिद्रय की सेवा करो, दुखी की सेवा करो, दीन की सेवा करो, सहयोग देखीये फिर वही दिन आया, कोरोना की साथ उसके लिये जिम्मेदार थी, मंदिर बंद थे, और हम सेवा दिन की कर रहे थे, हम सेवा दरिद्रय की कर रहे थे, हम सेवा दुखीयो की कर रहे थे, हमारे स्थायी समिती अध्यक्ष ने अपने भाषण मे लिखा है कि, एकमेकाला हात धरु अवघे धरु सोपण, यही बाते स्थायी समिती अध्यक्ष ने अपने भाषण मे कही है, मैं कहना चाहता हुॅ मा.महापौरजी एक अच्छी वृत्ती के साथ मे उन्होने बजट दिया है, जिस शिला पर स्वामी विवेकानंदजी बैठे थे, वही उनका स्मारक बना, आज उस स्मारक को ५० वर्ष पुर्ण हो गये है, उसके गोल्डन जुबली का उल्लेख इस बजट मे करते हुऐ मा. अध्यक्ष, स्थायी समिती ने एक अच्छा बजट दिया है, मैं स्थायी समिती अध्यक्ष को एक अच्छे बजट के लिये एक सर्वसमावेशक बजट के लिये सभी साथीयो को खुश रखने के लिये जो बजट इस शहर के विकास के समायोजन की दृष्टीसे मा.स्थायी समिती अध्यक्ष ने दिया है है, इस बात के लिये मैं उनका अभिनंदन करना चाहता हुॅ,और इस बजट को आप सर्वानुमतसे पारीत करे। ऐसा मैं निवेदन करना चाहता हुॅ।

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.स्थायी समिती अध्यक्ष, मा.सर्व पक्षाचे नेते, मा.नगरसेवक, मा.पत्रकार बंधु, मिडीयाचे सर्व प्रतिनिधी आणि बंधुनों नागपूर महानगरपालिकेच्या या बजेटमध्ये अध्यक्ष स्थायी समिती श्री.विजयजी झलके यांनी हा बजेट या ठिकाणी सादर केलेला आहे. नागपूर शहरामध्ये आणि या देशमध्ये गेल्या ६ महिन्यापासून कोव्हीडची जी समस्या निर्माण झाली होती आणि या संबंधामध्ये नागपूर शहराचे सर्व मा.महापौरजी, मा.शहराचे सर्व पदाधिकारी, आयुक्त, सर्व नगरसेवक सर्वांनी कोव्हीडच्या परिस्थितीमध्ये ६ महिने पर्यत सातत्याने सेवा करण्याची जी संधी मिळाली आणि यामध्ये नागपूर शहरातील मेडीकल, मेयोचे आणि सर्व हॉस्पीटलमधील डॉक्टर्स, नसेर्स आणि कर्मचा-यांनी व महानगरपालिकेच्या सर्व कर्मचा-यांनी त्या ठिकाणी जी सेवा कोव्हीडच्या संदर्भात केली. पोलीस विभागाने मोठया प्रमाणामध्ये कोव्हीडमध्ये सहकार्य केले त्या सर्व लोकांचे मी कॉग्रेस पक्षातर्फे विरोधी पक्ष नेता म्हणुन मी त्यांचे मनापासून स्वागत करतो. मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, मा.गृहमंत्री अनिलजी देशमुख सुनिलजी केदार, या ठिकाणी कोव्हीड समस्येवर मात करण्याच्या दृष्टीकोणातून शासनाने जे सहकार्य केले आणि ऐवढेच नव्हेतर तर त्यांनी जी.एस.टी. ची थांबलेली जी ग्रॅट आहे ती देण्यासाठी त्यांनी सहकार्य केले म्हणुन मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. मा.मुख्यमंत्री यांचे याच्यासाठी मी अभिनंदन करतो की मा.मुख्यमंत्र्यांनी चांगला आयुक्त दिल्यामुळे पिंटुजी झलके यांना या ठिकाणी बजेट बनविण्याची संधी प्राप्त झाली आणि त्याच्यामध्ये पिंटुजी झलके यांनी जो बजेट या ठिकाणी सादर केला आहे त्यामध्ये ८० टक्के भारतीय जनता पक्षांच्या लोकांचे बजेट आहे असे म्हणायला हरकत नाही. कारण ज्या ठिकाणी आकडेवारी त्यांनी वाचुन दाखविली त्या आकडेवारीमध्ये संपुर्ण आकडे जर आपण पाहिले आणि प्र फुल्लजी यांनी आकडयांचे वर्णनही केलं आणि त्या आकडयामध्ये संपुर्ण भारतीय जनता पक्षाच्या लोकांचे ८० टक्के कामे टेन्डरमध्ये आलले

आहे. माझी आपल्याला विनंती आहे की सर्व समावेशक बजेट असला पाहिजे. सर्व पक्षाच्या नगरसेवकांचे ज्या ज्या नगरसेवकांचे कामे सुटले असतील, ज्या ज्या लोकांचे कामे राहिले असतील कारण हे प्रत्येक नगरसेवक लोकांमधुन निवडुण येतो आणि त्यांच्याकडुन नागरिकांना अपेक्षा आहे म्हणुन आपण या सर्व नगरसेवकांच्या सूचना लिखीत रुपाने घेऊन या बजेटमध्ये या ठिकाणी समावेश करावा. आपण वंदे मातरम उद्यानाची निर्मीती केली, धन्यवाद. चांगले काम आहे परंतु पुर्व नागपूर मध्ये भांडेवाडी भागामध्ये जे डम्पींग स्टेशन आहे त्या डंम्पींग यार्डमध्ये २२ एकर जागा आहे आणि त्या २२ एकर जागेमध्ये पुर्व नागपूर हे फार सुंदर बनविण्याची कल्पना ही आमदार खोपडे यांची आहे पण ते करु शकले नाही त्या ठिकाणी त्यांचे अध्यक्ष स्थायी समिती होते. दोन –दोन सभापती त्या ठिकाणी आहे. ते सुध्दा तिस-यांदा आमदार आहे. पण पुर्व नागपूर मध्ये एखादा मोठा दवाखाना, पुर्व नागपूर मध्ये एखादी मोठी बगीच्याची कल्पना, त्या ठिकाणी स्मारके, त्या ठिकाणी संत तुकाराम महाराजांच्या नावानी, संत जगनाडे महाराजांच्या नावानी किंवा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावांनी किंवा महाराणा प्रतापांच्या नावानी त्यांनी एकही अशी कोणतीही योजना पुर्व नागपूर मध्ये त्या ठिकाणी केलेली नाही म्हणुन आपण भांडेवाडीच्या २२ एकर जागेमध्ये सातत्याने आपण एक मोठा प्रकल्प आपण बजेटमध्ये तरतुद करावा, एक मोठे स्मारक त्या ठिकाणी तयार करावे. आपण आतापर्यत परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी बजेटमध्ये निधी ठेवला पण आजपर्यत ते स्मारक पुर्ण झाले नाही. संत तुकाराम महाराजांच्या नावानी आपण त्या ठिकाणी चौकाला नामकरण केले पण त्या ठिकाणी आपण संत तुकाराम महाराजांचे स्मारक बनवु शकलो नाही. संत जगनाडे महाराजांच्या स्मारकासाठी जागा मिळाली परंतु त्या ठिकाणी स्मारकाचे काम पुर्ण होऊ शकले नाही. आपण अनेक ठिकाणी लोकांची मागणी आहे. आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे व्हेरायटी चौकामध्ये जो पुतळा आहे त्या पुतळयामध्ये गेल्यानंतर महात्मा गांधी यांचा पुतळा आहे कि काय आहे अशा प्रकारची अवस्था त्या ठिकाणी कचरा, अस्वच्छता, त्याचप्रमाणे राजीव गांधीच्या पुतळयासमोर अस्वच्छता आहे. चितारा ओळीच्या गांधी पुतळा तुटलेला आहे. या ठिकाणी जेवढेही महानुभावांचे पुतळे असतील त्या सर्व पुतळयांचे सौदर्यीकरण करण्यासाठी आपण निधी ठेवावा. या नागपूर शहरामध्ये अनेक पुतळयांचे सौदर्यीकरण व्हावे या शहरामध्ये जे महानुभावाचे पुतळे आहे त्यांची व्यवस्था व्हावी. या ठिकाणी फायर ब्रिगेड सारखा मोठा विभाग आहे. फायर विभागामध्ये अनेक कर्मचारी लागतात. परंतु फायर विभागामध्ये नविन कर्मचा-यांच्या भरतीची अत्यंत आवश्यकता आहे परंतु अजुन पर्यत तो विषय पुर्ण झालेला नाही. मी आमदार कृष्णाभाऊंना विनंती केली होती की भांडेवाडी मध्ये ५०० मिटरच्या डंम्पींग स्टेशन संपलेले आहे त्या ठिकाणी बायोमायनिंग चे प्रोजेक्ट सुरु करतो परंतु त्या ठिकाणी लोकांच्या घरांचे नकाशे मंजूर होत नाही म्हणुन आपण ५०० ऐवजी ३०० फुट जागा.

श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मागच्या सरकारमध्ये कृष्णाभाऊंनी ५०० मिटर वरुन ३०० मिटर केलं आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, ५०० मिटर वरुन ३०० मिटर केलेले आहे परंतु आता जी राहिलेली २०० मिटरची जी जागा आहे ती जर मुक्त केल तर त्या संदर्भात मी निरीमध्ये संपर्क केला आहे. या संदर्भात मी अनेकदा सभागृहाला माहिती दिली आहे.

श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मी आपणांस सांगु इच्छितो की भांडेवाडीच्या डम्पींग यार्डच्या भिंतीला लागेपर्यत लोकांचे घरे वसलेले आहे आणि हे सर्व अनधिकृत लेआऊट असल्यामुळे

तेथे दुसरा प्रोजेक्ट करणे मला योग्य वाटत नाही.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी जे अतिक्रमीत घरे वसलेले आहे त्यांना तोडण्याचे आपण आदेश देता काय ? भांडेवाडीमध्ये एखादा प्रोजेक्ट तयार करावा ही माझी मागणी आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्ष नेते यांनी टिकाटिपन्नी करावी, परंतु मा.कृष्णाभाऊ खोपडे सारखा कर्तव्यदक्ष आमदार ज्यांनी त्या पुर्व नागपूरला फक्त कचरा डंम्पींग यार्ड नावानी ओळखल्या जायचे तेथे अनेक प्रकल्प सुरु केले आहे. त्यामुळे काकांनी मागणी करावी. हा प्रकल्प करावा, तो प्रकल्प करावा.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मा.प्रविणजी, त्या ठिकाणी जाणारा रस्ता किती खराब आहे. त्या ठिकाणाहुन मानुस जाऊ शकत नाही. या ठिकाणी तुम्ही डेव्हलपमेंटच्या गोष्टी करता.

श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, माजी पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी मागच्या वर्षी त्या रस्त्यासाठी मागच्या सरकारकडुन पैसे सॅग्शन केले होते परंतु हे सरकार गेल्यावर मात्र ते पैसे या सरकारने डिपीडीसी मध्ये घेतले नाही म्हणुन तो रस्ता राहिलेला आहे. (बेल)

महापौर :- (बेल) मा.विरोधी पक्ष नेते आपण कृपया तेवढा उल्लेख सोडून भाषण करावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण होऊ दया, त्यांनी कोणता उल्लेख करावा आणि कोणता करु नये हा त्यांचा अधिकार आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, प्रफुल्लजींनी सुध्दा भाषण केले आम्ही कोणाच्या टिकाटिपन्नीला घाबरत नाही. तो सिमेंट रस्ता होऊ शकत नाही या संदर्भात टेक्नीकल अडचणी मा.आयुक्त आणि मुख्य अभियंता यांनी सांगितल्या. (बेल)

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, ३०० मिटर अंतर कमी करुन तेथे जे २०० मिटर अंतर राहिले आहे त्यामुळे ते अंतर कमी करुन तेथे राहणा-या लोकांना न्याय देण्याच्या दृष्टीने काम करावे. त्या ठिकाणी २२ एकरची जी जागा खाली होणार आहे त्या ठिकाणी १ मोठे स्मारक संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाज महाराजांच्या नावानी करा, जगनाडे महाराजांच्या नावानी करा, परंतु त्या ठिकाणी एक मोठे उद्यान व स्मारक करावे किंवा एक मोठे हॉस्पीटल त्या ठिकाणी करावे, गाडगे महाराजांचे स्मारक करावे, तुकडोजी महाराजांचे स्मारक करावे, मा.महापौरजी आम्ही कोणाच्या भाषणामध्ये कोणाला डिस्टर्ब केले नाही. नाही तर आम्ही हेच काम करु जो बोलत असेल त्यांच्या मधात पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन घ्यायचे किंवा पॉइंट ऑफ ऑर्डर घ्यायचे. मा.महापौरजी या बजेटमध्ये इनकमच्या दृष्टीने कुठलाही उल्लेख नाही. मी आपल्याला गेल्या ३ वर्षापासून बाजार विभागाच्या संबंधामध्ये याच्या पुर्वीच्या महापौर नंदाताईंना, या पुर्वीचे आयुक्त मुदगल साहेब आयुक्त होते तेव्हापासुन मी सातत्याने पाठपुरवठा करीत आहे. परंतु कुठल्याही बाजाराच्या संबंधी एक पॉलीसी तयार केली नाही. आठवडी बाजारामध्ये चौकाचौकामध्ये रात्री जे लोक बसतात जरीपटका तसेच इतर ठिकाणी ७ दिवसापर्यंत जे बाजार भरतात वेगवगळया ठिकाणी त्यामध्ये जवळपास ४०० ते ५०० कोटी रुपये आपले इनकम महानगरपालिकेला येऊ शकत, आपण कोणाच्या भरवश्यावर डिपेंड राहण्याची गरज नाही. परंतु असे

असतांना मार्केट विभागाने कुठल्याही प्रकारची योजना या ठिकाणी केलेल्या नाही. अध्यक्ष स्थायी समिती पिंटुजी झलके आहे त्यांच्याकडुन मला अपेक्षा आहे.  आपण कमीत कमी इनकम वाढविण्याच्या दृष्टीने मार्केट विभागाचा विशेष प्लॅन तयार करावा. बुधवार बाजारामध्ये आता सतिश होले यांनी सांगितले की भ्रष्टाचार झालेला आहे. त्या बुधवार बाजाराच्या मार्केटच्या संबंधामध्ये अजुन पर्यत कुठलीही योजना तयार करण्यात आलेली नाही. अनेकदा आपण निरीक्षण केलं अनेक ठिकाणी गेलो पण उत्पनाचे साधणे निर्माण करण्याची योजना गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित आहे. या ठिकाणी टॅक्स विभागामध्ये सुध्दा माझी मा.महापौरजी आपल्याला विनंती आहे की जे लोक टॅक्स विभागामध्ये अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी आहे. अनेक वर्षपासून जे लोक बसलेले आहे ज्यांच्या मुळे नागपूर महानगरपालिका ही भारतातील पहिली महानगरपालिका आहे की ज्या ठिकाणी टॅक्स लावायला पैसे दयावे लागतात. की बाबा रे माझ्या घराला टॅक्स लावं, असेसमेंट कर, त्या  विभागाचा कर्मचारी मुकाटयाने पाहत असतो, त्या विभागाचा प्रमुख पाहत असतो. परंतु कुठलाही निर्णय आपण घेतलेला नाही. एक अधिकारी किती दिवस त्याच पदावर राहणार आहे. कालच वर्तमानपत्रामध्ये आम्ही पाहले की धर्मपाल मेश्रामजी यांनी  एक व्यक्ती रिटायर्ड होईपर्यत एकाच पदावर राहिला पाहिजे अशाप्रकारचा कायदा मा.महापौरजी आपण तयार करावा. त्या व्यक्तीने काहीही केलं तरी त्या व्यक्तीला त्या ठिकाणाहुन त्याला स्थानांतरीत करण्यात येऊ नये. खालचा जो कर्मचारी असतो त्याची बिचा-याची ५० ठिकाणी बदली होते. परंतु जो व्यक्ती मोठया पदावर आहे त्याची बदली होत नाही आपल्या मा ध्यमातून आयुक्तांनी माझी विनंती आहे. एक चांगले आयुक्त या ठिकाणी आले आहे. सर्वांना सांभाळुन घेणारे व्यक्तीमत्व म्हणुन मा.आयुक्तांची ख्याती आहे. जे अधिकारी ३ वर्षापेक्षा एका ठिकाणी असतील अशा अधिका-यांची पाठराखन करु नये. अशा अधिका-यांना ताबडतोब त्या ठिकाणाहुन हलवावे, नविन लोकांना संधी दयावी, कारण नविन लोक भरपुर आलेले आहे आणि दोन वर्षानंतर सर्व लोक रिटायर्ड होणार आहे. ते रिटायर्ड झाल्यानंतर त्यांची काम करण्याची परिस्थिती नाही. जे मोठ विभाग आहे नगररनचना विभाग, नगररचना विभागाच्या संबंधामध्ये मी आपल्याला रायटिंग मध्ये पत्र दिलेले आहे. अनुभवहिन असलेल्या लोकांना त्या ठिकाणी आणुन बसविलेले आहे. आणि नगररचना विभागामध्ये उत्पन्न संपले आहे. नगररचना विभागामध्ये आपण ऑनलाईन आणि ऑफलाईन जे आपण डॉक्युमेंट सबमिट करीत होतो ते सर्व बंद झाले आहे त्याबाबत मी आपल्याला पत्र दिले आहे मा.आयुक्तांना पत्र दिले आहे. माझी या माध्यमातून विनंती आहे की उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने टॅक्स विभाग, नगररचना विभाग, बाजार विभाग हे तीन महत्वाचे विभाग आहे. टॅक्स विभागामध्ये ज्या ठिकाणी असेसमेंट नविन घरांचे झालेले नाही. जस माझं घर आहे आणि  मी एक मजली घरांचे बांधकाम केलेले आहे नंतर मी तीन मजले बांधले परंतु माझ्या घरावर टॅक्स लावण्यात आलेला नाही अशा प्रकारचे जे घरे असतील त्यांची ताबडतोब स्पेशल आणि आपण जे टॅक्स एजन्सीला जे काम दिलेले आहे ते अतिशय बोगस एजन्सी आहे. जे एकमजली घर आहे त्याला तीन ते चार मजली दाखवून त्यामुळे आपले इनकम कमी झालेले आहे. म्हणुन ती जी एजन्सी आहे त्याचा कंत्राट रद्य करण्यात यावा आणि आपण नव्याने असेसमेंट करुन ४०० ते ५०० करोड रुपये उत्पन्न आणु शकतो. आपण माझ्या सोबत चला मी आपल्याला ऐरिया दाखवितो कुठे असेसमेंट झालेले नाही. कुठे नविन घरे बनलेले आहे परंतु याकडे टॅक्स विभागाचे मुळीच लक्ष नाही. कारण जो व्यक्ती त्या ठिकाणी बसला आहे तो आपला जावाई आहे. आणि आपण जावायाला कसे हलवु शकतो. कारण जावाई हालला तर आमची पार्टी हालुन जाईल आणि अशाप्रकारचे जे वातावरण नागपूर महानगरपालिकेमध्ये जे सुरु आहे म्हणुन इनकम आपल्यापासून लपलेले आहे. इनकमच नाही तर स्वबळावर करण्याची आपली काही मानसिकता नाही. नागपूर शहरामध्ये आपण २४ तास पाणी देऊ आणि हे शहर टॅकरमुक्त करु असे भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी जाहिरनाम्यामध्ये

सांगितले होते परंतु २४ बाय ७ ची योजना अजुनपर्यत अंमलात आलेली नाही. ज्या ठिकाणी ४२ टाक्या बनायला पाहिजे त्या ठिकाणी १२ टाक्या बनलेल्या आहे. ही सगळी माहिती आहे आपण सर्व सुज्ञ आहे परंतु ही जी यंत्रणा आहे ही ओसीडब्लु कंपनीचे जे काम आहे ते काही समाधानकारक नाही. ज्या गतीने काम करायला पाहिजे एन.ई.एस.एल. मध्ये मी आहे परंतु त्या पध्दतीने काम झालेले नाही. आपण नदी साफ करु, नदीमध्ये आपण प्लेन चालवु, नदीमध्ये आपण जहाज चालवु, अनेक योजना आपण लादल्या परंतु त्या सफल करण्यामध्ये आपण १५ वर्षामध्ये कुठेही सिध्द केले नाही. आपण लंडन स्ट्रिट बनविण्याचे प्लॅनिंग केले परंतु लंडन स्ट्रीट अजुनपर्यत तयार झालेला नाही. त्याचे टेंन्डरही निघालेले नाही. आपण एक एक प्लॅनिंग तयार केले परंतु त्याचे इम्प्लीमेंटेशन झालेले नाही. हायटेंशन लाईनच्या संबंधामध्ये अनेक घरे तोडण्याचे काम आपण केले त्या संदर्भामध्ये अनेक लोक न्यायालयामध्ये गेले पण आपण काही प्रखर पॉलिसी त्याच्यासाठी तयार केलेली नाही. अजुनही लोक त्या ठिकाणी आशेने बघत आहे की आपण काय करायचे. आंबेडकर रमाई घरकुल योजना आहे त्या घरकुल योजनेमध्ये सुध्दा लोकांना न्याय मिळाला नाही. अनेक लोकांचे घरे पडलेले आहे त्या ठिकाणी बजेटमध्ये तरतुद करण्यात आलेली नाही. माझी आपल्या माध्यमातून स्थायी समिति अध्यक्षांना विनंती आहे की आपण रमाई आंबेडकर घरकुल योजनेमध्ये मोठया प्रमाणात राशी उपलब्ध करुन घरकुल बांधण्याचे काम अपुर्ण राहिलेले आहे ते पुर्ण करावे. झोपडपट्टयांना पट्टे देण्याच्या संदर्भात आपण जो निर्णय आपण घेतला होता परंतु त्या ठिकाणी त्याची अंमलबजावणी झाली नाही. अजुन पर्यत अनेक लोकांच्या रजिस्ट्री झाल्या नाही. नंदनवन झोपडपट्टी सारखा माझा ऐरिया आहे त्या ठिकाणी ९० टक्के लोकांच्या रजिस्ट्री झालेल्या नाही. हसनबाग मध्ये सुध्दा ९० टक्के लोकांच्या रजिस्ट्री झालेल्या नाही. मा. माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यक्रमाला मी होतो ज्या प्रमाणे आपण आपल्या भागामध्ये पट्टे वाटपाचं काम करुन घेतलं त्याप्रमाणे नागपूर शहरामध्ये सुध्दा पट्टे वाटपाचे काम आपल्या कार्यकाळामध्ये व्हावे अशी माझी अपेक्षा आहे. मा.महापौरजी आपल्याकडुन जास्त अपेक्षा आहे. या ठिकाणी झोपडपट्टयांना जे सरकारी नळ होते ते आपण तोडले, सरकारी नळ बंद केले. आता त्या ठिकाणी मिटरचे नळ आलेले आहे परंतु एका एका व्यक्तीला १ लाख रुपये बिलं, कोणाला ५० हजार रुपये बिल, कोणाला २ लाख रुपये बिल आणि ते सेटलमेंट आणि आता शास्ती माफ करण्याचे अधिकार आता मा.आयुक्तांना आहे. आपल्या माध्यमातून मी मा.आयुक्तांना विनंती करतो की टॅक्सच्या संबंधी मा.अध्यक्ष स्थायी समिती यांना मी धन्यवाद देतो की त्यांनी वन टाईम सेटलमेंटचा प्रस्ताव ठेवलेला आहे. वन टाईम सेटलमेंटच्या प्रस्तावावर त्वरीत निर्णय व्हावा आणि लोकांची शास्ती माफ करुन पैसे भरण्याची संधी त्यांना उपलब्ध करुन दयावी. आापण अध्यक्ष स्थायी समिती, जलप्रदाय समितीमध्ये असतांना अत्यंत चांगल्या प्रकारे हे काम केले होते .म्हणुन मी आपले मनापासून अभिनंदन करतो की पिंटुजी झलके जलप्रदाय समितीचे सभापती आहे आणि त्यांनी अत्यंत चांगले काम जलप्रदाय समितीमध्ये केलेले आहे त्यांचे मी अभिनंदन करतो. परंतु नागरिकांना आता जो त्रास होत आहे कुठे पाईपलाईन नाही. २४ बाय ७ ची योजना जाहिर केली. सुरुवातीला ते काम माझ्या प्रभागामधुन झालं परंतु पुन्हा २४ बाय ७ ची अंमलबजावणी आपल्या कारकिर्दीमध्ये पुन्हा करण्यात आलेली नाही. मा.महापौरजी सातव्या वेतन आयोगाच्या संबंधामध्ये मा.नंदाताई बोलल्या परंतु सातवं वेतन आयोग का थांबलं याची कल्पना आपल्याला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की सातव्या वेतन आयोगाच्या संबंधामध्ये जे कर्मचारी बिचारे रात्रंदिवस काम करतात पिंटुजी झलके यांनी सातव्या वेतन आयोगाची बजेटमध्ये तरतुद केलेली आहे. परंतु सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी झाली पाहिजे. जसे इतर महानगरपालिकेमध्ये काही ठिकाणी संधी मिळालेली आहे त्याचप्रमाणे आपल्या या कर्मचा-यांना संधी मिळाली पाहिजे. आपल्या स्थावर विभागाच्या माध्यमातून आपल्या ज्या शाळा आहे, आपले जे मैदाने आहे याचा संपुर्ण लेखाजोखा आपल्याकडे

अजुनपर्यत नाही. जो डाटा अपडेट केलेला नसेल त्या ठिकाणी तो डाटा आपल्या प्रॉपर्टीवर आपला बोर्ड लावला पाहिजे की ही प्रॉपट्री नागपूर महानगरपालिकेची आहे. घाटांच्या संदर्भामध्ये आभाताई बोलल्या, बाकीचे सदस्य बालेले. नंदाताईंनी घाटाच्या संदर्भात बोलल्या, त्या सोफॅसटीकेटेड ऐरियामध्ये राहतात म्हणुन त्यांना गरिबांची फारशी माहिती नाही. त्याच्यामुळे गरीब लोक काडयांसाठी त्रस्त होतात आणि त्यामुळे पुर्ववत जी व्यवस्था होती आपपल्या माध्यमातुन मी. अध्यक्ष स्थायी समिती यांना विनंती करतो घाटांवर लाकडे देण्याचे जे काम आहे ते पुर्वीप्रमाणे आपण मोफत लाकडं देण्यात यावे. अशाप्रकारची मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. की गरीब लोकांचा जो अंतिम संस्कार आहे तो थांबवू नये, आम्ही ज्या भागात राहतो त्या भागातील झोपडपट्टीतील लोक काडया विकत घेण्यासाठी येतात अनेक लोकांना आम्हाला पैसे दयावे लागते, अनेक लोकांची अंतिम संस्कार करण्याची ऐपत नसते. म्हणुन त्यांना आर्थिक निधीची मदत असते. म्हणुन काडयापासून सर्व गोष्टी जर त्यांना घ्यायला लागल्या तर ते अंतिम संस्कार सुध्दा करु शकत नाही. हा याचा मागचा आमचा उद्येश आहे. मा.महापौरजी आपण या माध्यमातून आपल्या सर्व नगरसेवकांचे जे कामे सुटलेले असतील ते कामे पुर्ण करण्याच्या दृष्टीने आपण सर्व नगरसेवक यांच्या मार्फेत मी लिखीत निवेदन मी सादर केलेले आहे त्यामुळे मी त्या नगरसेवकांच्या कामांचा समावेश त्या ठिकाणी करावा अशी मी आपल्याला विनंती करतो. नविन आयुक्त प्रलंबित राहिलेले सर्व कामे हे आपल्या माध्यमातून करतील, अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. हे जे बजेट आहे ते आकडयांची हेरफेर करुन केलेले बजेट आहे म्हणुन मी माझ्या कॉग्रेसपक्ष नेता आणि विरोधी पक्ष नेता म्हणुन याचा मी विरोध करतो आणि येथेच थांबतो, जयहिंद.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, जवळपास ११.३० वाजता पासून आता ७ वाजत आहे वेगवेगळया गटांच्या मा.सदस्यांनी अर्थसंकल्पावर चर्चा केली. २५०० कोटीचा अर्थसंकल्प मा.अध्यक्ष स्थायी समिती श्री.पिंटुजी झलके यांनी या ठिकाणी सादर केला. सादर करता वेळेस जी स्थिती संपुर्ण देशामध्ये, संपुर्ण जगामध्ये आणि त्याचप्रमाणे नागपूर शहरामध्ये कोव्हीडमध्ये उत्पन्न झाली आणि अशाही परिस्थितीमध्ये नागपूर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प होणार किंवा नाही होणार अशा प्रकारची शंका नगरसेवकांमध्ये होती. परंतु मा.अध्यक्षांनी उशीरा का होईना तो अर्थसंकल्प २० तारखेला सादर केला. २५०० कोटी आणि मागची शिल्लक २२३ कोटी अशाप्रकारे २७३३ कोटी रुपयांचा बजेट सादर केलेला आहे. त्यामध्ये मा.महापौरजी भाग क्र १ मध्ये जे १९ हेड दिले होते ज्या माध्यमातून नागपूर महानगरपालिकेचे उत्पन्न मिळणार आहे आणि ते जर नागपूर महानगरपालिकेला उत्पन्न मिळवायचे असेल तर ज्या ज्या विभागप्रमुखांकडे ही जबाबदारी आहे ती आय गोळा करण्याची जबाबदारी आहे त्या त्या विभागप्रमुखांनी पुर्ण ताकतीनिशी तो टारगेट दिला आहे तो टारगेट पुर्णपणे मिळवुन दयावा आाणि मा.महापौरजी आपण तशा प्रकारचे निर्देश विभाग प्रमुखांना दयावे. जे टारगेट स्थायी समिती अध्यक्ष यांनी दिलेला आहे तो टारगेट येत्या मार्च पर्यत पुर्ण व्हावा. हे करीत असतांना बजेटचे स्वागत केले मग तो कोणत्याही पक्षाचा असु दया. हा पहिला असा स्थायी समितीचा बजेट आहे की ज्या स्थायी समितीच्या बजेटवर सभागृहातील जवळपास सर्वच मा.सदस्यांनी यावर सहमती दर्शविली आहे. साधारणत: मार्च महिन्यापासून कोव्हीडची लागण सुरु झाली. लोकांचे कामधंदे बंद झाले, लोकांच्या नौक-या गेल्या, अशा पिरेडमध्ये नागपूर महानगरपालिकेचे जे इनकम आहे ते कुठेतरी मागे पडलेले आहे परंतु आता कोव्हीडचा काळ हळुहळु संपत आलेला आहे अशा स्थितीमध्ये नागपूर महानगरपालिकेची जी आर्थिक स्थिती जर बरोबर करायची असेल तर ज्या ज्या विभागाकडे ही जबाबदारी आहे त्या त्या विभागप्रमुखांनी हे उद्यीष्ट गाठण्याची फार आवश्यकता आहे. त्यामध्ये सर्वात महत्वाचे आणि मोठा जो इनकमचा विषय आहे त्यामध्ये टॅक्स डिपार्टमेंट असेल, पाण्याचे विभाग असेल, बाजार विभाग असेल, नगररचना विभाग असेल, या सर्व

विभागाचे इनकम येणा-या दिवसामध्ये जर टारगेट प्रमाणे मिळाले तर मला असे वाटते की हे जे अर्थसंकल्पामध्ये जी राशी दिलेली आहे जे बजेट दिलेले आहे ते पुर्ण होईल. त्यामध्ये मा.अध्यक्षांनी नविन नविन योजना आणल्या, मा.अध्यक्षांना फार कमी काळ मिळाला, मार्च पासुन ते आतापर्यंत कोव्हीडच्या काळामुळे आपण काही करु शकलो नाही. मात्र या फेब्रुवारीमध्ये मा.आयुक्तांचा बजेट येणार आहे म्हणुन ३ ते ४ महिन्यामध्ये नागपूर शहरातील जे कामे प्रलंबित होते मागच्या आयुक्तांनी जे कामे थांबविलेले होते त्या कामाचे विशेष करुन वर्णन या ठिकाणी मा.अध्यक्षांनी केलेले आहे. त्यामुळे या प्रकारची राशी मा.अध्यक्षांनी ठेवलेली आहे आणि म्हणुन मागचे जे कामे आहे ते कामे होणारचं आहे आणि नविन कामे यामध्ये फार कमी प्रमाणात घेतले आहे. सगळ करता येते परंतु पैशाचे सोंग करता येत नाही अशी जी म्हण आहे त्याचाच आधार घेऊन मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी हे बजेट स्थापन केले आहे. हे करीत असतांना नागपूर शहराच्या ज्या अडीअडचणी आहे ज्या मुलभुत सोयी सुविधा आहे. नागपूर शहराच्या ज्या सर्वांगीन विकास करासाठी सर्व समाजाचा विचार करुन हे बजेट मा.अध्यक्षांनी दिलेले आहे. यामध्ये कोणत्याच प्रकारचा भेदभाव न करता सर्वच प्रभागाच्या नगरसेवकांना काही लोकांनी आरोप लावले आहे की भाजपच्याच नगरसेवकांना जास्त निधी दिलेला आहे परंतु असे काहीच नाही. मा.अध्यक्षांनी सर्वांनाच बरोबर राशी दिलेली आहे आणि त्याप्रमाणे हे बजेट केलेले आहे. मागची जी राशी होती आणि जे कामे होते त्यावेळेस आपले आयुक्त यांनी सर्व कामे प्रलंबित ठेवले होते, आवश्यक कामे सुध्दा प्रलंबित ठेवले होते. ज्या १२ कोटी रुपयांची फाईल नागपूर शहरामध्ये ७००० इलेक्ट्रीकचे पोल उभे आहे परंतु मागच्या ७ महिन्यापासून मा.मागचे कमीश्नर यांनी ती फाईल थांबवून ठेवली होती. अनेक ठिकाणी इलेक्ट्रीकचे पोल लागले परंतु त्या ठिकाणी इलेक्ट्रीकचे फिटींग लागली नाही. आणि म्हणुन मागच्या ६ महिन्यापासून जी पेंडंसी आहे ते मा.महापौरजी आपण मा.आयुक्तांना सांगुन ताबडतोब याच्या निविदा आपण काढावा आणि यामध्ये नागरिकांना यामध्ये दिलासा दयावा. त्यामध्ये मग शिक्षण विकास असो, दुर्बल घटक असो, रमाई आवास योजना असो, रमाई आवास योजनेचे अजुनपर्यंत १४ कोटी महाराष्ट्र शासनाने दिलेले नाही आणि म्हणुन नागपूर शहरातील जी गोरगरीब जनता आहे ज्यांचे रमाई घरकुल मंजूर झाले आहे आणि पैशाअभावी ते आपले घर बांधु शकत नाही. मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी यामध्ये २ कोटी रुपये ठेवले होते परंतु यामध्ये राज्य शासनाचा जो हिस्सा येतो तो सुध्दा महानगरपालिकेला प्राप्त झालेला नाही. यामध्ये सर्वात चांगली गोष्ट मा.अध्यक्षांनी केलेली आहे की दुर्बल घटक योजनेमध्ये बजेटच्या ५ टक्के हिस्सा असतो तो जवळपास ३१.५५ कोटी होता. त्यामध्ये अधिकची १६.३८ कोटी रुपयांची वाढ करुन जवळपास ४८.२३ कोटी रुपये दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवलेला आहे ही फार अभिनंदनाची गोष्ट आहे त्याकरीता मी त्यांचे स्वागत करतो. त्याचप्रमाणे नागपूर शहरामध्ये नविन कल्पनेतुन वंदे मातरम उद्यान जवळपास १ लाख स्केअर फुटमध्ये हे ऐतिहासीक उद्यानाची निर्मिती मा.अध्यक्ष स्थायी समिती यांच्या संकल्पनेतुन साकार होणार आहे त्यामुळे मी त्यांचे देखील अभिनंदन करतो नागपूर शहरामध्ये हे एकमेव असे उद्यान राहणार आहे वंदे मातरम उद्यान ज्या शहिदांनी, ज्या विरांनी आपले बलिदान दिले आहे त्या सर्व बलीदानांचा इतिहास या ठिकाणी जोपासला जाणार आहे असे एक चांगले उद्यान मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी या ठिकाणी आपल्याला दिलेले आहे. मग त्याच्यामध्ये नागपूर शहरामध्ये स्वतंत्र पोलीस स्टेशन असायला पाहिजे अशी देखील कल्पना यामध्ये मांडण्यात आलेली आहे. दरवेळेस मग अतिक्रमण विभाग असो, ज्या ठिकाणी अतिक्रमण विभागाची आपल्याला कारवाई करता येते, ज्या ठिकाणी आपल्याला शिकस्त इमारत तोडायची गोष्ट येते त्या ठिकाणी आपण पोलीस कमीश्नरकडे पोलीस विभागाला असवध्स पोलीसांची मदत मागतो त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचे जर स्वतंत्र पोलीस स्टेशन असले तर नागपूर महानगरपालिकेचा खर्च सुध्दा वाढणार नाही आणि काम करण्यासाठी सुलभ होईल. त्याचप्रमाणे

कोव्हीड काळामध्ये नागपूर शहरात चालता फिरता दवाखाना सर्व सामान्य जनतेला याचा लाभ व्हावा, या दृष्टीकोणातून चालता फिरता दवाखान्याची कल्पना मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी या ठिकाणी राबविलेली आहे. समाजाच्या शवेटच्या मानसांपर्यत आरोग्य यंत्रणा कशाप्रकारे पोहचेल अशा प्रकारचा विचार करुन दहाही झोनमध्ये चालता फिरता दवाखान्याची योजना मा.स्थायी समिती अध्यक्षांनी केलेली आहे. त्याचप्रमाणे मी मागे मा.आयुक्तांना पत्र दिले होते प्रॉपट्री टॅक्स बद्यल नागपूर शहरामध्ये कोरोनामुळे ब-याच लोकांची आर्थिक स्थिती खराब झालेली आहे. अशा वेळी टॅक्स विभागातर्फे मोठया प्रमाणात शास्ती लागली आहे. ती शास्ती २० टक्के, ३० टक्के, ४० टक्के पर्यत लोकांकडे थकित होती अशावेळेस मा.आयुक्त महोदयांना मी पत्र दिले होते की अशा स्थितीत नागपूर शहरातील लोकांच्या प्रॉपर्टी टॅक्सवर जी शास्ती लागली होती ती सरसकट माफ करण्यात यावी, आणि लोकांना दिलासा देण्यात यावा अशा प्रकारची विनंती केली होती. मा.महापौरजी, सभागृहामध्ये ज्या ज्या मा.नगरसेवकांनी आपले मत या ठिकाणी व्यक्त केले आहे नागपूर महानगरपालिकेच्या व्यंय अंदाजपत्रकामध्ये म.न.पा. सभागृहातर्फे सुचविलेल्या दुरस्त्या किंवा फेरबदल जे करायचे असतील किंवा दुरस्त्या करायचे असतील मा.महापौरजी आपण तो अधिकार आपल्याकडे ठेवावा आणि त्या प्रकारचे सुचना मा.अध्यक्ष स्थायी समिती यांना देण्यात याव्यात. नागपूर महानगरपालिकेच्या विविध विकास कामे विभागातर्फे प्रस्तावित करण्यात येतात अशा सर्व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे आदेश सुध्दा आपण दयावे. त्याचप्रमाणे नागपूर शहरात कोव्हीडच्या काळामध्ये ज्या ज्या अधिका-यांनी, पोलीस डिपार्टमेंटनी, डॉक्टरांनी, नागपूर महानगरपालिकेचे सर्व सफाई कर्मचारी असतील अशा लोकांनी फार कठीन काळामध्ये नागपूर शहराची सेवा केली आहे अशा सर्व अधिका-यांचे, कर्मचा-यांचे मी मनपुर्वक अभिनंदन करतो आणि महाराष्ट्र राज्य सरकारनी जे जे कोव्हीड योध्दा होते अशांचा कोरोना काळामध्ये काम करतावेळेस ज्यांचे निधन झाले अशा लोकांना ५० लाख रुपयांची मदत राज्य सरकार करेल, अशा प्रकारचे मा.मुख्यमंत्र्यांनी, मा.गृहमंत्र्यांनी जनतेला सांगितले होते परंतु नागपूर महानगरपालिकेमध्ये अनेक असे कर्मचारी आहे ज्यांचा कोरोना मुळे मृत्यु झालेला आहे अशा लोकांना तातडीने ५० लाख रुपयांची मदत राज्य सरकारनी करावी आणि मा.महापौरजी मी आपल्याला सांगु इच्छितो की जे सफाई कर्मचारी होते किंवा ऐजवदार कर्मचारी होते त्यापैकी काही कर्मचा-यांचा मृत्यु झालेला आहे अशा कर्मचा-यांच्या परिवारातील एक सदस्य नागपूर महानगरपालिकेने कामावर घ्यावा अशा प्रकारची मी आपल्याला सूचना करतो. अशा प्रकारचे निर्देश आपण मा.आयुक्तांना व प्रशासनाला दयावे. त्याचप्रमाणे नागपूर शहरामध्ये मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी दहा झोनमध्ये १० शितपेटया घेण्याचे निर्णय केला आहे. त्यामध्ये ब-याच संस्था, संघटना अशा प्रकारचे काम करतात परंतु नागपूर महानगरपालिकेने सुध्दा अशा प्रकारचे शितपेटी घेण्याचा निर्णय मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी घेतला आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. ज्या ज्या सदस्यांनी यामध्ये दुरुस्त्या सुचविलेल्या असतील, प्रस्ताव व राशी यामध्ये फेरबदल करुन पुर्नविनियोजन करुन अंतिम स्वीकृती अर्थसंकल्पाच्या अंदाजपत्रक मुद्रीत करण्यात याव्यात यासह महानगरपालिका ही मंजूरी प्रदान करावी. मा.महापौरजी या अर्थसंकल्पामध्ये विविध पदाअंतर्गत जी कामे राशीसह प्रस्तावित करण्यात आली आहे त्या प्रशासकीय विकास कामांना मंजूरी प्रदान करण्यात यावी या सर्व कामकाजांच्या स्थापत्य व इतर कामे प्रस्तावित करुन संपुर्ण राशीची निविदा काढावी व या आर्थिक वर्षात ज्या वित्तीय तरतुदी उपलब्ध करुन दिल्या आहेत त्या कार्यादेश राशीच्या आर्थिक वर्षात देण्यात यावे अशी मी आपणांस सूचना करतो. कारण फेब्रुवारीमध्ये मा.आयुक्तांचा पुन्हा नविन बजेट येणार आहे त्यामुळे अधिका-यांनी ताबडतोब जे कामे पेंडींग आहे ज्या कामाला सुरुवात झालेली होती अशा सर्व कामे ताबडतोब सुरु करण्यात यावे आणि यातुन मा.नगरसेवकांना दिलासा देण्यात यावा. कारण असे अनेक आऊटर वार्ड आहे ज्या ठिकाणी कामे करण्याची आवश्यकता आहे आणि मागच्या आयुक्तांनी ही सर्व कामे थांबविली होती

मी आपणांस विनंती करतो की आपण ताबडतोब अधिका-यांना निर्देश दयावे आणि कामाला सुरुवात करण्यात यावी. कारण पावसाळा गेलेला आहे त्यामुळे अनेक रस्ते खराब झालेला आहे गडरलाईन खराब झालेल्या आहे आणि अशावेळेस जे आऊटरचे प्रभाग आहे तेथे काम करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ज्या प्रकारे ५७२ आणि १९०० लेआऊटमध्ये जे काम नागपूर सुधार प्रन्यासकडुन नागपूर महानगरपालिकेला आलेले आहे मी आपल्या माध्यमातून सूचित करतो की नगररचना विभागाचे बळकटीकरण करण्याचे फार आवश्यकता आहे. कारण जर नागपूर महानगरपालिकेचे जर इनकम वाढवावयाचे असेल तर ५७२ व १९०० लेआऊटचे आर.एल. लेटर आहे जी डिमांड आहे ते ताबडतोब काढुन नागपूरच्या जनतेला याचा दिलासा देण्यात यावा. कारण नागपूरची जनता एन.आय.टी. ला जाते आणि ते सांगते की नागपूर महानगरपालिकेला फाईल आलेली आहे आणि नागपूर महानगरपालिकेला आले की ते सांगते की नागपूर सुधार प्रन्यास कडे फाईल आहे आणि अशा कारणाने नागपूर शहराची जनता थोडी होरपडलेली आहे म्हणुन नगररचना विभागामध्ये विशेष लक्ष देऊन जास्तीत जास्त लोकांना याचा फायदा कसा होईल, जास्तीत जास्त लोकांना आर.एल. लेटर कसे मिळेल आणि नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कशी सुदृढ होईल याचा सुध्दा आपण या ठिकाणी विचार करावा. मी सत्तापक्ष नेता असल्यामुळे मला सर्वात शेवटी बोलण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे मी सर्वांना विनंती करतो की सर्व नगसेवकांनी या अर्थसंकल्पाला समर्थन केलेले आहे विरोधी पक्षाचे जरी नगरसेवक असले तरी सुध्दा विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या अर्थसंकल्पाचे समर्थन केलेले आहे. मा.महापौरजी सर्व लोकांच्या सहमतीने हा २०२०-२१ चा अर्थसंकल्प हा सर्वानुमते मंजूर करावा, अशी मी सभागृहाला अशी विनंती करतो की सर्वांनी २०२०-२१ च्या बजेटचे समर्थन करावे. सर्वांनी मंजूर करावे. आणि मा. अध्यक्ष स्थायी समिती यांचे कौतुक करावे कारण त्यांनी सुंदर बजेट मा.स्थायी समिती अध्यक्षांनी सादर केले आहे. बजेट हा सुचनेसह मंजूर करावा. ज्या ज्या सदस्यांनी टेक्नीकली दृष्टीने ते संम्मेलीत झाले नसतील अशा सर्व नगरसेवकांचे लिखीत स्वरुपात जे काही सुचवायचे असेल किंवा बदल करायचे असेल सूचना अशांना २ दिवसाच्या आत मत घेऊन हा बजेट मंजूर करावा, अशी मी आपणांस विनंती करतो, धन्यवाद.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, प्रावधान वाटपाचे अधिकार जे स्थायी समिती अध्यक्षांना दिले जाते त्याला माझा विरोध आहे. स्थायी समिती अध्यक्षांना ते दिलेले अधिकार हे कायद्याच्या विरुध्द आहे. कायदयाच्या अनुरुप नाही, त्यामुळे बेकायदेशीर दिलेले आधिकाराला मी विरोध करतो.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी सभागृह हे सर्वाभौम आहे. सभागृहाने मंजूरी दिलेली आहे एकटया व्यक्तीने मंजूरी दिलेली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, एकदम बरोबर आहे. प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. मी माझा विरोध नोंदवितो.

अध्यक्ष स्थायी समिती श्री.विजय (पिंटु) झलके :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी,मा.सत्तापक्ष नेता, मा.विरोधी पक्ष नेता, सर्व सन्माननिय नगरसेवक, अर्थसंकल्प सभागृहाच्या पटलावर ठेऊन सन्माननिय नगरसेवकांनी साधक बाधक अशी चर्चा अर्थसंकल्पावर सभागृहात केली. सर्व सन्माननिय नगरसेवकांनी अनेक सूचना या बजेटच्या संदर्भाने दिल्या. विशेष करुन वार्डफंडाच्या संदर्भात जी चुक बजेटमध्ये झाली त्यात प्रति प्रभाग २० लक्ष रुपये असे त्यामध्ये नमुद करण्यात आले आहे परंतु ते प्रति नगरसेवक २० लक्ष रुपये आहे. चुकीची दुरुस्ती निश्चितच महासभेमध्ये करण्यात येईल. अनेक सर्व सन्माननिय सदस्यांनी सूचना दिल्या

त्यात प्रामुख्यांनी धर्मपाल मेश्राम यांनी बजेट मध्ये झालेल्या चुकीसंदर्भात एक बाब लक्षात आणुन दिली संविधान चौकाच्या ऐवजी चुकीने तेथे रिझर्व्ह बॅक चौक होऊन गेले त्यामुळे मी या सभागृहाची माफी मागतो, खेद व्यक्त करतो आणि झालेली चुकी निश्चितच दुरुस्त होईल असे अभिवचन देतो. सर्व जेष्ठ आणि श्रेष्ठ नगरसेवकांनी या बजेटचे समर्थन केले तसेच विरोधी पक्षातील नगरसेवकांनी त्यातील ज्या कमी होत्या त्या सुध्दा दाखवून देण्याचा प्रयत्न केला. निश्चितच अनेक गोष्टी या सभागृहात दिवसेंदिवस शिकायला मिळत असते आणि त्या गोष्टी शिकण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. काही चुकी झाल्या असेल तर निश्चितच त्या बद्यल मी क्षमा सुध्दा मागतो. आपण सर्वांनी या अर्थसंकल्पाचे जे समर्थन केले निश्चितच हा अर्थसंकल्प आपण योग्यरीत्या कार्यान्वीत करण्याचा आपण प्रयत्न करु, एक गोष्ट मात्र सर्व सन्माननिय नगरसेवकांना प्रकर्षाने सांगणे महत्वाचे आहे. अंदाजपत्रकासोबत जे अर्थ संकल्प भाग क्र १ दिलेले आहे त्यामध्ये महसुली आणि भांडवली अशा भांडवली व महसुली खर्चाचे जे पुस्तक दिले आहे त्यामध्ये सर्व नगरसेवकांचे कामे घेण्याचा आपण प्रयत्न प्रशासनाच्या वतीने घेतला सर्व कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंताव्दारे ती यादी आम्हाला प्राप्त झालेली आहे. ती यादी आम्ही स्वत:हुन तयार केलेली नाही. विभागाने दिलेल्या यादीनुसार त्या सर्व यादीचे समायोजन त्यामध्ये करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. मी माझ्या बजेटच्या भाषणामध्ये सुध्दा उल्लेख केला आहे की जर कुठल्या सदस्यांची कार्यादेश झाल्यानंतर सुध्दा कामे किंवा प्रशासकीय मान्यता झालेली कामे जर चुकुन अनावधानाने सुटली असेल तर निश्चित त्यांनी त्याबाबतची सुचना दयावी त्या सर्व बाबी दुरस्तीसह आपण सभागृहामध्ये स्वीकृत अंदाजपत्रक देऊ त्यामध्ये सर्व चुकांचे आपण अंतर्भाव करु त्या चुकांना आपण अंतरर्भाव करु निश्चितच या बजेटला आपण सर्वांनी समर्थन दिल्याबद्यल मी सर्वाचे आभार मानतो धन्यवाद, नमस्कार.

महापौर :- सभागृहातील चर्चेनंतर मा.सत्तापक्ष नेता श्री.संदीप जाधव यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय संपुर्णत: मंजूर करण्यात येतो. नागपूर महानगरपालिकेच्या व्यय अंदाजपत्रकात मनपा सभागृहातर्फे सुचविलेल्या दुरुस्त्या तसेच मा.सत्तापक्ष नेता यांनी सुचविलेली प्रस्तावित कामे व फेरबदलाचे पुर्नविनियोजन आणि मुद्रणातील चुकीची दुरस्ती तसेच बांधील खर्चाची कामे अंदाजपत्रक भाग १ मध्ये समाविष्ट नाही. ते समाविष्ट करण्याचे संपुर्ण अधिकार महापौरांना मंजूर करण्याचे अधिकार महापौरांना प्रदान करते. त्यानुसार त्यांनी केलेल्या दुरुस्त्या तसेच सुचविलेले राशी व प्रस्ताव याच्या फेरबदल आणि पुर्नविनियोजन करुन अंतिम अर्थसंकल्प अंदाजाच्या अंतिम स्वीकृती अर्थसंकल्पात मुद्रीत करण्यात यावा यासही मनपा मंजूरी प्रदान करते. नागपूर महानगरपालिकेतील विविध विकास कामे विभागाव्दारे प्रस्तावित करण्यात येतात अशा सर्व प्रकरणास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे महासभेचे संपुर्ण अधिकार स्थायी समितीस देण्यात येते. प्रशासकीय व वित्तीय धोरणात्मक निर्णय जसे बीओटी पीपीपी किंवा तत्सम धोरणात्मक प्रकारातील प्रकरणे प्रशासकीय मान्यतेसाठी मनपा सादर करणे प्रशासनास आवश्यक राहील, यासह मंजूरी प्रदान करते. क्षेत्रिय कार्यालयाच्या पदाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या प्रस्तावित वित्तीय तरतुदीच्या बांधील खर्च वगळून पदशिर्षाचे पुर्नविनियोजन करण्याचे संपुर्ण अधिकार स्थायी समितीला प्रदान करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येते परंतू प्रभाग समितीस या प्रकारच्या बदलामुळे दायित्व निर्माण होता कामा नये, याची काळजी घेणे आवश्यक राहील. कोव्हीड—१९ जागतिक महामारीत अनेक लोकांचे रोजगार गेलेले आहेत तसेच व्यवसायावर सुध्दा याचा वाईट परिणाम झालेला आहे. कायद्याने म.न.पा.आयुक्तास शास्ती माफ करण्याचे जे अधिकार प्रदान केलेले आहे त्याचा लाभ नागरिकांना देऊन शास्ती माफ करुन कराचे संकलन जास्तीत जास्त होऊन उत्पन्नात वाढ होऊ शकते असे स्थायी समितीचे मत असल्यामुळे कोविड—१९ च्या काळातील मालमत्ता करावर लावलेली शास्ती माफ

करण्याचा निर्णय हे सभागृह घेत असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुषंगाने कायद्याने जे अधिकार व शक्ती प्रदान केलेली आहे. त्याचा वापर महानगरपालिकेस उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने व नागरी हितात करावा असे निर्देश हे सभागृह म.न.पा. आयुक्तास देते. तसेच बकाया मालमत्ता कर एकमुस्त भरण्याकरीता एका ठराविक कालबध्द कालावधीसाठी प्रशासनाने एक योजना बनवावी व त्याचे क्रियान्वयन प्रशासनाव्दारे करावे याबाबतची माहिती पुढील सभागृहामध्ये म.न.पा. आयुक्त यांनी सादर करावी. शहरातील अवैध नळ कनेक्शानांचा शोध घेण्याची विशेष मोहीम राबवून असे अनधिकृत नळांच्या कनेक्शन घेतलेल्या नागरिकांकडुन एक रक्कमीपुर्तता (One Time Settlement) या योजनेअंतर्गत अनधिकृत नळांचे कनेक्शन नियमीत करण्याचा कार्यक्रम विभागाव्दारे राबविण्याचे हे सभागृह निर्देश देते. त्यामुळे जलप्रदाय विभागाचे उत्पन्नात आमुलाग्र वाढ होईल, तसेच कोविड – १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता नळाच्या मीटरचे योग्य रीडींग न घेतल्याने अनेक नागरीकांच्या पाण्याच्या बिलात तफावत असल्याचे वारंवार आढळून आलेले आहे. यामुळे कोविड – १९ च्या दरम्यानच्या सर्व पाणीपट्टी देयकावर लावण्यात आलेली शास्ती माफ करण्याचा निर्णय हे सभागृह घेत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुषंगाने कायद्याने जे अधिकार व शक्ती प्रदान केलेली आहे. त्याचा वापर महानगरपालिकेस उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने व नागरी हितात करावा, असे निर्देशही महासभा म.न.पा.आयुक्तास देते. प्रस्तावित अर्थसंकल्पात बांधील खर्चाचे परिशिष्ट जोडलेले असुन पदनिहाय व क्षेत्रिय कार्यालय निहाय तरतुदी विभागाने दिलेल्या माहितीनुसार देण्यात आलेल्या आहे. जर काही प्रभागातील लोकप्रतिनिधींनी दिलेली कामे व विभागाने जो बांधील खर्च प्रस्तावित केला आहे या परिशिष्टातुन सुटलेले असेल तर हे सभागृह प्रशासनास असे निर्देश देते की, या वर्षाच्या प्रस्तावित कामांसाठी ठेवलेल्या राशी मधुन प्राधान्याने बांधील खर्चाला किंवा कामांना प्रथमत: तरतुदी उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर महत्वाचे प्रस्तावित कामांना विभागाने तरतुद उपलब्ध करुन प्रस्तावित कामे सक्षम प्राधिकरणाकडून नियमाप्रमाणे मंजूर करुन सादर करावी यांस महासभा मंजूरी प्रदान करते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६५ अन्वये पोटनियम १ मधील (ह) वगळुन स्थायी समितीस कायद्याव्दारे प्राप्त अधिकारानुसार अधिकारी व कर्मचा-यांच्या हितात स्थायी समितीची उपसमिती गठीत करुन दोन महिन्याच्या आत अधिनियमाशी व नियमांशी विसंगत नसतील असे विनियम तयार करुन सभागृहासमोर सादर करण्याचे निर्देश हे सभागृह स्थायी समितीस मंजुरी प्रदान करते. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/१०२०/प्र.क्र. १०० /२०२०/ व्यय- १२, मंत्रालय, मंबई, दिनांक २९ जुलै, २०२० अन्वये केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणा-या कंत्राटदारांना सोसाव्या लागत असलेल्या अडचणी संदर्भात उपायोजना व सहाय्य करणे या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कोविड – १९ महामारीही नैसर्गिक आपत्ती म्हणून गृहीत धरुन शासकीय कंत्राटामध्ये "दैवीसंकट" तरतुद (Force Majeure Clause) वापरण्याच्या सुचना दिल्या आहेत तसेच कामाची मुदत २ महिने ते ७ महिने ऐवढी वाढविली आहे. याच आधारावर व धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महानगरपालिका शासनाच्या कामाच्या पुर्णत्वास मुदत वाढीची विनंती कंत्राटदाराने केल्यास दि.१५ सप्टेबर, २०२० नंतर ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास स्थायी समितीने म.न.पा. सभागृहास विनंती केली आहे. तसेच या परिपत्रकातील शासन निर्णयानुसार अटी व शर्ती या कायम राहतील व त्याप्रमाणे विभागाने अटी व शर्तीची अंमलबजावणीची कार्यवाही करावी तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत हाती घेण्यात आलेल्या प्रकल्प व विविध विकास कामाच्या कंत्राटांना लागु राहतील सदर मार्गदर्शक सुचनांच्या अंमलबजावणीसाठीचे अधिकार प्रशासकीय विभाग, कार्यकारी अभियंता/अधिक्षक अभियंता/ मुख्य अभियंता या दर्जाच्या अधिका-यांना प्रदान करतील जेणेकरुन सदर प्रकरणी जलद कार्यवाही होईल यांस महासभेने मंजूरी प्रदान करते. या अर्थसंकल्पामध्ये विविध पदाअंतर्गत जी कामे राशीसह प्रस्तावित

करण्यात आली आहे. त्या सर्व विकास कामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करते. या सर्व कामांच्या स्थापत्य व इतर नागरी सुविधेची कामे प्रस्तावित करुन संपुर्ण राशीसह निविदा काढाव्या व या आर्थिक वर्षात ज्या वित्तीय तरतुदी उपलब्ध करुन दिल्या आहे. त्या राशीपर्यत कार्यादेश राशी या आर्थिक वर्षात देण्यात यावी, त्याचप्रमाणे ज्याचे कार्यादेश झालेले आहेत त्याचे देखील कार्यादेश तात्काळ देण्यात यावे या सुचनेसह हे सभागृह यांस मंजूरी प्रदान करते. चुकीने आलेल्या पाण्याच्या बिलाच्या बाबतीत देखील वन टाईम सेटलमेंट करुन तो देखील विषय नेहमीकरीता संपवावा अशी देखील सुचना करुन या संपुर्ण अर्थसंकल्पास हे सभागृह मंजूरी प्रदान करते.

तद्नंतर सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यात आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**